राष्ट्रहिताय संस्कृतम्

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद (नॅक),
बेंगलुरु द्वारा B++ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल
२०१९-२०

Releasing Oriental Legacy in AIOC 2020

Dignitaries releasing **Oriental Legacy** (Speeches of AIOC General Presidents of past 50 sessions) (From left) **Prof. Madhusudan Penna**, Local Secretary AIOC, **Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble VC, KKSU, Hon'ble **Shri. Nitinji Gadkari,** Minister of Road Transport & Highways, Hon'ble Vice President of India **Shri Venkaiya Naiduji,** Hon'ble **Shri Nitinji Raut,** Minister of Energy, Govt of Maharashtra, **Prof. Gautam Patel,** President AIOC 50th Session, **Prof. Saroja Bhate,** General Secretary, AIOC (10.01.2020)

Sahitya Academy Award to Prof. Madhusudan Penna !

Congratulations to Prof. Madhusudan Penna !

Our esteemed Faculty member & Sanskrit Mahakavi **Prof. Madhusudan Penna,** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & Culture received prestigious **Sahitya Academy Award for his Sanskrit Mahakavya Prajnachakshusham** in New Delhi on 25th February 2020.

Hon'ble Shri. Bhagat Singh Koshyari

Governor of Maharashtra
and
Chancellor of Universities in Maharashtra

संदेश

कर्मणि एव अधिकारः ते .... ।

सत्र 2019—20 चा विश्वविद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे. विश्वविद्यालयाची शैक्षणिक, संशोधन, पायाभूत सुविधा आणि अन्य प्रशासकीय स्तरांवर झालेली प्रगती आणि विकासाकडे होत असलेली दमदार वाटचाल याचा आढावा या अहवालाद्वारे घेण्यात आला आहे. या अहवालातील काही मुद्दे अधोरेखांकित करून नोंदवणे मला महत्त्वाचे वाटते.

- विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे विश्वविद्यालयाला मुक्त व दूरस्थ केंद्राची मान्यता प्राप्त झाली आहे. या केंद्राद्वारे विविध अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.
- महाकवी कालिदासाच्या समग्र वाङ्मयाचा मराठी अनुवाद सात खंडात मा. राज्यपाल महोदयांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला. महाकवी कालिदासाचे समग्र वाङ्मय एकत्रितरित्या आता उपलब्ध झाले आहे, ही खचितच आनंदाची गोष्ट आहे.
- उच्च शिक्षण क्षेत्रात कौशल्यविकासाधारित (LOCF) संस्कृत अभ्यासक्रम तयार करण्याचे दायित्व विद्यापीठ अनुदान आयोगाने माझ्यावर सोपविले होते; सदर संस्कृत अभ्यासक्रम प्रारूपाला युजीसीने मान्यता प्रदान केली असून राष्ट्रीय स्तरावर हे प्रारूप लागू होणार आहे.
- अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या शताब्दी समारोहाचे आणि सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाचे भव्य व यशस्वी आयोजन आणि मा. उपराष्ट्रपती श्री. वेंकयाजी नायडू यांच्या शुभहस्ते उद्घाटन हे विश्वविद्यालयाकरिता अत्यंत गौरवास्पद राहिले. याची नोंद घेणे आवश्यक आहे.

- याशिवाय या परिषदेच्या शताब्दी समारोहानिमित्त 110 ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. संपूर्ण देशभरातून जवळपास 2500 प्रतिनिधी व संस्कृत अनुरागी यात सहभागी झाले होते. यानिमित्ताने राष्ट्रीय पुस्तक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते.
- विश्वविद्यालयाची संशोधन पत्रिका **'शोधसंहिता'** ही **'युजीसी केअर लिस्ट'** मध्ये समाविष्ट झाली ही विश्वविद्यालयाच्या संशोधन लेखांची व प्रकाशनाची उच्च गुणवत्ताच अधोरेखित करते
- अभिमानाने नमूद करावेसे वाटते की विश्वविद्यालयाला 2019 चा **'सर्वोत्कृष्ट नवोन्मुख विद्यापीठ'** प्रवर्गा अंतर्गत **'ऑरोपथ ग्लोबल पुरस्कार'** प्राप्त झाला.
- प्रख्यात संस्कृत महाकवी आणि विश्वविद्यालातील अधिष्ठाता **प्रो. मधुसूदन पेन्ना** यांना **'साहित्य अकादमी पुरस्कार'** प्राप्त झाला याशिवाय केंद्रीय संस्कृत विद्यापीठ तिरूपती द्वारे मानद डि.लिट्. उपाधी देखील प्राप्त झाली. यासह विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि अनेक सन्माननीय प्राध्यापक यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुयश व सन्मान हे विश्वविद्यालयासाठी भूषणावह आहे.
- कोविड 19 च्या महामारीमध्ये विश्वविद्यालय आभासी माध्यमांचा प्रभावी, परिणामकारक उपयोग करून शिक्षण, परीक्षा, पीएच्डी मौखिकी, विविध प्रकारचे कार्यक्रम, कार्यशाळा, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम, व्याख्यानमाला, वेबिनार अशा कार्यक्रमांद्वारे कार्यरत राहिलेच परंतु सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणीवेतून कोविडग्रस्त अशा रामटेक आणि नागपूर येथे विविध प्रकारे आवश्यक ते सर्व प्रकारचे साहाय्य केले. **कर्मणि एव अधिकारः ते...** । या भगवद्गीतेतील वचनाचे अनुपालन प्रत्यक्ष कार्यातून विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, सहकारी आणि विद्यार्थ्यांनी केल्याने विनम्रतेने नमूद करावेसे वाटते.

अशाप्रकारे विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधन, प्रशासन अशा विविध टप्प्यांवरील विकासाचा आलेख या अहवालात विशद करण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय सहकारी यांच्या एकत्रित प्रयत्नातून विश्वविद्यालय निरंतर विकासमार्गावर राहील हा विश्वास मला वाटतो.

प्रो. श्रीनिवास वरखेडी

कुलगुरू

चरैवेति चरैवेति....!

सत्र 2019—20 चा विश्वविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. विश्वविद्यालयाने विविध आघाडयांवर केलेला विकास, गाठलेले प्रगतीचे टप्पे आणि कोरोनासारख्या जागतिक महामारीचा एकजुटीने सामना करीत दाखविलेले धैर्य हे खरोखरच वाखाणण्यासारखे आहे.

शैक्षणिक, प्रशासकीय, पायाभूत सुविधा, संशोधन, प्रकाशन या सर्व स्तरावर विश्वविद्यालयाने भरीव कामगिरी तर केलीच आहे परंतु विशेष नोंद घ्यावी असे कार्य राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण आणि योगविज्ञान विभागाने केले आहे. कोरोना काळात दैनंदिन शैक्षणिक व प्रशासकीय (ऑनलाईन) कार्यासह या तीनही विभागांच्या प्रमुखांनी व सदस्यांनी विद्यार्थ्यासह रामटेक व नागपूर येथे कोरोनाग्रस्तांना तसेच कोरोना काळात सेवा देणा—या पोलिसकर्मीना आणि कोरोनामुळे शारीरिक व मानसिक अस्वास्थ्य निर्माण झालेल्या गरजूंना अनुक्रमे भोजनदान, वैद्यकीयसुविधा आणि समुपदेशनाद्वारे अहोरात्र सेवा दिली.

2019—20 च्या विश्वविद्यालयीन कामगिरीची नोंद घेत असताना ऐतरेय ब्राह्मण ग्रंथातील (7.13—18) **'चरैवेति चरैवेति'** या सुवचनाचे स्मरण होते. या वचनानुसार विश्वविद्यालय हे कोरोना—पूर्व सामान्यस्थिती प्रमाणेच कोरोनाकाळातही निरंतर कार्यमग्न राहिले. या काळात सर्व प्राध्यापक, अधिकारी व सहका—यांनी निरंतर सेवारत राहून विश्वविद्यालय कामगिरीच्या घोडदौडीचा वेग कायम ठेवला हे मी साभिमान नमूद करू इच्छितो. माझ्या सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्याप्रती आभार व्यक्त करून त्यांच्या अशाच सहकार्याने विश्वविद्यालय कार्यमग्न राहून विविध यशोशिखरे गाठेल हा विश्वास व्यक्त करतो. धन्यवाद!

प्रो. मधुसूदन पेन्ना

कुलगुरू (प्रभारी)

Release of Complete Kalidas Literature Marathi Translation...

Hon'ble Shri Bhagat Singh Koshyariji, Governor of Maharashtra & Chancellor of the University **releasing Marathi Translation of Complete Kalidasa Literature in 7 Volumes.** Hon'ble VC Prof. Shrinivasa Varakhedi with Prof. Madhusudan Penna, Prof. Nanda Puri, Prof. Kavita Holey & Prof. Parag Joshi also present.30.09.2019

Auropath Global Award 2019

It is indeed a proud moment that **Kavikulaguru Kalidas Sanskrit Univeristy, Ramtek received Auropath Global Award 2019** under the **"Best Upcoming University"** Category at the hands of **Shri. Bhupesh Baghel, Hon'ble Chief Minister of Chattisgadh** on 2nd November 2019. The award given by Auropath & Shri Arobindo Society, Puducherry jointly. Hon'ble VC Prof. Varakhedi with award winning KKSU Deans & Officer.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरू द्वारा

B++

वार्षिक अहवाल

2019 –20

(अहवाल कालावधी – दि. 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020)

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email :registrar@kksu.org

कविकुलगुरू–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT
(2019-2020)

Committee

Prof. Kavita Holey	-	Chairperson
Dr. Harekrishna Agasti	-	Member
Dr. Ashish J.	-	Member
Ms. Shrivarda Malge	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member Secretary

Published by
Registrar
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek
Copyright with publisher

Coverpage - Paper 300 gsm

Paper - Maplitho 75 gsm / Art Paper 120 gsm

Size - A4

Printed at :
M/s. Avadhoot Graphics & Printing
Nagpur.

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)
Waranga Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email :registrar@kksu.org

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक मराठी	इंग्रजी
• **मा. कुलगुरूंचे मनोगत**		
• **विश्वविद्यालयाविषयी.....**		
• **विद्वत्परिषद् सदस्यांची यादी**		
• **व्यवस्थापन परिषद् सदस्यांची यादी**		
• **विभागनिहाय अहवाल**		
○ वेद तथा व्याकरण विभाग	13	125
○ संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	21	130
○ भारतीय दर्शन विभाग	29	137
○ वेदांग ज्योतिष विभाग	46	146
○ शिक्षणशास्त्र विभाग	52	153
• **विस्तार सेवा अहवाल**		
○ राष्ट्रीय सेवा योजना	57	159
○ छात्र कल्याण	59	161
○ हस्तलिखित केंद्र	70	169
○ क्रीडा विभाग	71	170
○ महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवारण समिती	71	171
○ मराठी भाषा गौरव दिन	74	
○ महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार	75	
○ अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद अहवाल	76	
○ राष्ट्रीय परिषद अहवाल	81	
• **प्रशासकीय अहवाल**		
○ सामान्य प्रशासन विभाग	83	173
○ आस्थापना विभाग	84	174
○ विद्या विभाग	85	175
○ महाविद्यालयीन विभाग	89	179
○ वित्त विभाग	91	181
○ अभियांत्रिकी विभाग	92	182
○ परीक्षा विभाग	98	188
○ ग्रंथालय	99	189
○ जनसंपर्क कक्ष	118	209
○ प्रकाशन विभाग	120	211
○ सांख्यिकी कक्ष	124	215
• **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी**	218	

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणा–या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी, संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 18 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- केन्द्रिय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक(महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी(केरळ)
- लालबहादूर शास्त्री केंद्रिय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर सिंग दरभंगा संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा(बिहार)
- केंद्रिय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंदाचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, गुजरात
- महर्षी पाणिनी संस्कृत तथा वेदिक विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)
- महर्षी वाल्मिकी संस्कृत विश्वविद्यालय, चमुंडी, हरयाणा
- मद्रास संस्कृत कॉलेज, चेन्नई
- संस्कृत कॉलेज तथा विश्वविद्यालय, कोलकाता

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी महाराष्ट्रात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या सततच्या आग्रहाने व प्रेरणेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्री. सुधाकरराव नाईक यांनी ज्ञानयोगी स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांची एक सदस्यीय समिती गठित करून संस्कृत विश्वविद्यालयाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. जिचकार यांनी भारतातील सर्व विश्वविद्यालयांचे अध्ययन करून शासनाला एक विस्तृत अहवाल सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने व इतर शिक्षणशास्त्रतज्ज्ञांच्या अभ्यासाधारे महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला महाराष्ट्र व गोवा येथील शैक्षणिक संस्थांना संलग्नीकरण देण्याचा अधिकार आहे.

The former Prime Minister of India, Hon’ble Shri P.V. Narasimha Rao is a great scholor of Sanskrit, always insisted that Maharashtra has a great tradition of Sanskrit learning hence it should have an independent University. With his encouragement late Chief Minister of Maharashtra Hon’ble Shri Sudhakarraoji Naik took up the issue and appointed Dr. Shrikant Jichkar as one man committee to give a study report for establishing the Sanskrit University in Maharashtra. Dr. Jichkar prepared the study report and non-Formal University Act for the establishment of Sanskrit University in Maharashtra.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within Maharashtra & Goa.

संकाय

Sankayas (Faculties)

वेदविद्या

Faculty of Vedavidya

संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा

Faculty of Sanskrit & other languages

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती

Faculty of Indian Religion, Philosophy & Culture

प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे

Faculty of Ancient Indian Science & Humanities

शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा

Faculty of Education & Miscellaneous Faculties

शैक्षणिक विभाग

Teaching Departments

वेद तथा व्याकरण	Dept. of Veda & Vyakarana
संस्कृत भाषा तथा साहित्य	Dept. of Sanskrit Language & Literature
दर्शनशास्त्र	Dept. of Darshanshastra
वेदांग ज्योतिष	Dept. of Vedanga Jyotisha
शिक्षणशास्त्र	Dept. of Education

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Vyavasthapan Parishad (Management Council)

2019-2020

	Section	Details	Name of the Person	Position
01	25 (2) i	Kulaguru–Adhyaksha	Prof. Shrinivasa Varakhedi Hon'ble Vice-Chancellor KKSU, Ramtek	Ex-officio Member
02	25 (2) ii	Sama-Kulaguru-Sadasya	Vacant	Ex-officio Member
03	25 (2) iii	One Adhishthata as prescribed by Statutes	Prof. Nanda J. Puri Department of Sanskrit Sahitya, KKSU, Ramtek	Member
04	25 (2) iv	One Person nominated by the Kuladhipati preferably from amongst the members of the Sanskrit SthayiSamiti of the Government of Maharashtra.	Prof. Amba Kulkarni Department of Sanskrit Studies University of Hyderabad	Member
05	25 (2) v	One member of the Maharashtra Legislative Assembly to be nominated by the Speaker of the Maharashtra Legislative Assembly.	Vacant	Member
06	25 (2) vi	One member of the MLC to be nominated by the chairman of the MLC	Shri. Girish B. Vyas MLC, Nagpur Local Authorities Council	Member
07	25 (2) vii	The Secretary, Higher Education or his nominee not below the rank of Deputy Secretary	Principal Secretary, Higher Education	Member
08	25 (2) viii	The Director of Higher Education or his nominee not below the rank of Joint Director of Higher Education	Director, Higher Education, Pune	Member
09	25 (2) ix	One Head of the University Department as prescribed by statutes	Dr. Harekrishna Agasti, Department of Ved & Vyakrana, KKSU, Ramtek	Member
10	25 (2) x	One Head of a college, institute, or Pathashala as prescribed by statutes.	Dr. Bhau Dandade, Principal, CISFA College, Nagpur	Member
11	25 (2) xi	One teacher from the University Departments as Prescribed by statutes.	Prof. Kavita S. Holey, Department of Sanskrit Language and Literature, KKSU, Ramtek	Member
12	25 (2) xii	One teacher who is not principal from amongst the teacher of the affiliated colleges and recognised institutions with ten year teaching experience as prescribed by statutes.	Vacant	Member

13	25 (2) xiii	One Adhyaksha of Adhyayan Mandala as prescribed by statutes	Prof. Krishnakumar Pandey, Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Ramtek	Member
14	25 (2) xiv	One member of the Vidvat Parishad nominated by the Kulaguru	Prof. Madhusudan Penna Dean, Faculty of Indian Religion, Philosophy and Culture, KKSU, Ramtek	Member
15	25 (2) xv	Sanchalaka – Niyojana-Vikasa Mandala	Prof. Vijaykumar C.G (I/C), Faculty of Vedanga Jytish, KKSU, Ramtek	Ex-officio Member
16	25 (3)	Kulasachiva – Secretary	Prof. Vijaykumar C.G.(I/C), KKSU, Ramtek	Ex-officio Member
17	25 (4)	Vitta-Lekha Adhikari	Dr. Ramchandra J. Joshi, Finance Officer, KKSU, Ramtek	Permanent Invitees
18	25 (4)	Pariksha Niyantraka	Dr. Umesh D. Shivhare, Controllar of Examination KKSU, Ramtek	Permanent Invitees

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Academic Council Academic Council (2019-20)

Sr. No.	Clause	Provisions	Name of the members
1	27 (2) (a)	The *Kulaguru*– Chairman	**Prof. ShrinivasaVarkhedi**
2	27 (2) (b)	The *Sama-Kulguru*	--
3	27 (2) (c)	**The *Adhishthatas*of the *Sankayas*:**	
		1. Ved-Vidya	Prof. C. G. Vijayakumar
		2. *Sanskrit TathaSanskritetarBhasha*	Prof. Nanda J. Puri
		3. Bharatiya Dharma Tatvadnyan Tatha Sanskruti	Prof. Madhusudan Penna
		4. Prachin Bhartiya Vidyan Tatha Manvyashastre	Prof. Krishnakumar Pandey
		5. Shikshanshastra Tatha Sankirna Vidyashakha	Prof. Lalita Chandratrey
4	27 (2) (d)	**The *Adhyakshas*of the *Adhyayan Mandalas*:**	
		1. Board of Studies for Veda	Prof. C. G. Vijayakumar
		2. Board of Studies for *Vyakarana*	Prof. C. G. Vijayakumar
		3. Board of Studies for Sanskrit Language and Literature	Prof. Nanda Puri
		4. Board of Studies for Pali Prakrit and Modern Languages & Literature	Prof. Nanda Puri
		5. Board of Studies for Foreign Languages and Literature	Prof. Madhusudan Penna
		6. Board of Studies for Kirtanshastra	Dr. Dilip Dabir
		7. Board of Studies for *Darshanashastra*	Prof. Madhusudan Penna
		8. Board of Studies for Yoga and Alternative Therapy Methods	Dr. Kalapini Agasti
		9. Board of Studies for *Dharmashastra* and Ancient Indian *Vidhishastra*(Jurisprudence)	Prof. Madhusudan Penna
		10. Board of Studies for Visual Arts	Dr. Bhau Dandade
		11. Board of Studies for Performing Arts	Dr. Dinakar Marathe
		12. Board of Studies for VedangJyotish and Vastushastra	Prof. Krushnakumar Pandey
		13. Board of Studies for Humanities	Dr. Prasad Gokhale

		14. Board of Studies for Social Science and Social work	Dr. Hrushikesh Dalai
		15. Board of Studies for Psychology	Dr. Parag Joshi
		16. Board of Studies for Ancient Indian Sciences	Prof. Krishnakumar Pandey,
		17. Board of Studies for Education	Prof. Lalita Chandratrey
		18. Board of Studies for Administrative Services	Dr. Harekrushna Agasti
		19. Board of Studies for Hospitality Studies & Travel & Tourism	Prof. Kavita Holey
		20. Board of Studies for Library & Information Science	Dr. Deepak Kapade
		21. Board of Studies for Computer Science and Application	Prof. Lalita Chandratrey
		22. Board of Studies for Commerce & Business Administration	Dr. Kirti Sadar
	27 (2) (e)	The *Sanchalaka* of the *Vistar Seva Mandal*	Prof. Krushnakumar Pandey
	27 (2) (f)	One principal each of the conducted or affiliated colleges, institutions or *pathashalas* to be nominated by rotation.	Dr. Sikandar Manware
	27 (2) (g)	One professor from amongst the professors in the university departments or institutions, nominated by the *Kulaguru*	Dr. Dharmendra Turkar
	27 (2) (h)	One teacher representing each faculty to be coopted by the *Vidvat-Parishad* from amongst the teachers having not less than 10 years teaching experience, other than Principals of colleges, Heads of university departments and Heads of recognized institutions.	1) Dr. Parag Joshi 2) Dr. RajshreeMeshram 3) Dr. Prasad Gokhale
	27 (2) (i)	One head of an academic services unit of the university, nominated by the *Kulaguru.*	Sau. AnaghaAmbekar
	27 (2) (j)	Two scholars nominated by the *Kuladhipati*from amongst the Sanskrit institution in the State.	1.Dr. Prasad Joshi 2. Vacant
	27 (2) (k)	Two eminent Sanskrit scholars nominated by the *Kulaguru*	Dr. Manmohan Upadhyaya Dr. Lalitkumar Tripathi
	27 (2) (l)	The Director of Higher Education, Maharashtra State or his nominee not below the rank of Joint Director, Higher Education or his nominee.	Dr. Maheshkumar Salunkhe
	27 (2) (m)	Honorary Sanskrit Organizer, if any, of the Government of Maharashtra	Vacant
	27 (3)	The *Kulasachiva*shall act as the Secretary.	Prof. C. G. Vijayakumar (I/c)

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Planning and Development (BPD)

Sr.No.		Members Name	Position
1	Kulaguru-Adhyaksha	**Prof. Shrinivasa Varakhedi** Hon'ble Vice-Chancellor.	Chairperson
2	Sama-Kulaguru if any (The Pro-Kulaguru)	**----**	Member
3	One Dean of Faculty, nominated by the VidvatParishad	**Prof. Krishnakumar Pandey,** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Ramtek	Member
4	One Head or Director from amongst the Heads or Directors of the University Institutions or departments, not below the rank of Professor and who is not a Dean nominated by VidvatParishad.	**Prof. Lalita Chandratre,** Dean, Faculty of Education and other Branches of Learning, KKSU, Ramtek.	Member
5	One teacher imparting post-graduate instruction having not less than sixteen years of teaching experience, nominated by Kulaguru.	**Prof. Kavita Holey,** Professor, Faculty of Sanskrit and other Languages, KKSU, Ramtek.	Member
6	One teacher imparting under-graduate institution having not less than sixteen year of teaching experience, nominated by VyavasthapanaParishad.	**Dr. Harekrushna Agasti,** Associate Professor, Department of Veda and Vyakarana, KKSU, Ramtek.	Member
7	One principal of an affiliated College of Sanskrit, nominated by the VyavasthapanaParishad from among the principal who are members of the VidvatParishad.	**Dr. Kirti Sadar,** Principal, Kalidas University's B.Ed. College,Ramtek.	Member
8	One principal of an affiliated professional College nominated by Kulaguru.	**Dr. Bhau Dandade,** Principal, Central India School of Fine Arts, Nagpur.	Member
9	Two experts, co-opted by the Board from amongst the Heads of National and State Level research institutions.	**Prof. Rajaram Shukla,** Vice-chancellor, Sampurnanand Sanskrit University, Banaras.	Member
10		**Prof. Mohan Khedkar,** VNIT, Nagpur.	Member
11	Sanchalaka of Niyojana-Vikasa Mandala-Member Secretary,	**Dr. Prasad Gokhale,** Director (I/c), B.P.D., KavikulaguruKalidas Sanskrit University, Ramtek.	Member Secretary

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Examination

Sr. No	Name	Position
01	**Dr. Shrinivasa Varkhedi,** Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kaldas sanskrit University Ramtek	Chairman
02	**Dr. Nanda Puri** Dean, Faculty of Sanskrit & other languages Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
03	**Dr. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & Culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
04	**Dr. C.G. Vijaykumar** Dean, Faculty of Ved Vidya Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
05	**Dr. Krishnakumar Pandey** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
06	**Dr. Lalita Chandratre** Dean, Faculty of Education and Sankirna Vidya shakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
07	**Dr. Hrushikesh Dalai**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
08	**Dr. Shivram Bhatt**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
09	Hon'ble **Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
10.	**Dr. Umesh Shivhare** Controller of Examination Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member-Secretary

वेद तथा व्याकरण विभाग

स्थापना	–	वर्ष 2000
संकाय	–	वेदविद्या संकाय
अभ्यासक्रम	–	एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. शास्त्री, आचार्य तथा विद्यावारिधी इ. (वैदिक साहित्य, व्याकरणशास्त्र)
अधिष्ठाता	–	प्रो. डॉ. विजयकुमार सी. जी.
विभाग प्रमुख	–	डॉ. हरेकृष्ण अगस्ती, सहयोगी प्राध्यापक
सहायक प्राध्यापक	–	डॉ. शिवराम भट्ट (धारणाधिकारावर), डॉ. जयवंत चौधरी, प्रा. अमित भार्गव, प्रा. कार्तिक भागवत

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या –

उद्देश –

- प्राचीन वैदिक साहित्याचे अध्ययन–अध्यापन व संशोधन करणे.
- आधुनिक विज्ञान वा अन्य शाखांशी वैदिक साहित्याचे आंतरविद्याशाखीय अध्ययन व संशोधन करणे.
- वेदांगांचे अध्ययन व संशोधन करणे.
- व्याकरणशास्त्राचे पारंपरिक गुरूकुल पद्धतीने अध्यापन व संशोधन करणे.
- शास्त्रांचे संरक्षण, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण करणे.
- संस्कृत संभाषण शिबिरांच्या माध्यमातून संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- नव्य आणि प्राचीन व्याकरणावर आधारित संशोधनास प्रोत्साहन देणे.
- संस्कृत व्याकरणाच्या दुर्मीळ हस्तलिखितांचे विद्यावारिधी पदवीसाठी संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.
- विभागातील प्राध्यापकांचे महद् संशोधन प्रकल्पासाठी योगदान.
- गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी तज्ज्ञ विद्वज्जनांची व्याख्याने पीएच्.डी संशोधनासाठी आयोजित करणे.
- व्याकरणाचे शास्त्रीय ग्रंथ ई–पुस्तक स्वरूपात उपलब्ध करवून देणे.
- आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे.
- वर्तमानयुगातील गरजा लक्षात घेवून संशोधनक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने संशोधक छात्रांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

वेद तथा व्याकरण विभाग

1) संस्कृत संभाषण वर्ग :

विद्यार्थी व जनसामान्यांमध्ये संस्कृतभाषेविषयी रुचि निर्माण करणे व संस्कृत संभाषण कौशल्य संपादन करणे या हेतूने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे दिनांक 24.09.2019 ते 03.10.2019 या कालावधित निःशुल्क संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या संभाषण वर्गाचे उद्घाटन विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरु आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या हस्ते करण्यात झाले. . दिनांक 24.09.2019 रोजी विश्वविद्यालयाच्या रामटेक शैक्षणिक परिसरात संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले . उद्घाटन सत्रात अध्यक्षस्थानी वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता तसेच विद्यापीठाचे बी.पी.डी. संचालक डॉ. विजयकुमार सी. जी. हे उपस्थित होते. संभाषण वर्गाचे समन्वयक तसेच वेद तथा व्याकरण विभागाचे प्राध्यापक डॉ. हरेकृष्ण अगस्ती ही उपस्थित होते. उद्घाटनसत्राच्या आरंभी डॉ. अगस्ती यांनी संभाषण वर्गाच्या प्रास्ताविकाद्वारे आयोजनाची उद्दीष्टे सांगितली . संभाषण वर्गाचे उद्घाटक माननीय कुलगुरु आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी संस्कृत संभाषणाचे फ़ायदे तसेच संस्कृत भाषेच्या प्रसाराकरिता संस्कृत भाषेचे ज्ञान का आवश्यक आहे या विषयी सांगितले . त्यांनी सांगितले कि संस्कृत भाषेचे शब्दभांडार एवढे प्रचंड आहे की, त्याची माहिती घ्यायला एक आयुष्य पुरे पडणार नाही . त्यांनी म्हटले कि प्राचीन काळापासूनच संस्कृत ही अखिल भारताची भाषा म्हणून ओळखली जात होती. काश्मीरपासून लंकेपर्यंत व गांधारपासून मगधापर्यंतचे विद्यार्थी नालंदा, तक्षशीला, काशी आदी विद्यापिठांतून अनेक शास्त्रे आणि विद्या यांचे अध्ययन करत असे . या भाषेमुळेच कैय्यट, मम्मट या काश्मिरी पंडितांचे ग्रंथ थेट रामेश्वरपर्यंत प्रसिद्ध पावले. आयुर्वेदातील चरक हा पंजाबचा, सुश्रुत वाराणसीचा, वाग्भट सिंधचा, कश्यप काश्मीरचा आणि वृंद महाराष्ट्राचा; पण संस्कृतमुळेच हे सर्व भारतमान्य झाले. संस्कृत भाषेचे महत्व व मनुष्याच्या जीवनावर संस्कृत संभाषाणाचा कसा प्रभाव होतो असे मत डॉ. विजयकुमार सी.जी. यांनी अध्यक्षीय भाषणात प्रतिपादित केले. संस्कृत भाषेच्या अध्ययनाने व संभाषणाने मनुष्याचा सर्वांगिन विकास होतो असे मत मा. अध्यक्षांनी मांडले. उद्घाटन सत्राचे संचालन व आभारप्रदर्शन वेद तथा व्याकरण विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. शिवराम भट्ट यांनी केले.

संस्कृत संभाषणवर्गात रामटेक परिसरातील एकूण १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. दहादिवसव्यापी हा वर्ग रोज दु. 12.00 ते 02.00 या वेळेत आयोजित करण्यात आला होता. वर्ग शिक्षक म्हणून वेद तथा व्याकरण विभागातील प्राध्यापक तसेच दिव्याणी व वैष्णवी या दोन विद्यार्थ्यांनी सहभागींचे मार्गदर्शन केले. संभाषण कौशल्य अधिगत होण्यासाठी संस्कृत भाषेचा विविध प्रयोग, विभक्तिंचे योग्य नियोजन, दैनंदिन व्यवहारात येणारे शब्द, संवाद कौशल्य, वाक्य रचना, संस्कृत गीते, वर्णोच्चारण पद्धति, सुभाषित पठन, भगवद्गीता पठन इत्यादि विविध विषयांवर विद्यार्थ्यांचे संभाषण विषयी कौशल्य तसेच आत्मविश्वास वाढविण्यास या वर्ग शिक्षकांनी श्रम घेतले. विश्वविद्यालयाच्या तज्ञ प्राध्यापकांद्वारे विविध शास्त्रीय विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

संस्कृत संभाषण वर्गाचे समापन दिनांक 19.07.2017 रोजी आयोजित करण्यात आले होते. समापन कार्यक्रमात प्रमुखातिथी म्हणून वेद विद्या संकाय प्रमुख डा. विजय कुमार हे उपस्थित होते. संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी स्वतः वेळ द्यायला हवा . संस्कृत संभाषण वर्गाचे निःशुल्क आयोजन तसेच संभाषणाची स्वतःपासून केलेली सुरुवात हे या भाषेचा प्रचार व प्रसारासाठी मोठी सेवा होईल असे मत त्यांनी मांडले . दहादिवसांच्या संभाषणवर्गाचे अहवाल तसेच प्रास्ताविक संभाषण वर्गाचे समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी सादर केले. संभाषण वर्गात सहभागी विद्यार्थ्यांनी वर्गाविषयी स्वानुभूति प्रकट केली. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग व विभागाच्या चोख नियोजनामूळे दहा दिवसांचा संस्कृत संभाषण वर्ग यशस्वीपणे पार पडला.

2) ग्रन्थप्रदर्शिनी

दिनांक 27.08.2019 रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे ग्रंथालय विभागाच्या मदतीने ग्रंथप्रदर्शचे आयोजन करण्यात आले होते. वेद व व्याकरणसंबधी सर्व ग्रंथ प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आले होते. या ग्रन्थप्रदर्शनीचे उद्घाटन क.का. संस्कृत विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरु आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या हस्ते झाले. यावेळी वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सी.जी.विजयकुमार, सर्व संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व वेद तथा व्याकरण विभागाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. एम.ए. संस्कृत वेद व व्याकरण शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी व व्याकरण विषयात शोध करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी याचा पूर्णपणे लाभ घेतला.

व्याकरण विषयाचे प्राक्शास्त्री प्रथम व द्वितीय वर्ष , शास्त्री प्रथमवर्ष तसेच एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या आधारे अ.क्र., पुस्तकाचे नाव, व्याख्याता, संपादक,टीका,प्रकाशक,विषयसूची, मूल्य अशा प्रकारचे एक प्रारूप तयार करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या . तसेच एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या द्वितीय वर्षाच्या एक एक विद्यार्थ्यांचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांच्या आधारे एका ग्रन्थाच्या किती टीका व टीकाकार आहेत, याबद्दल माहिती भरुन ठेवण्यासाठी सूचना दिल्या होत्या . सुचनेप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी हे काम सुचारुपणे केले. या ग्रन्थ प्रदर्शिनीच्या आयोजनाकरिता वेद व्याकरण विभाग प्रमुख डा.हरेकृष्ण अगस्ति डा. शिवराम भट, डा. जयवन्त चौधरी, डा.कार्तिक भागवत, डा. अमित भार्गव, व समस्त पुस्तकालय विभागाचे सहकार्य लाभले.अशाप्रकारे ही ग्रन्थप्रदर्शिनी पार पडली.

३) समास परिचय कार्यशाळा

दिनांक २४.०९.२०१९ ते ०३. १०.२०१९ या कालावधित कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे सप्तदिवसीय समास परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे शुभारम्भ वेद विद्या संकाय प्रमुख डॉ. सी, जी. विजय कुमार यांच्या हस्ते झाले. भारतीय दर्शन संकायाचे संकायप्रमुख डॉ, मधूसुदन पेन्ना हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. आपल्या अतिथी भाषणमध्ये मा. पेन्ना यांनी समास अध्ययनाचे प्रयोजन सगळ्यांना सांगितले.

कार्यशाळेच्या आध्यक्षीय भाषणानन्तर मा. विजयकुमार सरांनी समासांचा परिचयात्मक वर्ग घेतला. या सप्तदिवसीय कार्यशाळेच्या २५.०९.२०१९ रोजी हैद्राबाद येथून आलेले श्री अनिल कुमार यांनी प्रात्यक्षिकांच्या द्वारे **संगणकाच्या माध्यमाने व्याकरणाध्ययन** या विषयावर वर्ग घेण्यात आला. वेद तथा व्याकरण विभागातील प्राध्यापक डॉ. हरेकृष्ण अगस्ति तसेच डॉ. जयवन्त चौधरी, तसेच कार्तिक भागवत यांनी समास विधायक सुत्रांचे दृष्य श्रव्य माध्यमांनी सात दिवस वर्ग घेतले.

कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी मा. विजयकुमार यांनी परिक्षा स्वरुपात व्योमल्याब् (vyomalab) सी. डी. द्वारे स्थालीपाक – न्यायाने सात दिवस शिकविलेल्या सम्पुर्ण भागाचे परिक्षण केले. या कार्यशाळेत एकून ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

समारोपसत्रामधे मा. कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी महोदय उपस्थित होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे समास विषयक अपेक्षित उत्साहवर्धक भाषण केले. त्यांच्या भाषणाने विद्यार्थी व्याकरणाच्या दिशेने प्रेरित झाले. कार्यशाळेच्या उद्घाटनसमारोहात विभाग प्रमुख डा. हरेकृष्ण अगस्ति यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेच्या माध्यमाने संस्कृत विषयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना समास विषयक ज्ञान मिळावे ह्या हेतुने ही कार्यशाळा पार पडली.

४) अनुसंधान बैठक

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे व्याकरण व वेद विषयात शोध करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता दिनाङ्क १४.०२.२०२० रोजी अनुसंधान बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या अनुसंधान बैठकीमध्ये वेद तथा व्याकरण विभागात M.phil व Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता . सर्व शोध करणाऱ्या विद्यार्थ्यांनी PPT च्या माध्यामाने त्यांनी आता पर्यन्त झालेल्या त्यांच्या शोधाची रुपरेषा मांडली. या अनुसंधान बैठकीत सर्व मार्गदर्शक व विभागातील सर्व शिक्षक ही उपस्थित होते. या अनुसंधान बैठकीत एकूण ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला

५) विशेष व्याख्यान

दिनाङ्क ०५.११. २०२० रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे व्याकरण व वेद विषयात अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता Online Sanskrit Tools या विषयावर हैदराबाद येथून आलेले श्री अनिल जी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना, शास्त्राध्यायन करणाऱ्या विद्यार्थ्यांना व शोधकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन असलेले संस्कृतचे साहित्य कुठे कुठे आहे या विषयीची माहिती व संस्कृत टायपिंग कशी करावी या विषयीचे मार्गदर्शन दिले.

6) विशेष व्याख्यान

दिनांक 09.08. 2019 कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे व्याकरण व वेद विषयात अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता हैदराबाद विद्यापीठातील संस्कृत विभागप्रमुखा प्राध्यापिका डा. अंबा कुलकर्णी यांचे **संसाधनी** COMPUTATIONAL TOOLKIT या विषयावर विशेष व्याख्यान ठेवण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यापीठाचे माननीय कुलगुरू श्रीनिवास वरखेडी जी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. हैदराबाद विद्यापीठातील संस्कृत विभाग भारतीय व्याकरण परंपरेनंतर संस्कृत ग्रंथाच्या विश्लेषणासाठी विविध संगणकीय साधने विकसित करण्यात कार्यरत आहे. या सादरीकरणाद्वारे त्यांनी संकेतस्थळावरील उपलब्ध साधनांची थोडक्यात माहिती दिली. पद, पद परिचय, समस्त पदपरिचय आणि कारक, अन्वय दर्शविणाऱ्या विश्लेषणामुळे मजकूर अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यात मदत होते हे त्यांनी सांगितले. संसाधनी या वेब साईट वर हिंदी, इंग्रजी भाषांतर असलेले संपूर्ण संक्षिप्त रामायण श्रीमद्भगवद्गीता इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहे . या वेब साईटचा आपण कशा प्रकारे वापर करून घेवू शकतो हे त्यांनी प्रयोगाच्या माध्यमाने सांगितले.

7) एस . ए . डांगे स्मृति व्याख्यानमाला (वेबिनार)

कविकुलगुरुकालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे दिनांक 07,08,09-6-2020 रोजी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदीच्या काळात ऑनलाइनच्या माध्यमाने एस . ए . डांगे स्मृति व्याख्यानमालेचे आयोजन कराण्यात आले. या व्याख्यानमाले अंतर्गत दिनांक 07 रोजीचे व्याख्यान आय.आय. टी. मद्रासचे प्रोफेसर के.एस.कन्नन यांनी The theories of Karakas या विषयावर दिले. दिनांक 08 रोजी आय.आय.टी मुंबईचे प्रोफेसर डा. मल्हार कुलकर्णी यांनी Significant phenomenon in the paninian grammatical tradition during the 16th and 17th century. या विषयावर दिले. तसेच दिनांक 09 रोजी प्राध्यापक ललित कुमार त्रिपाठी यांनी ध्वनिविज्ञानदृष्ट्या अवर्णविचार: या विषयावर आपले वक्तव्य दिले.

श्रीपाद अमृत डांगे (10 ऑक्टोबर 1899 - 22 मे 1991) हे भारतीय कम्युनिस्ट पार्टी (सीपीआय) चे संस्थापक सदस्य आणि भारतीय कामगार संघटनेच्या चळवळीतील प्रमुख होते. ब्रिटीश राजवटीदरम्यान, डांगे यांना कम्युनिस्ट आणि कामगार संघटनांच्या कारणास्तव ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अटक केली आणि एकूण 13 वर्षे तुरुंगात टाकले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, चीन-सोव्हिएटचे विभाजन, चीन-भारतीय युद्ध, आणि तुरूंगात असताना डांगे यांनी ब्रिटिश सरकारला पत्र पाठवून त्यांना सहकार्याची ऑफर दिली, यासारख्या घटनांची मालिका आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षात मतभेद निर्माण झाले. ते सुप्रसिद्ध लेखक देखील होते आणि भारतातील पहिले समाजवादी साप्ताहिक समाजवादी संस्थापक होते. महाराष्ट्र राज्य निर्मितीत डांगे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

ZOOM च्या माध्यमाने घेतलेल्या या व्याख्यानमालेला एकूण 1265 श्रोत्यांनी पंजीकरण केले होते. त्यापैकी प्रत्यक्ष व्याख्यानमालेला जवळपास 900 श्रोते उपस्थित होते. तीन ही दिवस व्यांख्यानमाळेचे अध्यक्षपद विश्वविद्यालयाचे कुलगुरू माननीय आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. व्याख्यानमालेची प्रस्तावना वेद तथा व्याकरण विभागाचे संकाय प्रमुख डा. सी. जी. विजयकुमार, वेदस्तवन अमित भार्गव , मान्यवरांचा परिचय डा. जयवंत चौधरी या विभागातील प्राध्यापकांनी केले, तशेच संपूर्ण व्याख्यानमालेचे सूत्र संचालन विभागप्रमुख डा. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले.

8) ऑनलाइन आन्तरराष्ट्रीय वेबिनार

कविकुलगुरुकालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे दिनांक 02-05-2020 रोजी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदीच्या काळात ऑनलाइनच्या माध्यमाने ऑनलाइन आन्तरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या आन्तरराष्ट्रीय वेबिनारला प्राध्यापिका अंबा कुलकर्णी राष्ट्रीय विद्यापीठ हैदराबाद, प्राध्यापक गिरिशनाथ झा जे. एन. यू . दिल्ली , प्राध्यापिका शिवानी व्ही कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, तसेच डा. साई सुसरला वैदिक विज्ञान महाविद्यालय एमआयटी पुणे, हे मान्यवर व्याख्याते म्हणून उपस्थित होते. या सर्व व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना उपयोगी असे ऑनलाइन संस्कृतचे साहित्य, विविध संस्कृत साहित्याच्या लिंक्स, आतापर्यंत ऑनलाइन संस्कृतचे झालेले कार्य इत्यादि विषयांवर आपले वक्तव्य दिले. या ऑनलाइन आन्तरराष्ट्रीय वेबिनारचे अध्यक्षपद विश्वविद्यालयाचे कुलगुरू माननीय आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. प्रस्तावना वेद तथा व्याकरण विभागाचे संकाय प्रमुख डा. सी. जी. विजयकुमार, वेदस्तवन अमित भार्गव , मान्यवरांचा परिचय डा. जयवंत चौधरी या विभागातील प्राध्यापकांनी केले, तशेच संपूर्ण व्याख्यानमालेचे सूत्र संचालन विभागप्रमुख डा. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले.

.....

अतिरिक्त कार्यभार

	डा. हरेकृष्ण अगस्ती	
१.	सह समन्वयक	एक भारत श्रेष्ठ भारत
२.	विभाग प्रमुख	वेद तथा व्याकरण विभाग
३.	विशेष कर्तव्य अधिकारी	कुलगरू कार्यालय
डा. जयवंत चौधरी		
१.	समन्वयक	छात्र कल्याण विभाग
२.	समन्वयक	धिषणा परिषद्
प्राध्यापक अमित भार्गव		
1.	सह समन्वयक	धिषणा परिषद्
प्राध्यापक कार्तिक भागवत		
1.	समन्वयक	शास्त्रार्थ परिषद्

विद्यार्थी सहभाग

क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	वर्ग	कार्यक्रमाचे नाव	स्पर्धेचे नाव	पारितोषिक
1.	वितराग वसवाडे	आचार्य द्वि. वर्ष	मुंबई करिता शास्त्र निवडफेरी	जैन बौद्धदर्शन भाषण	प्रथम
2.	आकाश पाटील	शास्त्री द्वि. . वर्ष	मुंबई करिता शास्त्र निवडफेरी	वेद भाषण	प्रथम
3.	विशाल गोरे	शास्त्री द्वि. . वर्ष	मुंबई करिता शास्त्र निवडफेरी	व्याकरण शलाका	प्रथम
4.	हिमांशु वैष्णव	प्राक्शास्त्री द्वि. वर्ष	मुंबई करिता शास्त्र निवडफेरी	अमरकोश कंठपाठ	प्रथम
५.	विशाल गोरे	शास्त्री द्वि. . वर्ष	National Human Rights commission	Short Internship Program	सहभाग
६.	सिमरण ठाकूर	शास्त्री प्र . वर्ष	युवा महोत्सव	सुगम संगीत	द्वितीय
७.	राजरत्न बेडेकर	शास्त्री द्वि. . वर्ष	युवा महोत्सव	शास्त्रीय वाद्य	तृतीय
८.	निरंजन गुरव	शास्त्री प्र . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	लोक नृत्य	सांत्वना
९.	मृणाल फडणवीस	आचार्य प्र . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	लोक नृत्य	सांत्वना
१०.	वितराग वसवाडे	आचार्य द्वि. वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	लोक नृत्य	सांत्वना

११.	राजरत्न बेडेकर	शास्त्री द्वि. . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	लोक नृत्य	सांघना
१२.	आकाश पाटील	शास्त्री द्वि. . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	लोक नृत्य	सांघना
13.	निरंजन गुरव	शास्त्री प्र . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	एकांकिका	तृतीय
14.	वितराग वसवाडे	आचार्य द्वि. वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	एकांकिका	तृतीय
15.	मृणाल फडणवीस	आचार्य प्र . वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	एकांकिका	तृतीय
16.	वितराग वसवाडे	आचार्य द्वि. वर्ष	अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह , तिरुपति	संस्कृत प्राविधिकी	सहभाग
17.	वितराग वसवाडे	आचार्य द्वि. वर्ष	महाराष्ट्र प्रांतीय संस्कृत शास्त्रीय वाक्प्रतिस्पर्धा, मुंबई	जैन बौद्धदर्शन भाषण	प्रथम
18.	आकाश पाटील	शास्त्री द्वि. . वर्ष	महाराष्ट्र प्रांतीय संस्कृत शास्त्रीय वाक्प्रतिस्पर्धा, मुंबई	वेद भाषण	प्रथम
20.	हर्ष शर्मा	प्राक्शास्त्री द्वि. वर्ष	वेध -2020 नागपुर	देशभक्ती समूह नृत्य	सहभाग
21.	चन्द्रशेखर मिश्रा	प्राक्शास्त्री द्वि. वर्ष	वेध -2020 नागपुर	देशभक्ती समूह नृत्य	सहभाग
22.	श्रेयस जदूवंशी	शास्त्री द्वि. . वर्ष	यशवंत चव्हान प्रतिष्ठान	यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा	सहभाग
23.	अकाश पाटील	शास्त्री द्वि. . वर्ष	यशवंत चव्हान प्रतिष्ठान	यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा	सहभाग
24.	अकाश पाटील	शास्त्री द्वि. . वर्ष	शेठ महाविद्यालय केसरमल पोरवाळ महाविद्यालय, कामठी	वादविवाद स्पर्धा	सहभाग

या व्यतिरिक्त प्रत्येक आठवड्याच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारी 3 ते 5 या कालावधीत छात्र कल्याण विभागाद्वारे धिषणा परिषदेचे आयोजन केले जाते . या परिषदेमध्ये दर शुक्रवारी विश्वविद्यालयातील सर्व विभागातील काही विद्यार्थी आपआपल्या शास्त्राचे विषय घेवून भाषण करतात . या परिषदेमध्ये दर शुक्रवारी व्याकरण विषयाचे विद्यार्थी सुद्धा व्याकरणाचा कोणताही एक विषय चांगल्या प्रकारे पाठ करून आपले विचार मांडतात .

*****

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय

अभ्यासक्रम – 1 आगम संस्कृत, 2 आगम प्राकृत, 3 बी.ए. संस्कृत विशारद, 4 शास्त्री, 5 आचार्य, 6 एम्. ए., 7 एम्. फिल्., 8 विद्यावारिधी, 9 पीएच्. डी., 10 डी. लिट्. इ.

अधिष्ठाता – प्रो. डॉ. नंदा पुरी

विभाग प्रमुख – प्रो. डॉ. कविता होले

सहायक प्राध्यापक – डॉ. पराग जोशी, डॉ. राजेंद्र जैन
डॉ. पल्लवी कावळे, डॉ.राघवेन्द्र भट

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 21

उद्देश –

- प्राचीन संस्कृत साहित्य, भाषा यांचे अध्यापन, संशोधन
- आंतरविद्या शाखीय व तौलनिक अध्यापन, संशोधनास प्रोत्साहन
- संस्कृत भाषा जनसामान्यांपर्यंत, संस्कृतानुरागींना सहज आत्मसात करता यावी यासाठी विशेष आगम, विशारद इ. अभ्यासक्रमांचे अध्यापन
- संस्कृतसह अन्य प्राचीन भाषा प्राकृत, पाली इ. भाषांचे अभ्यासक्रम जिज्ञासूंना उपलब्ध करवून देणे.
- संस्कृतसह जर्मन, फ्रेंच इ. विदेशी भाषांचे पदविका अभ्यासक्रम चालविणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- समकालीन संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र
- आंतरविद्याशाखीय संशोधन
- मार्गदर्शकांसह संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- संशोधक विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय रिसर्च मीट दर दोन महिन्यांनी आयोजित करणे

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच विभागाद्वारे राबविलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल ———

1)कालिदास दिवस समारोह —

आषाढस्य प्रथम दिवसे ' अर्थात् आषाढाचा पहिला दिवस हा महाकवी कालिदास दिन म्हणून सुपरिचित आहे. संस्कृत प्रेमींसाठी विशेष स्मरणीय आहे. दि. 03 जुलै 2019 रोजी कालिदास दिनानिमित्त विश्वविद्यालयाच्या रामटेक येथील मुख्यालयातील प्रांगणात असलेल्या महाकवी कालिदासांच्या स्मारकाला प्रभारी कुलगुरु व संकायप्रमुख डॉ.ललिता चन्द्रात्रे तसेच, मा. संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी यांनी पुष्पांजली अर्पण करुन आदरांजली वाहिली. या प्रसंगी संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी यांनी कालिदास दिनानिमित्ताने कालिदासाचे देश—काळातील साहित्य विषयावर व्याख्यान दिले. यानिमित्ताने त्यांनी कालिदासाचे रामटेकशी असणारे ऋणानुबंध सर्वांसमोर मांडले. प्राकशास्त्री, शास्त्री तसेच आचार्य कक्षेतील विद्यार्थ्यांनी यावेळी कालिदासाच्या मेघदूतम् खण्डकाव्याचे सामूहिक—पठन केले. मा. प्रभारी कुलगुरू यांनी कालिदास दिनानिमित्ताने उपस्थितांना साहित्याध्ययन करण्यासंबंधीचा संदेश दिला कार्यक्रमाचे संचालन सहा. कुलसचिव सौ. कल्याणी देशकर यांनी केले. यावेळी विश्वविद्यालयाचे कुलसचिव, प्रा. सी.जी.विजयकुमार तसेच सर्व सन्माननीय अधिष्ठाते, विभाग प्रमुख, प्राध्यापकगण तसेच शिक्षकेतर सर्व कर्मचारी कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचा दुसरा भाग म्हणून सर्व अध्यापक व विद्यार्थ्यांनी कालिदास स्मारकाला भेट दिली.

2) गुरुपौर्णिमा — सर्वांनी विश्वविद्यालयातील विभागांसोबत विभागीयविद्यार्थ्यांनी दि. 16.7.2018 रोजी गुरुपोर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन रामटेक परिसरात केले. गुरूपौर्णिमा निमित्ताने प्राकशास्त्री, शास्त्री तसेच आचार्यकक्षेतील विद्यार्थ्यांनी यावेळी संगीतमय समूहगान करून गुरूंची मानवंदना केली. कार्यक्रमात वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. नंदा पुरी तसेच अन्य मा. विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमांती पुष्पगुच्छ तसेच ग्रिटींग कार्ड प्रदान करीत सर्व विद्यार्थ्यांनी 'तस्मै श्री गुरवे नमः' या संस्कृतपदांना सार्थक केले. कार्यक्रमाचे विभागीय विद्यार्थ्यांनीच केले होते.

3) संस्कृतसप्ताह समारोह —

दरवर्षी संस्कृतभाषेच्या प्रचार व प्रसाराच्या दृष्टीने विश्वविद्यालयाद्वारे संस्कृसप्ताहाचे आयोजन केले जाते. या वर्षी मा. कुलगुरूंच्याआदेशाने तसेच संकायप्रमुखांच्या मार्गदर्शनाने सप्ताहाचे आयोजन विस्तार सेवा मंडळाच्या वतीने केले. सदर आयोजनात विभागीय प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून सात दिवसांपर्यंत कार्यक्रमाची शोभा वाढविली. दि. 21.08.2019 रोजी सप्ताहाचे पुरस्कार वितरण करण्यात आले.

4) राष्ट्रिय परिसंवाद व शैक्षणिक करार:

संस्कृत भाषा तथा साहित्य विभागातर्फे कालिदास दिननिमित्ताने एकदिवसीय राष्ट्रिय संस्कृत परिसंवादाचे आयोजन दि.१६जुलाई २०१९ रोजी करण्यात आले. प्रमुखातिथी म्हणून एकलव्य संस्कृत अकादमीचे प्रमुख डॉ.मिहिर उपाध्याय यांना आमन्त्रित करण्यात आले होते. परिसंवादाचे अध्यक्षपद मा.संकायप्रमुख प्रा.नन्दा पुरी यांनी भूषविले. विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी या परिसंवादात संस्कृतविषयक मुक्त चर्चा करीत अनेकविषयांच्या ज्ञानाचा लाभ घेतला. यानुषंगानेच, एकलव्य संस्कृत अकादमी सोबत संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाने शैक्षणिक करार केला. कार्यक्रमाच्या ऋणनिर्देशाचे दायित्व डॉ. कविता होले यांनी पार पाडले.

5) संस्कृत काव्य संध्याकार्यक्रम –

संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाद्वारे संस्कृत भाषा प्रचारिणी सभेच्या समन्वयाने संस्कृत काव्य संधेचे आयोजन दि.०३ ऑगस्ट २०१९ रोजी प्रचारिणी सभेत केले. काव्यसंध्येत प्रमुखातिथी म्हणून प्रा.रमाकान्त शुक्ल, व मा.कुलगुरु प्रा.श्रीनिवास वरखेडी यांची विशेषोपस्थिती होती. काव्यसंधेत संस्कृतप्रचारिणी सभेतील काव्यप्रेमींनी तसेच मा.कुलगुरुंसमवेत विश्वविद्यालयातील प्राध्यापकांनी कालिदास व अवांतर विषयांवर कविता प्रस्तुत केल्या. प्रा.रमाकान्त शुक्ल यांनी आपल्या अद्‌भुत कविताकामिनीने सर्वांची मने जिंकली. याच दरम्यान प्रचारिणी सभेच्या वतीने विभागीय प्राध्यापक डॉ. पराग जोशी यांना प्रज्ञा भारती युवा पुरस्काराने सम्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.वीणा गानू यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.रेणुका करंदीकर यांनी केले.

6) संस्कृत अष्टावधान व संस्कृतसेवाव्रती पुरस्कार समारंभ –

दि.१८.८.२०१९ रोजी विश्वविद्यालयाच्या वतीने नागपुरवासियांकरिता तसेच विश्वविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांकरिता परम्परागत अध्ययन पद्धतीतील अष्टावधान कार्यक्रमाचे आयोजन केले. भारतातील सद्यस्थितीत विख्यात श्री आर.गणेशन यांच्या वतीने अष्टावधानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम नागपुरातील आय आय टी त्रिमुर्तिनगर येथे विशाल भवनात घेण्यात आला. सदर अष्टावधान कार्यक्रमाचे समन्वयन विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या दरम्यानच विश्वविद्यालयाचा **संस्कृतसेवाव्रती पुरस्कार प्रा.लीना रस्तोगी** यांना प्रदान करण्यात आला.

6) कालिदास समग्रवाङ्मय प्रकाशन

कविकुलगुरु कालिदास संस्कृत वि"वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभागातील प्राध्यापकांनी कालिदास समग्रवाङ्मय प्रकाशन प्रकल्पामध्ये संपादन तसेच, मराठी अनुवादाचे कार्य पूर्ण केले. सदर वाङ्मयाचे प्रकाशन दि.१० ते १२ जानेवारी दरम्यान आयोजित अखिलभारतीयप्राच्यविद्यापरिषदेत करण्यात आले.

7) अखिलभारतीयप्राच्यविद्यापरिषदेचे आयोजन–

विश्वविद्यालयाच्या वतीने वर्ष १० ते १२ जानेवारी २०२० दरम्यान अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेचे सफल आयोजन केले. सदर परिषदेच्या आयोजनात विविध समित्यांमध्ये विभागीय प्राध्यापकांनी सुरुवाती पासून ते शेवटपर्यंत समर्पणाने कार्य पाहिले. प्राध्यापिका नन्दा पुरी यांनी कल्चरल समितीचे तर, प्राध्यापिका कविता होले यांनी सत्र-व्यवस्थापन समितीचे नेतृत्त्व पार पाडले. डॉ.पराग जोशी व डॉ.राजेन्द्र जैन यांनी अनुक्रमे नामांकन-समिती व आवास-व्यवस्था समितीतील कार्य समर्पक रीत्या पूर्ण केली.

8) मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा विशेषव्याख्यान –

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर येथे अखिलभारतीयप्राच्यविद्या परिषदे दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवाडयाचे आयोजन करण्यात आले होते

कार्यक्रमाचे संचालन डॉ.पल्लवी कावळे हिने केले. तर आभार प्रो.कविता होले यांनी मानले. या कार्यक्रमामध्ये विश्वविद्यालयातील अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी तसेच सहयोगी कर्मचारी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

8) उत्तररामचरितातील नाट्यतन्त्रविषयावर विशेषव्याख्यान –

संस्कृतभाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने दि.१६.१०.२०१९ रोजी उत्तररामचरितनाटकातील नाट्यतन्त्र या विषयावर सेवानिवृत्त संस्कृतप्राध्यापिका सौ.शैलजा रानडे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले. विभागप्रमुखा डॉ.कविता होले यांनी सौ.रानडे यांचा पुष्पगुच्छ देवून विभागाच्या वतीने सत्कार केला. व्याख्यानाचे अध्यक्षीय संकायप्रमुख प्रा.नन्दा पुरी यांनी भूषविले. महानाटककार भवभूती यांच्या नाट्यकलेवर प्रकाश टाकून उत्तररामचरिताचा आद्योपान्त कथा प्रवाह कसा करूण रसाला पुष्ट करीत सामाजिकांच्या चित्तांमध्ये राम व सीता या दैव पात्रांबद्दल असीम आस्था निर्माण करतो व उत्तमकाव्यश्रेणीला गाठतो सौ.रानडे यांनी खुपच रोचक कथा-उपकथानकांच्या माध्यमाने उपस्थितविद्यार्थ्यांना समजविले. विभागीय सर्व प्राध्यापक, शोधविद्यार्थी, आचार्य तसेच शास्त्रीस्तरीय विद्यार्थी या व्याख्यानात उपस्थित राहून उत्तररामचरिताबद्दल यांनी नव्याने रहस्य जाणून घेतली. व्याख्यानाच्या शेवटी मा.विभागप्रमुखांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.राजेन्द्र जैन यांनी केले.

9)शिक्षक दिवस – आयोजन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत वि"वविद्यालयात बुधवारी, दि. 5 सप्टेंबर रोजी ि"क्षक दिनानिमित्त वि"ेष कार्यक्रमाचे आयोजन नागपूर व रामटेक येथे करण्यात आले. दोन्ही परिसरांमध्ये त्या दिवसाचे विभागातील पूर्ण प्रशासन तसेच अध्यापन इत्यादी नियोजन विद्यार्थ्यांनी केले व वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना धडे दिले. विभागीय प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या नियोजित प्रत्येक गोष्टींचे निरीक्षण व योग्य ते मार्गदर्शन केले. दु.दरम्यान ४ वाजता सर्व विद्यार्थ्यांनी विश्वविद्यालयातील सर्व विभागीय प्राध्यापकांना शुभेच्छाप्रदान कार्यक्रमात आमन्त्रित करून पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र प्रदान केली. कार्यक्रमाचे समापन ऐक्य मन्त्राने करण्यात आले.

10) मृच्छकटिकातील नाट्यतन्त्रविषयावर विशेषव्याख्यान –

संस्कृतभाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने दि. १२ मार्च २०२० रोजी **मृच्छकटिकातील नाट्यतन्त्र** या विषयावर संस्कृतप्राध्यापिका डॉ.कावेरी जाधव, सावित्रीबाई पुणे विश्वविद्यालय, पुणे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले. विभागप्रमुखा डॉ.कविता होले यांनी डॉ.कावेरी जाधव यांचा पुष्पगुच्छ देवून विभागाच्या वतीने सत्कार केला. व्याख्यानाचे अध्यक्षीय संकायप्रमुख प्रा.नन्दा पुरी यांनी भूषविले. महानाटककार शुद्रक यांच्या नाट्यकलेवर प्रकाश टाकून मृच्छकटिकाचा आद्योपान्त कथा प्रवाह कसा मुख्य रसाला पुष्ट करीत सामाजिकांच्या चित्तांमध्ये तात्कालिक समाज व खऱ्या प्रेमाबद्दल असीम आस्था निर्माण करतो व उत्तमकाव्यश्रेणीला गाठतो. डॉ.कावेरी जाधव यांनी खुपच रोचक कथा-उपकथानकांच्या माध्यमाने मुख्यकथेत समन्वय साधून उपस्थितविद्यार्थ्यांना समजविले. विभागीय सर्व प्राध्यापक, शोधविद्यार्थी, आचार्य तसेच शास्त्रीस्तरीय विद्यार्थी या

व्याख्यानात उपस्थित राहून मृच्छकटिकाबद्दल यांनी नव्याने रहस्य जाणून घेतली. व्याख्यानाच्या शेवटी मा.विभागप्रमुखांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.राजेन्द्र जैन यांनी केले.

11) ऑनलाईन कोरोना काव्य संगोष्ठी

मा.कुलगुरु प्रो.श्रीनिवास वरखेडी यांच्या तसेच, संकायप्रमुख प्रा.नन्दा पुरी यांच्या मार्गदर्शनात कोविद-१९ लॉकडाउन दरम्यान विभागाच्या वतीने कोरोना विषयक अन्ताराष्ट्रिय कविसंगम ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन दि.२५.०४.२०२० रोजी ११.००ते १:०० पर्यन्त करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद मा.कुलगुरु प्रो.श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. कॅलिफोर्नियातील संस्कृत प्राध्यापक माधव देशपाण्डे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. एकूण ४५ संस्कृत कवींनी कोराना विषयक महामारी बद्दल स्वविरचित संस्कृत कवितांचे प्रस्तुतीकरण केले होते. ऑनलाईन कार्यक्रमात तीनशे इतके सहभागींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.पराग जोशी व डॉ.राजेन्द्र जैन यांनी केले.

12) ऑनलाईन प्रज्ञाभारती श्री.भा.वर्णेकर व्याख्यानमालाकार्यक्रम

संस्कृतभाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने दि. १३ मे ते १५ मे २०२० दरम्यान प्रज्ञाभारती श्री.भा.वर्णेकर व्याख्यानमालेचे आयोजन केले. व्याख्यानमालाकार्यक्रमाचे अध्यक्षपद मा.कुलगुरु प्रा.श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. सदर कार्यक्रमात दरम्यान प्रो.गौरी माहुलीकर,(कुलगुरु, चिन्मय विश्वविद्यालय, केरळ), प्रो.कमलेश चौकसी (निर्देशक व विभागप्रमुख, गुजरात विश्वविद्यालय) तसेच, प्रो.सुन्दरेश्वरन (संस्कृतविभाग, कालिकत विश्वविद्यालय, केरळ) यांची व्याख्याने सम्पन्न झाली. दि.१५ मे रोजी मा.कुलगुरुंच्या उपस्थितीत व्याख्यानमाला कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.पराग जोशी यांनी केले.

13) ऑनलाईन सप्तदिवसीय टेक्स्ट रिडिंग वर्कशॉप-

संस्कृतभाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने दि. ०४ जून ते १० जून २०२० दरम्यान मेघदूत संस्कृत काव्याधारित टेक्स्ट रिडिंग वर्कशॉप चे आयोजन करण्यात आले. विश्वविद्यालयातील संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या प्रमुख प्रा.डॉ.नन्दा पुरी यांनी सप्तदिवसीय कार्यशाळेमध्ये समग्र मेघदूताचे रसपान उपस्थितांना करवून दिले. मा.कुलगुरु प्रा.श्रीनिवास वरखेडी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. एकूण ४०० संस्कृत मेघदूतप्रेमींनी सदर कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यशाळे अंती क्यिझ असेस्मेंट माध्यमाने मूल्यांकन देखील करण्यात आले. सदर कार्यशाळेचे समन्वयन विभागप्रमुखा प्रा. कविता होले यांनी केले होते.

14) ग्रंथालय भेट –

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय व ग्रंथालयातील पुस्तकांविषयक अपेक्षित माहिती मिळण्याकरिता ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय भेटीने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांविषयक माहिती व जागृती निदर्शनास आली. पुस्तकांचे आदान – प्रदान करण्याबाबत ज्ञान मिळाले.

14) प्राध्यापकांचा शैक्षणिक व इतर कार्य आढावा –

शैक्षणिक सर्व 2019–20 मध्ये विभागातील सर्व प्राध्यापकांनी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रिय व राज्यस्तरीय चर्चासत्र व परिषदांमध्ये सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केले व त्याकरिता विविध ठिकाणी भेटी दिल्या. त्यापैकी काही उल्लेखनीय बाबी–

1) विभागातील प्राध्यापिका व संकायाच्या मा. अधिष्ठाता, डॉ. नंदा पुरी यांनी IQAC सेल च्या निर्देशक पदा जबाबदारी सांभाळली. यांची यावर्षातील प्रकाशित पुस्तके –02 शोधपत्रे–06, प्रस्तुत

शोधपत्रे—03. यांच्या मार्गदर्शनात एक Ph.D.विद्यार्थी विद्यार्थ्यांनी शोधकार्य पूर्ण केले. यांनी विविध ठिकाणी (12 ठिकाणी) 'निमन्त्रित व्याख्याता' म्हणून व्याख्याने दिली. सध्या दोन शोधप्रकल्पावर या कार्य करीत आहे. विश्वविद्यालयाच्या विविध प्राधिकारिणी व समितीवर सदस्य/अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले.

2) विभागाच्या प्राध्यापिका डॉ. कविता होले यांनी महाराष्ट्र राज्य कालिदास साधना पुरस्कार समितीच्या छाननी व निवड सचिव पदाचा कार्यभार सांभाळला. त्यांनी विश्वविद्यालयाच्याIQACसमन्वयक पदाचा कार्यभारही या वर्षी सांभाळला. यांची यावर्षातील स्वलिखित पुस्तके 02, सम्पादित पुस्तके—23, प्रकाशित शोधपत्रे—02, प्रस्तुत शोधपत्रे 03, असून 1 विद्यार्थी M.Phil. करिता व 8 विद्यार्थी Ph.D करिता मार्गदर्शनप्राप्त करीत आहे. यांनी विविध (03 ठिकाणी) 'निमन्त्रित व्याख्याता'म्हणून व्याख्याने दिली. सध्या दोन शोधप्रकल्पावर संशोधनासाठी त्यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

3) डॉ. पराग जोशी यांनी कुलगुरु कार्यालय शैक्षणिक अधिकारी म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळला. यांना संस्कृतभाषा प्रचारिणी सभा, नागपूर च्या वतीने प्रज्ञाभारती युवा कवि पुरस्कार २०१९ प्रदान करण्यात आला. समग्र कालिदास वाङमय प्रकाशन संबधित प्रकल्प यांच्या समन्वयनाने पूर्ण झाला.

यांची यावर्षातील सम्पादित पुस्तके—9, प्रकाशित लेख 9 व शोधपत्रे 07, प्रस्तुत शोधपत्रे 07 असून यांनी आमंत्रित व्याख्याता म्हणून 17 ठिकाणी व्याख्याने दिली. संस्कृत करिता एलओसीएफ पोलिसी विकसित करण्यात यांनी योगदान दिले.

4)डॉ.राजेन्द्र जैन हे सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून यांनी पीएच.डी. व एम्. फिल्. शोधविद्यार्थ्यांचे कोर्सवर्क समन्वयक म्हणून कार्यभार पाहिला. विद्यापीठ स्वयम समन्वयक तसेच, टीसीएसआयऑन ग्लासरूम लर्निंगचे लर्निंग ऑफिसर म्हणून देखील कार्यभार यांना देण्यात आला. यावर्षातील यांची प्रकाशित पुस्तके 01,शोधपत्रे 02, प्रस्तुत शोधपत्रे 02, आहेत.

15. विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षीसे— खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुरस्कार व बक्षीसे प्राप्त करुन यश संपादित केले.

अमृता बरबडीकर या एम.ए. प्रथमवर्षीय विद्यार्थिनीने डिसेंबर२०१९ मध्ये संस्कृतसाहित्यात नेट (राष्ट्रीयपात्रतापरीक्षा) उत्तीर्ण केली.तसेच, विभागाची एमफिल विद्यार्थिनी सौ.सुवर्णा केवटे हिला युजीसीची ओबीसी शिष्यवृत्ती मंजूर झाली. विश्वविद्यालयात २०१८-१९ पासून शोधविद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती अन्तर्गत वर्ष २०१९-२० वर्षी कु.वेदश्री आर्वीकर हिला पीएच.डी करिता तर, प्रज्ञा करकरे हिला एम.फिल करिता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

तिरुपती येथील राष्ट्रियसंस्कृतविद्यापीठात प्रतिवर्षीप्रमाणे गेल्यावर्षी दि. 28.01.2020 ते 31.01.2020 पर्यंत आयोजित झालेल्या 14व्या अखिलभारतीय संस्कृत छात्र प्रतिभा समारोहात कु. अमृता बरबडीकर, भक्ती पुरंदरे, वैदेही कुलकर्णी (एम्.ए.प्रथम वर्ष) हिने एकपात्राभिनय स्पर्धेत भाग घेऊन तृतीयक्रमांक व प्रमाणपत्र पुरस्कार प्राप्त केला. याच स्पर्धामधील लोकनृत्यस्पर्धामध्ये अमृता बरबडीकर, भक्ती पुरंदरे तसेच, वैदेही कुलकर्णी व प्राची पाटोडकर हिला सांत्वना पुरस्कार व प्रमाणपत्र

देण्यात आले. स्नातकस्तरीय अद्वैत आर्वीकर तसेच श्रुती शर्मा यांनी भाषण स्पर्धामध्ये भाग घेवून यश संपादित केले.

राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा मुंबई –

राष्ट्रीय संस्कृत संस्थान, मुंबई परिसराद्वारे राज्य स्तरीय शास्त्रीय स्पर्धाचे आयोजन डिसेंबर –2019 मध्ये करण्यात आले होते. या राज्यस्तरीय शास्त्रस्पर्धेत विभागाच्या कु. अमृता बरबडीकर, भक्ती पुरंदरे, वैदेही कुलकर्णी व जिनेन्द्र भिलवडे या पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी तसेच, श्रुती शर्मा व अद्वैत आर्वीकर या स्नातक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात जिनेन्द्र भिलवडे यास धर्मशास्त्र भाषणात प्रथम पुरस्कार, भक्ती पुरंदरे हिला पुराणेतिहास शलाकास्पर्धेत प्रथम पुरस्कार, वैदेही कुलकर्णीला साहित्यशलाकास्पर्धेत प्रथम, अमृता बरबडीकरला साहित्यभाषणात तसेच शास्त्रीयस्फूर्तिस्पर्धेत प्रथमपुरस्कार प्राप्त झाला. तसेच श्रुती शर्मा हिला सांख्ययोगभाषणात प्रथम तर, अद्वैत आर्वीकर यास वेद भाषणात द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला.

राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा, अगरतला–

राज्यस्तरीय शास्त्र स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर व भूषण मुळे यांची निवड राष्ट्रीय स्तरावर होणा–या शास्त्र स्पर्धांकरिता झाली होती. अगरतला येथील राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या परिसरात पार पडलेल्या अखिल भारतीय शास्त्र स्पर्धांमध्ये विभागाच्या कु. वेदश्री व चि. भूषण यांनी सहभाग घेतला.

संस्कृत सप्ताह स्पर्धांमधील सहभाग

विश्वविद्यालयाच्या विस्तारसेवामंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या संस्कृत सप्ताहातील कार्यक्रमात विभागीय स्नातक तसेच स्नातकोत्तर विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग राहिला.

ना.के.बेहरे स्मृती विदर्भस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा–

सदर स्पर्धा श्री नरेन्द्र तिडके महाविद्यालय रामटेक येथे दि.२७ जानेवारी २०२० रोजी आयोजित झाल्या होत्या. या स्पर्धांमध्ये कु.मैथिली अंजनकर हिने सहभाग नोंदविला होता. याच बरोबर ओरेज सिटी कॉलेज ऑफ सोशलवर्क नागपुर महाविद्यालयात दि.१० डिसेंबर २०१९ रोजी आयोजित भाषण स्पर्धांमध्ये देखील हिने सहभाग नोंदविला.

अन्तर्महाविद्यालयीन स्पर्धा –

आर एस मुंडले धरमपेठ आर्टस् ॲड कॉमर्स महाविद्यालयाला २०१० मध्ये १०० झाल्याच्या निमित्ताने आन्तरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन २७-२९ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते. यातील सांस्कृतिक स्पर्धांपैकी समूह नृत्य स्पर्धेत विश्वविद्यालयातील एकूण ८ विद्यार्थ्यांपैकी विभागीय प्रसाद भोगे, ऋतुजा पाटील, कोमल व माही या चार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ग्रिटींग कार्ड निर्माण स्पर्धा-

प्रतिष्ठापन कार्यक्रमादरम्यान घेण्यात आलेल्या ग्रिटींग कार्ड निर्माण स्पर्धांमध्ये विभागीयविद्यार्थ्यांचा यशस्वी सहभाग होता. १६.७.२०१९ रोजी विभागीय प्राकशास्त्री कक्षेतील प्रसाद भोगे यास प्रथम पुरस्कार प्राप्त झाला तसेच, अन्य विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग राहिला.

भारतीय संस्कृती परीक्षा स्पर्धा –

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी संस्थेच्या नागपुरशाखेच्या वतीने नागपुरातील शैक्षणिक संस्थांमध्ये भारतीयसंस्कृती परीक्षांचे आयोजन केले जाते. या वर्षी विश्वविद्यालयातील रामटेक तसेच नागपुरपरिसरातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेस नामांकन केले व यात एकूण १५ विभागीय विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेतला.

अनुसंधान-छात्र चर्चासत्रात शोधपत्रप्रस्तुती—

विश्वविद्यालयाच्या संशोधनविभागाच्या वतीने डिसेंबर ०४ ते ०६ २०१९ दरम्यान शोधविद्यार्थ्यांकरिता घेण्यात आलेल्या संस्कृत परिषदेत विभागातील शोधविद्यार्थ्यांनी शोधपत्र प्रस्तुती केली. या संस्कृत परिषदेत राष्ट्रिय संस्कृत विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख प्रो.राणिसदाशिवमूर्ति यांचे तीन दिवस शोधविद्यार्थ्यांना मार्गदर्शन भेटले.

अखिलभारतीयप्राच्यविद्यापरिषदेत शोधपत्रप्रस्तुती—

दि. १० ते १२ जानेवारी २०२० दरम्यान विश्वविद्यालयाने आयोजित केलेल्या अखिलभारतीयप्राच्यविद्यापरिषदेत विभागीय शोधविद्यार्थ्यांनी शोधपत्र प्रस्तुती केली तसेच, स्नातक व स्नातकोत्तरस्तरीयविद्यार्थ्यांनी परिषद् आयोजनात मोलाचे सहकार्य केले.

भारतीय दर्शन विभाग

स्थापना – **वर्ष 2000**

संकाय – **भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय**

अभ्यासक्रम – **एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. दर्शनशास्त्र आणि योगशास्त्र**

अधिष्ठाता – **प्रो. डॉ. मधुसूदन पेन्ना**

विभाग प्रमुख – **डॉ. कलापिनी अगस्ती, सहयोगी प्राध्यापिका**

प्रा. जे. श्रीनिवास, प्रा. श्रद्धा उपाध्ये, प्रा. सचिन, डावरे, प्रा. मिथिलेश भाकरे

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या –

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय धर्मविषयक तथ्यांचा अभ्यास करणे
- भारतीय दर्शन परंपरेचे अध्ययन व संशोधन करणे
- भारतीय आणि अन्य संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करणे
- भारतीय व पाश्चात्त्य दर्शन तसेच तत्त्वज्ञानविषयक विचार व ग्रंथ यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- संशोधनातील गुणवत्ता राखण्यासाठी आणि वाढविण्यासाठी संशोधनाधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- रूसा अंतर्गत काही संशोधन प्रकल्पांचा प्रस्ताव सादर.
- भारतीय दर्शन या अंतर्गत तसेच वेदान्त, योग–सांख्य दर्शन इ. मध्ये एम्. फिल्., आचार्य पदवीसाठी संशोधन

भारतीय दर्शन विभाग

भारतीय दर्शन विभागातर्फे शैक्षणिक सत्र 2019–20 मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमांची यादी खालीलप्रमाणे आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिवस

दिनांक 21.06.2019

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक आणि त्यामुळेच असलेल्या मानसिक अशांततेच्या युगात शारीरिक तसेच मानसिक संतुलन घडवून आणून सुव्यवस्थित, शांत, सकारात्मक समाज घडविण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय सर्वदा प्रयत्नरत असते. त्यादृष्टीने विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागांतर्गत योगविभागाद्वारे योगशास्त्राचा प्रचार व प्रसार करण्याकरिता योगाभ्यासाचे काही सामान्य, तसेच विशेष अध्ययन इच्छुकांसाठी योगाभ्यासाच्या विशिष्ट वर्गांचे विभागाच्या छात्रांकरवी विविध ठिकाणी आयोजन केल्या जाते.

आंतरराष्ट्रिय योग दिनाच्या निमित्ताने विशेषत्वाने आयोजित केलेल्या योगाभ्यास वर्गांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

भारतीय दर्शन विभागाच्या योग परामर्श केंद्राच्या स्थापनेकरिता विश्वविद्यालयाद्वारे 2018 साली परवानगी मिळाली, परंतु स्थानाअभावी त्याची उभारणी होवू शकली नाही.

योगपरामर्शाकरिता लोकांना जरी केंद्राशी संपर्क साधता आला नसला तरी योगपरामर्श केंद्राद्वारे विश्वविद्यालयाच्या योगविभागातील विद्यार्थ्यांद्वारे विविध ठिकाणी योगाभ्यासाचे विशेष शिबीर घेवून वर्गार्थींना योगविषयक परामर्श देण्यात आला व त्याद्वारे विश्वविद्यालयाच्या परामर्श केंद्राची माहिती पुरविण्यात आली.

ही शिबीरे यावर्षी प्रसिद्धीकरिता घेण्यात आल्यामुळे निःशुल्क घेतली गेली. पण पुढील वर्षी पासून धनार्जनच्या दृष्टीने घेताना याचा निश्चितच लाभ होईल.

या विशेष शिबीरांची माहिती खाली जोडण्यात आली आहे.

दिनांक 21 जुन 2019 रोजी आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्य शासन निर्देशानुसार क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी योगाभ्यास वर्गाचे आयोजन विश्वविद्यालय परिसर रामटेक येथे सकाळी 07 ते 08 या वेळेत करण्यात आले.

या वर्गात शासनाने निर्गमित केलेल्या Common Protocol प्रमाणे पांतजल योग समिती, रामटेक च्या श्री. गायकवाड यांनी उपस्थितांकडून योगाभ्यास करवून घेतला तसेच ध्यान प्रक्रियेचे मार्गदर्शन केले. या योगासन सत्राला रामटेकमधील रामटेकचे उपविभागीय अधिकारी श्री. जोगेन्द्र कटयारे, सरपंच श्री. मदन सावरकर, पोलीस

अधीक्षक श्रीमती नयना आलुरकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी, मा. कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, कार्यक्रमाचे समन्वयक व विश्वविद्यालयाच्या भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना व भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती व्यासपीठावर उपस्थित होते.

शुभम जांभूळकर या एम.ए. योगशास्त्राच्या विद्यार्थ्याने योगगीत सादर केले. तसेच क.का.सं.वि. च्या योगशास्त्राच्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांच्या चमूने योग विभागाच्या प्रा. सुजाता द्रव्यकार यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीशंकराचार्यांच्या निर्वाणषट्कावर तसेच अन्य स्तोत्रांवर योग नृत्य सादर केले. यामध्ये प्रियंका वैरागडे, दिपीका पाटील, अभिलाषा सिसोदीया, प्रिया टेंभरे, पूजा देशपांडे व आश्लेषा देशपांडे या माता पुत्री तसेच अन्य विद्यार्थिनींचा समावेश होता.

आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रीलंकेत झालेल्या योग स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेली विश्वविद्यालयाची पी.जी. डिप्लोमा इन योगशास्त्र या अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी प्रियंका वैरागडे हिचा मा. कुलगुरू प्रो. वरखेडी यांच्या शुभहस्ते शाल, प्रमाणपत्र, गुलाबपुष्प व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.

विश्वविद्यालयातर्फे दरवर्षी 'शोधसंहिता' या संशोधन जनर्लचे प्रकाशन केले जाते. यावर्षी जर्नलचा विशेषांक म्हणून योगावर आधारित 'योगभारती' या संशोधन जनर्लचे प्रकाशन मा. कुलगुरू प्रो. वरखेडी, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी आणि संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेषांकाच्या संपादिका भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती या आहेत. भारतीय दर्शन विभाग योगशास्त्रात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संशोधनलेखांचा समावेश योगभारती विशेषांकांत करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. पराग जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, विद्यापीठातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर सहकारी तसेच रामटेकमधील विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते. योगदिनाच्या या कार्यक्रमाला रामटेक मधील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, पोलीसविभाग, क्रीडा अधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षण विभाग, नगर परिषद, ग्रामपंचायत, पत्रकार संघ इ. विविध संस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

योगभारती

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्याने आज **योगभारती** या विशेष अंकाचे प्रकाषन करण्यात येत आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यातील संशोधनांची आवड विकसित व्हावी व विश्वविद्यालयातल संशोधन समाजापुढे सादर करावे या उद्देषाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे शोधसंहिता या संशोधन पत्रिकेचे प्रकाशन करण्यात येत असते. याच शोधसंहितेचा विशेषांक म्हणून **योगभारती** आज प्रकाशित करतांना आम्हाला आनंद होत आहे. भारतीय दर्शन विभागातील योग अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केलेले संशोधनकार्य या निमित्याने प्रकाशित करण्यात येत आहे. या प्रकाशन कार्यात मार्गदर्शक असलेले मा. कलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी, मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना संपादकीय मंडळ आणि सर्व लेखक आणि तांत्रिक सहायक उमेश पाटील या सर्वांचे मी आभार मानते.

नांदेड येथील राज्यस्तरीय योग स्पधा

भारतीय दर्शन विभागाद्वारे नांदेड येथे राज्यस्तरीय योगा चॅम्पियनशिप 2019 साठी विश्वविद्यालयातील 12 चमू व 2 शिक्षक पाठविण्यात आले. ही स्पर्धा दिनांक 27 जुलै 2019 रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह स्टेडियम नांदेड येथे पार पडली. स्पर्धेत विविध वयोगटातील मुला–मुलींनी 5 पदके पटकाविली. पूजा देशपांडे व प्रिया टेंभरे यांना प्रथम क्रमांक, हर्षल बांगडे व प्रियंका वैरागडे यांना द्वितीय क्रमांक तसेच पुंडलिक बुरांडे ह्यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला. विश्वविद्यालयाच्या प्राध्यापिका रेणुश्री बनसोड व श्री. सचिन डावरे यांचा देखील संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. भारतीय दर्शन विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. मधुसूदन पेन्ना विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ति यांचे प्रोत्साहन लाभले. विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी व सर्व प्राध्यापक वर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

'शास्त्रभारती' व्याख्यानमाला – वैदिक वाङमयाचा परिचय

27.07.2019 या दिवशी भारतीय दर्शन विभागातर्फे वैदिक वाङमयाचा परिचय' या विषयावर डॉ. वीणा गानु यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. दर्शनशास्त्रच्या विद्यार्थ्यांना वैदिक वाङमयाचा परिचय व्हावा या उद्देशाने आयोजित केलेल्या या व्याख्यानाकरिता भारतीय दर्शन आणि योग विभागातील एकूण 40 विद्यार्थी उपस्थित होते व्याख्यानाच्या शेवटी प्रश्नोत्तराचे सत्र झाले. मा. वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे समाधान केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी या दोन्ही विभागीक प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या सुरूवाती वाङ्मयांचे स्वागत आणि परिचय प्रा. डॉ रेणुका करंदीकर यांनी केले तर डॉ. धीरजकुमार पाण्डेय यांनी उपस्थितांचे आभार मानले.

32 वी राष्ट्रिय योगा चॅम्पियनशिप 2019
योग स्पर्धा

भारतीय दर्शन विभागाद्वारे **दि. 17 ऑगस्ट 2019 रोजी विदर्भ योगा असोसियेशनद्वारे नागपूर येथे आयोजित राष्ट्रीय योगा चॅम्पियनशिप 2019** घेण्यात आली. त्यासाठी विश्वविद्यालयातील 16 विद्यार्थ्यांची चमू व संलग्नीत महाविद्यालयातील 02 विद्यार्थी असे एकूण 18 विद्यार्थी पाठविण्यात आले. त्यापैकी आपल्या विश्वविद्यालयातील 02 विद्यार्थ्यांची निवड इंडोनेशिया येथे होणा–या आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेकरिता झाली. मंथन ठाकरे याला रिदमिक योगा स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त झाले तसेच सौ. रेखा ठाकुर यांना योग स्पर्धेत सहावा क्रमांक प्राप्त झाला. त्याकरिता स्पर्धेत विश्वविद्यालयातील प्राध्यापिका रेणुश्री बनसोड व श्री. सचिन डावरे विद्यार्थ्यांसोबत गेले होते. भारतीय दर्शन विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. मधुसूदन पेन्ना आणि विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांचे प्रोत्साहन लाभले. विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी व सर्व प्राध्यापक वर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

वरारा येथे झालेल्या जिल्हा योगा चॅम्पियनशिप 25.08.2019
मध्ये एक गोल्ड व 1 सिल्वर

दि. 25.08.2019 रोजी वरोरा येथे चंद्रपूर योगा असोसियशन तर्फे जिल्हास्तरीय योग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या चमूने सहभाग घेतला होता. त्यापैकी 21 ते 25 या वयोगटात शुभम ठवकर या विद्यार्थ्याने रौप्य पदक प्राप्त केले तसेच 45 वर्षांवरील वयोगटात री अमित देसाई यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना प्रा रेणुश्री बन्सोड आणि रश्मी कुमठ यांनी मार्गदर्शन केले. भारतीय योग

विज्ञान विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. क.का.सं.वि च्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आचार्य भारती या विशेष उपक्रमांतर्गत गीता जयंती औचित्य साधुन यंदा 7,8,9 डिसेंबर असे तीन दिवस सकाळी 7 ते 8 यावेळेत श्रीमद्भगवतगीता पठनाचा सामूहिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला या सामूहिक पठण कार्यक्रमात तीन्ही दिवस मा. कुलगुरू डॉ. आचार्य श्रीनिवास वरखेडी अध्यक्ष स्थानी उपस्थित होते. रोज 6 अध्यायाचे पठन आणि त्यानंतर मा. कुलगुरूंचे मार्गदर्शन असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

प.पू. गुरूजी गोळवळकर गुरूकुलातील सर्व निवासी विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आणि यशस्वीतेसाठी प्रा. सौ. श्रद्धा उपाध्ये यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटच्या दिवशी मा. कुलगुरूंनी केलेल्या फलश्रुती रूपी भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला हे विशेष.

'शास्त्रभारती' व्याख्यानमाले अंतर्गत घेण्यात आलेल्या व्याख्यानाचा

दि. 29 ऑगस्ट 2019 रोजी भारतीय दर्शन विभागाद्वारे 'शास्त्रभारती' या व्याख्यानमाले अंतर्गत कॅलिफोर्निया येथील मा. ख्रिस्टोफर चॅपेल यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात मा. ख्रिस्टोफर चॅपेल, त्यांच्या पत्नी, डॉ. मंजू जैन, डॉ. अर्चना जैन, डॉ. अनिता अग्रवाल तसेच विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु, प्रो. श्रीनिवास वरखेडी, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृति संकायाचे मा. अधिष्ठाता, प्रो. मधुसूदन पेन्ना व कार्यक्रमाच्या समन्वयिका, भारतीय दर्शन विभागाच्या विभाग प्रमुख, डॉ. कलापिनी अगस्ती उपस्थित होत्या.

जैन धर्मातील योगाचे स्वरूप श्री. ख्रिस्टोफर चॅपेल यांनी विशद केले तसेच डॉ. मंजू जैन, डॉ. अर्चना जैन, डॉ. अनिता अग्रवाल यांनी जैन योगसाधनेची काही प्रात्याक्षिक करून दाखविले व उपस्थितांकडून करवून घेतले.

या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यस्तरीय परिसंवाद
(महाराष्ट्रातील संतांचे दार्शनिक चिंतन)

दि. 11 ऑक्टोबर 2019 रोजी विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे 'आचार्यभारती' या व्याख्यानमाले अंतर्गत 'राज्यस्तरीय परिसंवादाचे' आयोजन करण्यात आले. 'महाराष्ट्रातील संतांचे दार्शनिक चिंतन' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी, व्याख्याता म्हणून पुण्याच्या वैदिक संशोधन मंडळाच्या संचालिका डॉ. भाग्यलता पाटसकर, सावित्रीबाई फुले, पूणे विद्यापीठातून डॉ. दिनेश रसाळ महाराज, आळंदी येथील साधकाश्रम येथे संत साहित्य व वेदान्त शास्त्रचे अध्यापक मा. श्री. यशोधन साखरे महाराज व विश्वविद्यालयाच्या भारतीय शर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकायाचे अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयिका व भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

'श्री. तुकाराम महाराजांचे दार्शनिक साहित्य' या विषयावर श्री. यशोधन साखरे महाराजांचे तर 'चांगदेवपासष्टीतील माऊलींचे दार्शनिक चिंतन' या विषयावर रसाळ महाराजांचे, 'सहस्रनाम वाङ्मयातील तात्त्विक

चिंतन' या विषयावर डॉ. भाग्यलता पाटसकर यांचे तसेच 'श्री गुलाबराव महाराजांचे दार्शनिक चिंतन' या विषयावर प्रो. मधुसूदन पेन्ना यांचे व्याख्यान झाले. तत्त्वज्ञानासारखा विषय अत्यंत सरसतेने सुगम्य करून देणा–या या परिसंवादाचे आध्यक्षीय भाषण मा. कुलगुरुंनी केले. विश्वविद्यालयाचे सर्व मा. अधिष्ठाता, अधिकारी वर्ग, प्राध्यापक व छात्र या कार्यक्रमाला उपस्थित होते. वक्त्यांसाठी अल्पहार व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

'शास्त्रभारती' अंतर्गत विशेष व्याख्यान
भागवतातील कर्मविचार (जडभरत आख्यानाच्या आधारे)

दि. 16 ऑक्टोबर 2019 ला भारतीय दर्शन विभागाद्वारे 'शास्त्रभारती' च्या अंतर्गत शास्त्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यवतमाळ येथील डॉ. शैलजा रानडे यांना व्याख्याता म्हणून आमंत्रित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयातील संस्कृत भाषा तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता मा. प्रो. नन्दा पुरी विराजमान होत्या तर व्याख्याता म्हणून अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसार मंडळाच्या डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशनचे माजी प्राचार्य डॉ. अरूण खोडस्कर तसेच कार्यक्रमाच्या समन्वयिका मा. डॉ. कलापिनी अगस्ती व्यासपीठावर उपस्थित होत्या.

भागवतातील जडभरत आख्यानाच्या आधारे विविध कथांच्या माध्यमातून भागवतातील कर्मविचार डॉ. शैलजा रानडे यांनी सरस शैलीने व अत्यंत रोचक पद्वतीने मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण प्रो. नन्दा पुरी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय दर्शन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले.

'संशोधनभारती' अंतर्गत विशेष व्याख्यान
Scope of Research in Yoga

दि. 16 ऑक्टोबर 2019 ला भारतीय दर्शन विभागाद्वारे 'संशोधनभारती' या संशोधनावर आधारित व्याख्यानमालेच्या अंतर्गत **'Scope of Research in Yoga'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

विश्वविद्यालयातील योगशास्त्रच्या छात्रंना व संशोधन छात्रंना महत्त्वपूर्ण असलेल्या '**संशोधन क्षेत्रतील वाव'** ह्या विषयावर अत्यंत उपयुक्त असे व्याख्यान झाले. या व्याख्यानात डॉ. अरूण खोडस्कर यांनी योगशास्त्रतील अनेक असे विषय सांगितले कि, ज्यांच्यावर संशोधन केल्या जाऊ शकते. संशोधन क्षेत्रतील समाजोपयोगी अश्या संशोधनपर विषयांचे अत्याधुनिक पद्धतीने संशोधन होणे ही काळाची गरज आहे. हे डॉ. अरूण खोडस्कर यांनी आपल्या व्याख्यानातून प्रभावीपणे प्रतिपादीत केले.

या व्याख्यानमालेत विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसर व वारंगा परिसर येथील योगशास्त्रतील सर्व विद्यार्थी तसेच सर्व संशोधन छात्र उपस्थित होते. कायक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन कार्यक्रमाच्या संयोजिका व भारतीय दर्शन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले.

दि. 7 ते 9 डिसेंबर 2019

गीता जयंती (सामूहिक गीता पठन)

क.का.सं.वि च्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आचार्य भारती या विशेष उपक्रमांतर्गत गीताजयंती औचित्य साधून यंदा 07.08.2019 डिसेंबर असे तीन दिवस सकाळी 7 ते 8 या वेळेत श्रीमदभगवद्गीता पठनाच्या सामूहिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या सामूहिक पठण कार्यक्रमात तीनही दिवस या कुलगुरू डॉ. आचार्य श्रीनिवास वरखेडी अध्यक्षस्थानी उपस्थित होते. रोज 6 अध्यायांचे पठन आणि त्यानंतर मा. कुलगुरूंचे मार्गदर्शन असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

गुरूजी गोळवळलर गुरूकुलातील सर्व निवासी विद्यार्थ्यी या कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आणि यशस्वीतेसाठी प्रा. सौ. श्रद्धा उपाध्ये यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटाच्या दिवशी मा. कुलगुरूंनी केलेल्या फलश्रुती रूपी भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला हे विशेष.

दि. 24 डिसेंबर 2019

मदन मोहन मालवीय जयंती (रक्तदान शिबिर)

काशी हिन्दू विश्वविद्यालयाचे संस्थापक पूज्य भारतरत्न पंडीत मदनमोहन मालवीय यांची जयंती दि. 24.12. 2019 रोजी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय दर्शन विभागाच्या आचार्य भारती या उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रम आचार्याचे पुण्यस्मरण आणि रक्तदान शिबिर अशा दोन भागात घेण्यात आला. आचार्य मदनमोहन मालवीय यांनी ज्ञानप्रसार आणि देशभक्ती या दोन्ही स्तरावर फार मोठा आदर्श समाजाला घालून दिला म्हणून त्यांच्या विषयी या कार्यक्रमाद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. रक्तदान शिबीरात जवळपास 35 लोकांनी रक्तदान केले. त्यासाठी नागपूर येथील हेडगेवार रक्तपेढीतील वैद्यांची चमूने दिवसभर उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले. या दोन्ही कार्यक्रमांचे उदघाटन मा. कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. धीरज कुमार पाण्डेय यांनी विशेष कार्य केले. हा कार्यक्रम कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समन्वयाने घेण्यात आला. या दोन्ही कार्यक्रमांना विद्यापिठाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग यांची उपस्थिती होती.

दि. 30 डिसेंबर 2019

आचार्य रमण महश्री जयंती (Text Reading Workshop)

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आचार्य भारती अतंर्गत आचार्य रमण महर्षी यांच्या जयंती निमित्त दि. 30.12.2019 रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज योग कक्षात घेण्यात आलेले या कार्यक्रमात उपस्थितांनी 'रमण उपदेशसार' नामक प्रकरण ग्रंथाचे पारायण केले. या कार्यक्रमांच्या निमित्ताने रमण महर्षीचे स्मरण त्यांच्या उपदेशाचे पठण असा दुहेरी संगम साधता आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. धीरज कुमार पाण्डेय यांनी तर आभार प्रदर्शन सौ. श्रध्दा उपाध्ये यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. कलापिनी अगस्ती यांनी भूषविले. कार्यक्रमाला अन्य विभागाचे प्राध्यापकही मोठया सख्येनी उपस्थित होते.

2 Stall booked in National book exhibition during AIOC

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे दि.10,11,12 जानेवारी रोजी अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेच आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत आयोजित केलेल्या ग्रंथप्रदर्शनीमध्ये भारतीय दर्शन विभागातर्फे दर्शन आणि योग या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेले चार्टस, मॉडेलस् आणि अन्य उपकरणाचे प्रदर्शन स्टॉल क्र. 44,45,व 46 येथे लावण्यात आले होते . त्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार केलेले नऊ भारतीय दर्शनावरील सुमारे 50 चार्टस, 5 मॉडेलस् येथे ठेवण्यात आले. योगदर्शनांवरील चार्टस उपकरणे आणि शुध्दिक्रियांचे साहित्य तसेच विभागातर्फे वर्षभर घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाच्या फोटोंचे प्रदर्शनही या निमित्ताने लावण्यात आले होते. याशिवाय उपस्थितांनी योगसमुपदेशनाचाही लाभ घेतला. भारतीय दर्शन आणि योग विभागाच्या विद्यार्थ्यांची चुणुक आणि कलात्मकलेचा परिचय यानिमित्याने सर्वांना झाला. उपस्थितांनी या उपक्रमाचे जोरदार स्वगत व कौतुक केले. काहींनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया लिहून आनंद व्यक्त केला. या उपक्रमाला संकायाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन पेन्ना आणि विभाग प्रमुख डॉ.कलापिनी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या आयोजनासाठी सौ.उपाध्ये, श्री. धीरजपाण्डेय आणि सचिन डावरे श्री.गौरव कडलग,श्री.मिथिलेश भाकरे, सौ.रेणुश्री बनसोड यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

नागपुर येथील खासदार क्रीडा महोत्सव – योग स्पर्धा

भारतीय दर्शन विभागाद्वारे ,नागपूर येथे खासदार क्रीडा महोत्सवाच्या योग स्पर्धा 2020 साठी विश्वविद्यालयातील एकून 20 विद्यार्थी व सोबत 01 प्राध्यापिका पाठविण्यात आली होती. ही स्पर्धा 21 व 22 जानेवारी 2020 रोजी सुरेश भट सभागृह, रेशिमबाग नागपूर येथे पार पडली. स्पर्धेत विविध वयोगटातील मुला–मुलींनी 12 पदके पटकाविली.

अनु. क्र.	नाव	अभ्यासक्रम	वयोगट	प्रकार	पारितोषिक
1	प्रियंका वैरागडे	M.Sc Yoga	20 ते 25 वर्ष	रिदमीक	एक सुवर्ण
2	सुनिता वधावान	Ph.D Yoga	35 वर्षावरील	आसन	एक रौप्य
3	धनश्री लेकुरवाळे	एम.ए. योगा (माजी)	25 ते 35 वर्ष	आर्टिस्टीक व आसन	दोन सुवर्ण
4	मंथन ठाकरे	हॉटेल मॅनेजमेंट (संलग्नित महाविघालय – तुली कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट)	20 ते 25 वर्ष	रिदमीक व आसन	एक सुवर्ण व एक रौप्य
5	भूपेश नांदूरकर	बी.ए .योगा (चक्रपाणि महाविद्यालय)	20 ते 25 वर्ष	आर्टिस्टीक	एक कांस्य
6	प्रविण खवशी	एम.ए. योगा (चक्रपाणि महाविद्यालय)	25 ते 35	आसन	एक रौप्य

			वर्ष		
7	प्रियंका अडकने	बी.ए .योगा (चक्रपाणि महाविद्यालय)	20 ते 25 वर्ष	आर्टिस्टीक व आसन	एक रौप्य एक कांस्य
8	वैष्णवी गोड	बी.ए .योगा (चक्रपाणि महाविद्यालय)	20 ते 25 वर्ष	आसन व आर्टिस्टीक	एक रौप्य वएक कांस्य

तसेच विद्यापीठातील माजी विद्यार्थिनी कु. धनश्री लेकुरवाळे हिचा " बेस्ट योगा प्लेयर ऑफ नागपूर डिस्ट्रीक्ट" हा क्रिडा पुरस्कार मा.श्री नितीनजी गडकरी व क्रिकेट खेळाडू हार्दिक पान्डे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गोळवलकर गुरूजी गुरूकुल मधील 6 मुलांची निवासाची सोय प.पू.हेडगेवार स्मृती स्मारक मधे करण्यात आली होती. विश्वविद्यालयाच्या प्राध्यापिका रेणुश्री बनसोड यांनी विदयार्थ्यांचे नेतृत्व केले. भारतीय दर्शन विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ.मधुसुदन पेन्ना, विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ति यांचे प्रोत्साहन लाभले. विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी व सर्व प्राध्यापक वर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कोलंबो, श्रीलंका येथे घेण्यात आलेल्या योग स्पर्धा

कोलंबो, श्रीलंका येथे दि. 09 फेब्रुवारी 2019 ते दि. 12 फेब्रुवारी 2019 या कालावधीत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि नॅशनल इंन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स, कोलंबो, यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत संशोधन पत्रांचे सादरीकरण व विशेष रूपाने योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या योगासन स्पर्धेत कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातील विद्यार्थीनी कु. प्रियंका वैरागडे हिने सहभाग घेतला व या स्पर्धेत सुवर्ण पदकासह प्रथम क्रमांक प्राप्त केला. ही स्पर्धा कोलंबो येथील White Dunkan Hall येथे संपन्न झाली. या स्पर्धेत मॉरिशस, वेतनम, श्रीलंका आणि भारत या देशांमधील योगस्पर्धकांनी सहभाग घेतला होता. 22 ते 35 या वयोगटात प्रियंका वैरागडे हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

दि. 12 फेब्रुवारीला पारितोषिक वितरण समारंभ White Dunkan Hall मध्ये आयोजित करण्यात आला होता. श्रीलंकेतील क्रीडामंत्री हॅरील फॅर्नाडो व डायरेक्टर जी.एल.सजीथ जयलाल, भारताती अरूण खोडसकर, प्रो. रवी साहु प्रामुख्याने उपस्थित होते.

कु. प्रियंका वैरागडे हिने श्रीलंकेत झालेल्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत क.का.सं.वि. चे प्रतिनिधीत्व केले त्यामुळे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे तिला रू. 15,000/– चे आर्थिक अनुदान देण्यात आले होते.

तिला आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत प्राप्त यशासाठी विश्वविद्यालयाने तिचे अभिनंदन केले.

''Emotional Intelligence ''

(1) दि. 29/02/2020 ला योग भारती , भारती दर्शन विभाग क.का.सं.वि.रामटेक, नागपुर, द्वारे ''Emotional Intelligence '' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मा. श्री. आशिष गुरव (पुणे)महोदय हे वक्ता म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाचे आयोजन कविकुलगुरूकालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या श्री. प.पू गोलवलकर गुरूजी गुरूकुलममधील वर्णेकर सभागृहात सकाळी 11.30 ते 1.30 या वेळेत घेण्यता आला. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. मिथिलेश भाकरे यांनी केले तसेच वक्त्यांचे स्वागत प्रा. सचिन डावरे यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. श्रद्धा उपाध्ये यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमात विश्वविद्यालयातील 82 विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाला खालील प्राध्यापक स्वयंस्फूर्तपणे उपस्थित होते. श्रद्धा उपाध्येय, सचिन डावरे ,मिथिलेश भाकरे, धीरज कुमार पाण्डेय, प्रगती दीक्षित.

या कार्यक्रमात प्रशिक्षक आशिष गुरव यांनी विद्यार्थ्यांसाठी एक खेळ घेतला आणि त्या खेळाच्या अनुभवावरून विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारले. अशा प्रकारे अत्यंत मनोरंजक आणि प्रभावि पध्दतीने हि कार्यशाळा घेतल्याने हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. अशा कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे व्हावे अशी सदिच्छा उपस्थितानी व्यक्त केली.

(2) याच दिवशी दुपारी 2.00 वाजता पुनः शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी वरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्वविद्यालयाच्या अत्यावश्यक कामातुन थोडा वेळ काढून जवळपास 25 कर्मचारी त्याकार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालक मा. श्री. आशिष गुरव यांनी विविध खेळ प्रश्नोत्तरे आणि समूहचर्चा यामाध्यमातून कार्यशाळा घेतली आणि कार्मचाऱ्यांचा दिवसभाराच्या कार्याचा ताण बऱ्याच प्रमाणत कमी होण्यास मदत मिळाली. शिवाय भविष्यातही तणाव नियंत्रण कसे करावे यांचे सहज मार्गदर्शन या कार्यशाळेतून मिळाले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. मिथिलेश भाकरे यांनी केले तसेच वक्त्यांचे स्वागत प्रा. सचिन डावरे यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. श्रद्धा उपाध्ये यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांचे सहकार्य लाभले.

वासंतिक वमन शिबिर (फेब्रुवारी, मार्च 2020)

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या योग विज्ञान विभागाद्वारे रामटेक परिसरात दि. 29.02. 2020 वासंतीक वमन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मिथिलेश भाकरे यांनी त्या शिबीरांचे संचालन केले. हे शिबीर दोन सत्रांमध्ये घेण्यात आले. विद्यार्थी आणि प्राध्यापक असे एकूण 23 लोकांनी यात सहभाग नोंदविला. याशिवाय विद्यापीठाच्या नागपूर परिसारातील विद्यार्थ्यासाठी स्थानिक आनंद लोक आयुर्वेद चिकित्सालय येथे वमन शिबीर घेण्यात आले. त्यात 12 विद्यार्थ्यानी वमन क्रियेद्वारे शरीर शुध्दी साधण्यात यश मिळविले.

वरील दोन्हीही शिबीरे शास्त्रोक्त आयुर्वेदीय पध्दतीने घेतली गेली त्यासाठी नागपूर येथील आनंदलोक होलिस्टिक हेल्थ व पंचकर्म सेंटर चे संचालक वैद्य श्री. विराज गिते यांनी वमन प्रक्रिया आणि त्यासाठी लागणारी पूर्व तयारी याविषयी अमूल्य मार्गदर्शन केले.

1) ONLINE TEACHING - LEARNING ACTIVITIES - १) ऑनलाईन शकवणे

ऑनलाइन शैक्षणिक उपक्रम अंतर्गत, भगवद्गीता, ब्रह्मसूत्र यांवर प्रोफेसर श्री मधुसूदन पेन्ना सर, यांचे व्याख्यान सत्र झाले. प्रत्येक सत्राला दोन हजाराहून अधिक श्रोत्यांची उपस्थिती होती. **covid-19** फेसबुक लाईव्ह लेक्चर सिरीज घेतल्या गेली. ज्यात जवळपास पंधरा तज्ञांची, स्वास्थ्य रक्षणावर विविध विषयांतर्गत व्याख्याने झाली. प्रत्येक व्याख्यानाला १५०० ते २००० श्रोत्यांची उपस्थिती होती. विभागीय कोर्सेस मधील विषयानुसार, प्राध्यापकांनी संबंधित विषयांची व्याख्याने ऑनलाइन घेतली. यामुळे विद्यार्थ्यांशी लॉक डाउन मुळे झालेला दुरावा भरून काढण्याकरता मदत झाली, व् शैक्षणिक सत्र पुनः सुव्यवस्थित सुरु झाले.

Online Educational Activities undertaken ऑनलाईन शैक्ष णक उपक्रम हाती घेतले	**No. of students / participants benefitted /** सहभागींची संख्या	**Outcome / Impact of the online educational activities /** ऑनलाईन शैक्ष णक उपक्रमांचा परिणाम
Bhagavadgeeta (Prof. Madhusudan Penna - FB Live)	2.7K +	Each session was viewed by more than 2700 people, with 90% people gave 100% rating as feedback
Brahamsutra (Prof. Madhusudan Penna - FB Live)	1.7K +	Each session is going on with more than 1700 people
Covid-19 lectures (academic point of view) - Various Experts - FB Live	2K +	Each session was viewed by more than 2000 people, Acedemically very useful for Yoga Students. Also non-academic people/ families also got benefitted with yoga practices knowledge for implementation in daily life. Good response to Q&A session also.
National Workshop on Health & Happiness, with Art of Living	510	More than 500 people from Kalidas Sanskrit University & Art of living got benefitted, with the basics of meditation & breathing awareness. Many asked for similar session in future. Received best rating from 75% participants as feedback.
Zoom classes conducted by our facilities (for MA Yogshastra Semester 2, MSc Yogic Science Semester 2)		

Sidhantaleshsangrah ((Prof. Madhusudan Penna)	10	Syllabus completion on time. Q&A session, query solving also happened. Compensated for detachment caused due to lockdown.
Shandilyopanishad (Dr.Kalapini Agasti)	8	
Panchadashi (Dr.Renuka Karandikar)	6	
History of yoga (Dr.Renuka Karandikar)	12	
Brahmsutra (Dheeraj Pande)	6	
Vedantasara (Sachin Dawre)	6	
Sanskrit Communication (Shraddha Upadhye)	10	
Yoga for Positive Health MSc (Mithilesh Bhakre)	7	
Applied Psychology MSc (Mithilesh Bhakre)	7	
Yoga & Allied Therapies MA (Mithilesh Bhakre)	21	

1) **E-Content Collection - Reading / Instructional material/ additional knowledge resources provided to students.**

E-content चे संकलन विविध लिंक्स, व्हिडिओज, पीपीटी व पुस्तके यांचे संकलन विभागीय प्राध्यापक व विद्यार्थ्यां तर्फे करण्यात आले. प्रत्येक कोर्स मधील, प्रत्येक सेमिस्टरच्या, प्रत्येक विषयाकरिता इ-कंटेंट चे संकलन करण्यात आले.

S.No.	Course/Paper	Additional Resource provided
1	1) MSc Yogic Science – Yoga Practical Training & Paper 4	Online Content / Notes / Links / Videos / PPts / Books
2	2) PG Diploma in Yogic Science – Practical & Paper 2	Online Content / Notes / Links / Videos / PPts / Books
3	4) MA Yoga Sem2 & Sem4 – Yoga Practical Training & Paper 4	Online Content / Notes / Links / Videos / PPts / Books

2) **EXAMS & EVALUATION RELATED ACTIVITIES**

अंतिम सत्र सोडून, इतर सत्रांच्या परीक्षा ऑनलाइन माध्यमाने घेण्यात आल्या. एम. ए. योग सेमिस्टर २, एम. एस. सी. योग सेमिस्टर २, पी.जी. डिप्लोमा योग, या कोर्सच्या सर्व परीक्षा ऑनलाइन माध्यमाने, यशस्वीरीत्या घेण्यात आल्या. या कोर्सच्या प्रत्येक विद्यार्थ्याला, यशस्वीरित्या ऑनलाइन परीक्षा देता आली. या परीक्षांच्या परिणामांचा वापर, वार्षिक निकालाकरिता करण्यात आला.

S.N.	Course	Online MCQ – Q.Paper URL
1	MA Yoga Semester 2 Paper 1 - FUNDAMENTALS OF INDIAN PHILOSOPHY	https://forms.gle/fi7R8n4YHXWTgqQC8
2	MA Yoga Semester 2 Paper 2 - YogSutra	https://forms.gle/1M2pDt3ck6W5RCDu9
3	MA Yoga Semester 2 Paper 3 - Yoga Upanishad & Modern Yoga	https://forms.gle/mBsaoSh9UiXVsCx57
4	MA Yoga Semester 2 Paper 4 - APPLIED YOGA I	https://forms.gle/yqet3NcpinQ57P3y5
5	MSc Yoga Semester 2 Paper 1 - Yog Vasishtha	https://forms.gle/wo9BGcecQM3Hzgy39
6	MSc Yoga Semester 2 Paper 2 - Yog Upanishad	https://forms.gle/NnXmvKFVXnNyEGXe8
7	MSc Yoga Semester 2 Paper 3 - Kinesiology	https://forms.gle/4Sa3ezVThKPWTAZV8
8	MSc Yoga Semester 2 Paper 4 - Yoga for Positive Health	https://forms.gle/YNBf72GKgN9ymEmt7
9	MSc Yoga Semester 2 Paper 5 - Applied Psychology	https://forms.gle/ncNTdcG5a9R9zSS17
10	PGD Yoga Paper 1 - Yoga Text & History Of Yoga	https://forms.gle/DDNXQ2L1vxeGfbcU8
11	PGD Yoga Paper 2 - Anatomy & Physiology	https://forms.gle/PFhm7fVZdERFssJN8
12	PGD Yoga Paper 3 - Hathayoga	https://forms.gle/tTUdN3qpXdUphg316
13	PGD Yoga Paper 4 - Yoga Therapy	https://forms.gle/yqQN6yZpPGR1gHTw7

3) e-Assignment Management

इ-असाइनमेंट व्यवस्थापन – एम. एस. सी. योग सेमिस्टर २, एम. ए. योग सेमिस्टर ४, या विषयांच्या असाइनमेंट, ऑनलाइन माध्यमाने विद्यार्थ्यांकडून मागवण्यात आले. तसेच ऑनलाइन माध्यमाने त्यांची विभागणी करून, संबंधित प्राध्यापकांना चेकिंग करण्याकरिता पाठवण्यात आले. ऑनलाइन माध्यमाने ई- असाइनमेंट संकलन व परीक्षण, अतिशय सहजरित्या पार पडले. प्राध्यापक व विद्यार्थी या दोघांच्याही दृष्टीने ही प्रक्रिया, अतिशय सहजरित्या पार पडली. अंतर्गत मुल्यांकनाकरिता याचा उपयोग झाला.

S.N	Course	Papers	Assignments link shared with respective Teacher, for respective paper
1	MSc Yogic Science – Semester 2	Internal Marks for MSc Yog Sem2 (Waranga Campus) Respective paper's document for internal marks (20Marks) Paper 1: The Yoga Vasistha - Dr.Renuka Karandikar Paper 2: Yoga in Selective Yogopanishads - Dr.Kalapini Agasti Paper 3: Kinesiology - Prof.Madhusudan Penna Paper 4: Yoga for positive health - Mithilesh Bhakre Paper 5: Applied Psychology - Renushree Bansod	https://drive.google.com/open?id=1imyWicELZPZtsBpFFbVDL7xY9WCyBQjk
2	MA Yogshastra – Semester 4	Internal Marks for MA Yog Sem4 (Waranga Campus) Respective paper's document for internal marks (40Marks) Paper 1: Dr.Kalapini Agasti Paper 2: Parag Joshi Paper 3: Gaurav Kadlag Paper 4: Renushree Bansod Paper 5: Mithilesh Bhakre	https://drive.google.com/open?id=18uGJlZI2s9AQXWlz5Y-jXF9_zVMxVqfN

Impact:
All assignments in PDF or PPT format, shared by students, were uploaded on google drive & shared with respective teacher, with evaluation format sheet.
Assignment checking, evaluation & internal marks submission everything about internal evaluation, could happen smoothly, within stipulated time, without much efforts.
It was convenient for students as well as teachers.
Management of received assignments also, happened effortlessly.

4) Online Practical Sessions Conduct & Practical Examinations for ODL MA Yoga Sem1

एम.ए. योग सेमिस्टर १, ओ.डी.एल. (ओपन डिस्टेंस लर्निंग) च्या साधकांची, प्रात्यक्षित योग परीक्षा, ऑनलाइन माध्यमाने घेण्यात आली.

S.No.	Type of Examination
1	ODL MA Yog Sem1 – 10 Days Contact Session of Practical's paper5 & Final Exam Conduct (Online Zoom)

5) CO-CURRICULAR, EXTENSION, PROFESSIONAL DEVELOPMENT RELATED ACTIVITIES

S.No.	Type of Activity
1	Vasantik Vaman Shivir Organized (29 Feb & 14 March) – 40+ Teachers & Students Participated 2 Sessions – Feb & March 2019 at Ramtek Campus | Nagpur Students at Anandlok Ayurveda Center, Nagpur
2	SATYAM Research Proposal - COVID19 Yoga Oriented Research - from KKSU – Proposal Creation & Submissions
3	COVID19 YOGA Protocol Designing & Drafting. (designed yoga protocol with guidance from experts)
4	COVID19 YOGA Protocol – Videos e-content creation, collection, uploading
5	COVID19 Research Experts & Counsellors Management & Coordinating various Experts & Heads of various Institutions
6	COVID YouTube channel – Video creation & uploading
7	COVID19 Facebook Live Yoga Lecture Series KKSU
8	Yog Diksha Couse – Booklet released & e-content creation going on
9	12 Expert Yoga Performers Group created of Dept. Students – Yoga Poses Photos Collection - For ODL MA Yoga Book
10	Yog Bharati - Yoga Research Journal - Research Papers coordination & collection – from FB Live Sessions Experts & MA Yoga Sem4 Students
11	National Webinar on Health & Happiness – KKSU & Art Of Living
12	10 Day Yoga Workshop 1st & 2nd - on the occasion of 6th International Yoga Day
13	ODL MA Yog Sem1 Practical P5 - All Semester complete book from many experts – Work initiated
14	RUSA Proposal – KKSU Therapy center development – Material/Equipment's finalization drafting going on
15	KKSU Website Content Creation – Yoga Vijnana Dept
16	KKSU Student Feedback e-Form Creation – All in One – Online Feedback Form
17	Yoga Family Teaching Initiative KKSU - International Yoga Day 21June 2020
18	21 June International Yoga Day - Online Event: - Advance Aasanas Demo - Yoga Protocol: AYUSH + KKSU COVID19 = Mixed Protocol - Yoga Research Journal Publishing - Yoga Therapy Center: Initiative Announcement

6) **Covid-19 lecture Series (Yoga point of view) - Various Experts - FB Live**

S. No.	Title of Lecture	Expert	No. of Views / People attended	URL
1	Yogic life	Dr. Madhusudan Penna	1.8K views · April 18	https://www.facebook.com/covid19yoga/videos/895393977591443/
2	Yoga Nidra	Dr. Vishwas Mandlik	1.6K views · April 22	https://www.facebook.com/covid19yoga/videos/583236078951730/
3	Postural Deformities and Yoga	Dr. Anil Karwande	1.5K views · April 25	https://www.facebook.com/covid19yoga/videos/243374167005173/
4	Breathe and Mind	Dr. C. G. Shinde (Patil)	1.2K views · April 27	https://www.facebook.com/covid19yoga/videos/274456333580448/
5	Yoga for Health, Happiness & Harmony	Dr. Ulka Natu	1.8K views · April 29	https://www.facebook.com/covid19yoga/videos/537698510444896/
6	Our Health in our Hands	Dr. Viraj Gite	2K views · May 3	https://www.facebook.com/covid19yoga/videos/238619930814161/
7	Developing Immunity through Yoga	Dr. Makrand Gore	1K views · May 6	https://www.facebook.com/covid19yoga/videos/248643559526278/
8	Woman's Health Issues & Ayurveda/ Yoga	Dr.Nutan Pakhare	1.1K views · May 9	https://www.facebook.com/covid19yoga/videos/1078270765905983/
9	Diet & Nutrition	Dr. Jayshree Pendharkar	464 views · May 12	https://www.facebook.com/covid19yoga/videos/654937588424051/
10	Yoga Philosophy and it's Practice	Prof. B. R. Sharma	896 views · May 18	https://www.facebook.com/covid19yoga/videos/847919312362331/
11	Yoga for Obesity	Dr. Nilesh Wagh	2.1K views · May 21	https://www.facebook.com/covid19yoga/videos/57397092

				9919107/
12	Hatha Yoga vis-a-vis Patanjali's Ashtanga Yoga	Dr. Ganesh Rao	2.1K views · May 29	https://www.facebook.com/covid19yoga/videos/3214302611914076/
13	Antarang Yog	Dr. Shriram Hari Agashe	2.7K views · June 12	https://www.facebook.com/covid19yoga/videos/2817698658356543/
Impact: Each session was viewed by more than 2000 people, Academically very useful for Yoga Students. Non-academic people/ many families also got benefitted with yoga practices knowledge for implementation in daily life. Thousands of people attended, got motivated to effectively deal with COVID19 crisis. Good response to Q&A session also.				

Simhavlokan Meeting: 1-2-3 July 2020

सिंहावलोकन सभेत, प्रत्येक विभागाच्या, विभाग-प्रमुखांनी गतकार्याचा आढावा सादर केला. तसेच पुढील कार्यासंबंधी चे नियोजन, माननीय कुलगुरु-समोर सादर केले.

Achievements / Progress done in last year & action plan for upcoming year, was presented by respective HODs of each department.

वेदांग ज्योतिष विभाग

स्थापना – वर्ष 2009

संकाय – प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्यशास्त्रे संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. वेदांग ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय

विभाग प्रमुख – डॉ. दिनकर मराठे, सहायक प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. प्रसाद गोखले, प्रा. प्रणव मुळे, प्रा. हिंगणीकर, प्रा. अंबालिका सेठीया

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 2

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय विज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचे तौलनिक अध्ययन करणे
- वेदांग ज्योतिष हे प्राचीन भारतीय शास्त्र म्हणून समाजात प्रस्थापित करणे.
- वेदांग ज्योतिष आणि वास्तुशास्त्राबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे.
- वैदिक साहित्यात दिसून येणा–या प्राचीन भारतीय विज्ञानाच्या बीजांचे सखोल संशोधन करणे
- संस्कृत साहित्याचे मानव्यशास्त्रासाठी असलेले योगदान विविध परिषदा, अध्ययन, सेमिनार या माध्यमातून प्रभावीपणे अधोरेखित करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

1 **आंतरविभागीय संशोधन**

वास्तु व आधुनिक स्थापत्यशास्त्र, सिद्धान्त ज्योतिष व आधुनिक खगोलविज्ञान, मेघ गर्भ लक्षण आणि आधुनिक पर्जन्य अंदाज, आधुनिक ज्योतिषशास्त्र व आयुर्वेद यांमधील आंतरविभागीय संशोधनास चालना देणे.

2 **हस्तलिखितांचे संपादन**

- विभागाद्वारे प्राचीन हस्तलिखितांचा अभ्यास, संशोधन व संपादन करण्यास एम्. फिल्. व पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- 'जैमिनी सूत्रावरील हस्तलिखितांचे त्याच्या सर्व टीकांसहित पाठचिकित्सा व संपादन' या प्रकल्पाचे कार्य सुरू आहे.

वेदांग ज्योतिष विभाग

I. भास्कराचार्य व्याख्यानमाला (३ व्याख्याने) :

१. विशेष व्याख्यान : प्रा.सच्चिदानंद उडुपा

वर्ष २०१४-१५ पासून दरवर्षी वेदांग ज्योतिष विभागामार्फ़त भास्कराचार्य व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात येते सालाबाद प्रमाणे या वर्षीही दिनांक ६/०८/२०१९ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.व्याख्यानाचा विषय होता "ज्योतिष शास्त्रातील भास्कराचार्यांचे योगदान ". प्रा. सच्चिदानंद उडुपा,प्राचार्य,राष्ट्रीय संस्कृत संस्थान,राजीव गांधी परिसर, श्रींगेरी हे या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते.प्रा.डॉ.कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. सर्व विभागांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

२.विशेष व्याख्यान: प्रा.डॉ.रमेशचंद्र शुक्ल

या वर्षी दिनांक ०९/०८/२०१९ रोजी विशेष व्याख्यानाचे भास्कराचार्य व्याख्यानमालेअंतर्गत आयोजन केले गेले. या व्याख्यानासाठी प्रा.डॉ.रमेशचंद्र शुक्ल,प्राध्यापक,वेदांग ज्योतिष विभाग,सोमनाथ संस्कृत विद्यापीठ वेरावल,गुजरात हे वक्ते म्हणून लाभले."ज्योतिषशास्त्रे रोग विमर्श"या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. प्रा.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले.सर्व विभागांतील शिक्षक आणि ५० हुन अधिक विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

३. विशेष व्याख्यान: डॉ.रामकृष्ण पेजत्ता

या वर्षी दिनांक १८/०८/२०१९ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.व्याख्यानाचा विषय "ज्योतिषशास्त्रे संशोधनस्य संभावना" असा होता या व्याख्यानासाठी चिन्मय विश्वविद्यापीठ,केरळ येथील प्रा. डॉ.रामकृष्ण पेजत्ता यांना वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. .प्रा.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. सर्व विभागांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

II. त्रिदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा : भारतीय गणितम्

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ वेदांग ज्योतिष विभाग आणि विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (VNIT) तसेच इंडिक अकॅडमी हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी आणि शोध छात्रांसाठी स्व. अनंत व्यवहारे यांच्या स्मृती प्रित्यर्थ भारतीय गणितम् या विषयावर त्रिदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या आयोजन गणित विभाग,VNIT परिसर बजाज नगर नागपूर येथे दिनांक ९ ते ११ सप्टेंबर २०१९ या दरम्यान केले गेले. या उपक्रमात ७० हुन अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला

वैदिक गणिताच्या प्रचार आणि प्रसारासाठी कै. अनंत व्यवहारे यांनी स्वतः ला वाहून घेतले होते आणि कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठशी वैदिक गणिताच्या माध्यमातून जोडले गेले होते.

या कार्यशाळेचे उदघाटन डॉ. प्रमोद पडोळे , निर्देशक,VNIT नागपूर आणि प्रमुख अतिथी प्रा. डी. एम.देवकर,विभाग प्रमुख,गणित विभाग, VNIT,नागपूर,प्रा. डॉ.कविता होले,विभाग प्रमुख ,साहित्य विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत युनिव्हर्सिटी,रामटेक.यांच्या हस्ते झाले.

या कार्यशाळेचे संयोजक प्रो.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय,संकाय प्रमुख,प्राचीन भारतीय विद्या आणि मानव्यशास्त्र संकाय,कविकुलगुरू कालिदास संस्कृत युनिव्हर्सिटी, तसेच प्रा.डॉ. जी. पी. सिंह,विभाग प्रमुख,गणित विभाग,VNIT नागपूर हे होते.

या कार्यशाळेसाठी प्रख्यात गणितज्ञ आणि संस्कृत विद्वान श्री. वेणुगोपाल हेरूर, गुलबर्गा,कर्नाटक यांना आमंत्रित केले गेले होते. . या कार्यशाळेचे निर्देशन डॉ. दिनकर मराठे,विभाग प्रमुख वेदांग ज्योतिष विभाग,KKSU आणि डॉ. प्रसाद गोखले,सहायक प्राध्यापक,वेदांग ज्योतिष विभाग,KKSU यांनी केले.

प्रा.डॉ. व्ही. पी. सिंह,विभाग प्रमुख,गणित विभाग,VNIT नागपूर हे या वेळी उदघाटन समारंभात उपस्थित होते. या वेळी प्रो.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी परिचय पार व्याख्यान केले तसेच डॉ. आशिष जे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच प्रा.डॉ. व्ही. पी. सिंह यांनी आभार प्रदर्शन केले.

चंदीगढ,राजस्थान,मध्यप्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू,उत्तराखंड इत्यादी राज्यातून विविध क्षेत्राशी निगडित असलेले ८३ च्यावर लोक या कार्यशाळेत उत्साहाने सहभागी झाले.

श्री.वेणुगोपाल हेरून यांनी भारतीय गणितं या विषयाची ओळख करून दिली आणि दुसऱ्या सत्रात त्यांनी आर्यभटीय परंपरा हा विषय घेतला. मध्यांतरानंतर हेरूर यांनी आर्यभट्ट गणित पाद या विषयावर केले आणि अंतिम सत्रात प्रा कृष्णकुमार पाण्डेय आणि श्री. हेरूर यांनी सहभागी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला उत्तरे दिली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी श्री हेरूर यांनी ब्रह्मगुप्ताच्या भूमितीच्या सिद्धांतावर व्याख्यान दिले. या वेळी श्री चंद्रहास हलाई,निर्देशक ,इंडिक अकॅडमी ,मुंबई विभाग भारतीय मंदिरांची स्थापत्य रचना आणि त्यांचा गणितीय संबंध या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अंतिम सत्रात प्रा कृष्णकुमार पाण्डेय आणि श्री. हेरूर यांनी सहभागी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला उत्तरे दिली.

कार्यशाळेच्या अंतिम दिवशी श्री. हेरूर यांनी श्री नारायण पंडित यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.या कार्यशाळे दरम्यान दररोज श्री. हेरूर गणितातील छोट्या छोट्या गमती गोष्टी सांगत त्यांमुळे सहभागी जनांचे मनोरंजन झाले आणि गणिता विषयी अधिक गोडी निर्माण झाली.

समारोपाच्या कार्यक्रमात नारायण आचार्य यांच्या बीजगणितं या ग्रंथावरील श्री. हेरूर यांनी केलेल्या टीकेचं मा.प्रा. श्री मधुसूदन पेन्ना,संकाय प्रमुख,भारतीय दर्शन विभाग,KKSU यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. समारोपाच्या कार्यक्रमात प्रा. श्री. पेन्ना यांनी अध्यक्षपद भूषविले. यावेळी व्यासपीठावर समायोजक प्रा. श्री.कृष्णकुमार पाण्डेय व प्रा. जी. पी. सिंह उपस्थित होते. तसेच संयोजक प्रा.डॉ. दिनकर मराठे तसेच प्रा.डॉ.प्रसाद गोखले,डॉ. व्ही. पी. सिंह हे देखील उपस्थित होते.

यावेळी डॉ. दिनकर मराठे यांनी समारोपाचे भाषण केले.

III. आर्यभट्ट तारामंडळ(फिरते तारांगण) - प्रात्यक्षिक

१)दिनांक १९/१२/२०१९

२)दिनांक : १०-१२ जानेवारी २०२०

वेदांग ज्योतिष विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी तारांगणाच्या प्रात्यक्षिकाचा कार्यक्रमाचे १९/१२/२०१९ रोजी JSW कळमेश्वर येथे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या वतीने डॉ.आशिष,श्री रुपेश गोमासे, प्रा.राजेंद्र सिंह विज्ञान शोध संस्था येथील सहायक निर्देशक यांनी तारांगणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले या प्रात्यक्षिकचा ८०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक तर्फे ५० व्या अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेचे हेडगेवार स्मृती भवनात दिनांक १०-१२ जानेवारी २०२० दरम्यान आयोजन करण्यात आले.या परिषदेत सहभागी होण्यासाठी अनेक राज्यांतून १५०० हुन अधिक लोक आले होते. या वेळी वेदांग ज्योतिष विभागाने पुढाकार घेऊन तिन्ही दिवस अतिथींसाठी नक्षत्रमंडळाचा कार्यक्रम दाखवण्यात आला

डॉ.आशिष जे,सहायक प्राध्यापक KKSU, रामटेक, श्री.प्रसाद अयाचित,रुपेश गोमासे, पुष्पक भट या सर्वांच्या सहकार्याने तारांगणाचे १८ प्रयोग दाखवले गेले. या उपक्रमाचे मा.कुलगुरू प्रा. श्रीनिवास वारखेडी यांनी कौतुक केले. प्रा. कृष्णकुमार पाण्डेय, डॉ. दिनकर मराठे,डॉ.प्रसाद गोखले हे यावेळी उपस्थित होते.

IV. वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी वास्तूपरीक्षण आणि प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन :

स्थळ : कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक

नवीन वारंगा परिसर,वारंगा,नागपूर

दिनांक : ०७-०३-२०२०

वेदांगज्योतिष विभागातर्फे वास्तुविद्या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक आणि वास्तू परीक्षणसत्राचे आयोजन करण्यात आले. वास्तुशास्त्रातील सिद्धांत भूमी आणि बांधकामात कसे उपयोजित केले जातात,मृदा परीक्षण,बांधकाम कसे केले जाते ? हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखवणे हा या प्रात्यक्षिक सत्रा मागचा उद्देश होता. यावेळी वास्तुशास्त्रातील सिद्धांत,दिकसाधन यांविषयी डॉ. कृष्णकुमार पांडे यांनी निरूपण केले.डॉ.दिनकर मराठे यांनी वराहमिहिराच्या बृहदसंहितेत सांगितलेल्या भूमिगत जलस्त्रोत ओळखायचे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवले. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना खूप लाभ झाला आणि विद्यार्थ्यांना शास्त्रातील सिद्धांत प्रत्यक्ष बांधकामात कसे उपयोगात आणले जातात या विषयी माहिती मिळाली.

V. एक दिवसीय राष्ट्रीय आंतरजालाच्या कार्यशाळा :

दिनांक: ०४/०५/२०२०

विषय : ज्यौतिषदृष्ट्या वर्तमानवैश्विकस्थितेः चिन्तनम्

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक,वेदांग ज्योतिष विभाग, भारतीय पुराविद्या आणि मानव्य शास्त्र संकायच्या वतीने आंतरजालाच्या माध्यमातून दिनांक ४ मे २०२० रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले गेले.

झूम अँप मार्फत सर्व वक्ते आणि श्रोते यावेळी एकत्र आले होते.

या परिसंवादात देशातील विविध राज्यातून ३५० अधिक ज्योतिष अभ्यासकांनी आपला सहभाग नोंदवला

माननीय कुलगुरू प्रा.राजाराम शुक्ल,संपूर्णानंद संस्कृत युनिव्हर्सिटी, वाराणसी यांनी उदघाटन केले माननीय कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी,कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांनी अध्यक्षीय भाषण केले.

प्रो.श्यामदेव मिश्रा, राष्ट्रीय संस्कृत संस्थान,जयपूर परिसर,

प्रो.अखिलेश्वर मिश्रा,मद्रास संस्कृत महाविद्यालय,चेन्नई

डॉ.उपेंद्र भार्गव, महर्षी पाणिनी संस्कृत युनिव्हर्सिटी,उज्जैन

डॉ.रामकृष्ण पेजत्ता,चिन्मय युनिव्हर्सिटी,

डॉ.प्रवेश व्यास

डॉ. गणेश त्रिपाठी

डॉ.नागेश भट

यांनी COVID-19 संकट आणि त्याला सामोरे जाण्यासाठी मार्गदर्शक तत्वे या विषयावर ज्योतिषशास्त्राच्या आधारावर आपापली मते मांडली. यावेळी समारोपाचे भाषण कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे, भारतीय पुरविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय प्रमुख प्रो.डॉ. कृष्णकुमार पांडे यांनी केले

या आंतरजालीय परिसंवादाचे समायोजन डॉ. दिनकर मराठे,विभाग प्रमुख,वेदांग ज्योतिष विभाग,कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ आणि डॉ.प्रसाद गोखले,सहायक प्राध्यापक कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ यांनी केले तसेच तांत्रिक सहाय्य श्री. राजीव रंजन मिश्रा यांनी केले.

VI. ज्योतिषशास्त्रावरील सप्त दिवसीय परिचयपर वर्ग :

वेदांग ज्योतिष विभाग, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक भारतीय पुरविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय तर्फे दिनांक १६ मे ते २२ मे २०२० दरम्यान zoom app माध्यमातून सप्त दिवसीय परिचयपर ज्योतिषशास्त्र वर्गाचे आयोजन केले गेले.

सर्व विद्यार्थी जिज्ञासू प्रवृत्ती चे असून अभ्यासक्रमाविषयी त्यांना कुतूहल होते. शास्त्राचा प्रचार करणे आणि गैरसमज दूर करणे हा या वर्गाचा मुख्य उद्देश होता. या वर्गात एकूण १०७ विद्यार्थी सहभागी झाले आणि त्यांच्या कडून रु. ५३७०० शुल्क म्हणून प्राप्त झाले. हि रक्कम विभागातर्फे कोविड-१९ निधी मध्ये वळती करण्यात आली.

या वर्गात प्रो.कृष्णकुमार पाण्डेय,डॉ.दिनकर मराठे आणि डॉ. प्रसाद गोखले हे वक्ते होते.

पहिल्या दिवशी म्हणजेच दिनांक १६ मे २०२० रोजी डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी वेदांचा परिचय, वेद, वेदांग, पवित्र ग्रंथ आणि त्यांच्या निर्मिती मागचा उद्देश, त्रिस्कंध म्हणजे काय ? या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक १७मे २०२० रोजी डॉ.प्रसाद गोखले यांनी भारतीय पंचांगाची ओळख या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक १८मे २०२० रोजी डॉ.दिनकर मराठे यांनी राशी परिचय या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक १९ मे २०२० रोजी डॉ.कृष्णकुमार पाण्डेय यांनी कुंडली निर्माण या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक २० मे २०२० रोजी डॉ.प्रसाद गोखले यांनी नवविध कालमान ,अधिमास क्षयमास,पंचांग कसे पाहावे ? राशी अंश कला विकला काय असतात या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक २१मे २०२० रोजी डॉ. दिनकर मराठे यांनी ग्रह परिचय रशिपरिचय, ग्रहांच्या कक्षा,भोग काल,उच्च निचादी भाग या विषयावर व्याख्यान दिले.

दिनांक २२ मे २०२० रोजी या सप्त दिवसीय परिचयपर ज्योतिषशास्त्र वर्गाचा शेवटचा दिवस होता. सातव्या दिवशी प्रा. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कुंडलीचा फलादेश कसा करावा ? आयुयोग,अरिष्ट योग,राजयोग, दशा यांचा विचार फलादेश करताना कसा करावा ? या विषयावर व्याख्यान दिले.

मा.कुलगुरू,प्रो.श्रीनिवास वरखेडी,कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांनी वर्गाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. "ज्योतिषशास्त्र हे प्रत्यक्ष शास्त्र असून ते आपल्याला काय करावे आणि काय नाही याचे मार्गदर्शन करते" असेही ते यावेळी म्हणाले.प्रो. सी. जी. विजयकुमार हे देखील या समारोपाच्या कार्यक्रमात उपस्थित होते.

सहायक प्राध्यापक डॉ.आशिष जे. यांनी या वर्गाचे सह संयोजक म्हणून काम पहिले, सौ.कल्याणी डहाळे,कु.अंबालिका सेठिया, प्रणव मुळे,अनुज शर्मा हे संयोजन समिती मध्ये होते. तसेच वर्गासाठी तांत्रिक साहाय्य श्री.राजीव रंजन मिश्रा यांनी पहिले.

VII. कार्यभार : वेदांग ज्योतिष विभाग शैक्षणिक वर्ष २०१९ -२० एकूण कार्यभार ९८ तास

VIII. विद्यार्थी आणि शोध छात्र : शैक्षणिक वर्ष २०१९ -२० वेदांग ज्योतिष विभाग एकूण विद्यार्थी संख्या १०५, शोध छात्र ८

IX. नवे आखलेले अभ्यासक्रम :

MA ज्योतिर्विज्ञान हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी आखण्यात आला आणि या शैक्षणिक वर्षात वारंगा परिसर नागपूर येथे सुरु करण्यात आला.

XII. विद्यार्थ्यांच्या उपलब्धी :

BA वेदांग ज्योतिष वर्गातील विद्यार्थी कौशल जोशी याने २०१९ मध्ये नागपूर येथे पार पडलेल्या डॉ. वा.मा.दामले नाट्याभिनव आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवले.

BA वेदांग ज्योतिष वर्गातील विद्यार्थी कौशल जोशी याने जानेवारी २०२० मध्ये राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ तिरुपती येथे पार पडलेल्या अखिल भारतीय संस्कृत छात्र प्रतिभा महोत्सवात एकांकिका स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळवले

BA वेदांग ज्योतिष वर्गातील विद्यार्थी कौशल जोशी याला जानेवारी २०२० मध्ये राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ तिरुपती येथे पार पडलेल्या अखिल भारतीय संस्कृत छात्र प्रतिभा महोत्सवात लोकनृत्य स्पर्धेत प्रोत्साहनपर पारितोषिक मिळाले

BA वेदांग ज्योतिष - शास्त्री II वर्गातील विद्यार्थी देवानंद, याने २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजना द्वारे नागपूर येथे आयोजित राष्ट्रीय एकीकरण कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला

शिक्षणशास्त्र विभाग

स्थापना – वर्ष 2008

संकाय – शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय

अभ्यासक्रम – एम्. एड्., एम्. फिल्., पीएच्.डी. शिक्षणशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. ललिता चंद्रात्रे

विभाग प्रमुख – डॉ. कीर्ती सदार, सहयोगी प्राध्यापिका

सहायक प्राध्यापक– डॉ. हृषिकेश दलाई, डॉ. अमोल मांडेकर, डॉ. राजश्री मेश्राम, प्रा. अनघा आंबेकर

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 3

उद्दिष्टे –

- संस्कृत शिक्षकांची तथा इतर शिक्षकांची निर्मिती करणे
- प्राचीन भारतीय शिक्षण संकल्पना आणि आधुनिक शिक्षण पद्धती आणि विचारांचे अध्ययन– अध्यापन आणि संशोधन करणे.
- संस्कृत शिक्षण पद्धती आधुनिक काळाशी सुसंगतरित्या विकसित करणे.
- जागतिक स्तरावरील शिक्षण विचारांचा आणि सिद्धांताचा अद्ययावत अभ्यास करून अभ्यासक्रमाची रचना करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- मार्गदर्शकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे.
- विविध परिषदा, सेमिनार, कार्यशाळा यामध्ये विद्यार्थी, संशोधक छात्र आणि प्राध्यापकांचा सहभाग

शिक्षणशास्त्र विभाग

पद्व्युत्तर शिक्षण विभाग, क.का.सं.वि., रामटेक येथे सत्र २०१९–२०२० मध्ये पुढील कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले.

- दिनांक २ ऑगस्ट २०१९ शुक्रवार रोजी शैक्षणिक परिसर रामटेक येथे संशोधन चर्चासत्र संपन्न झाले. या चर्चासत्राला पुढील तज्ञ उपस्थित होते. त्यांनी संशोधनासंबंधित पुढील विषयावर मार्गदर्शन केले.

  १. डॉ. के.एम. भांडारकर – संशोधनात विषयनिवड निश्चिती
  २. डॉ. प्रशांत पाटील – न्यादर्शन
  ३. डॉ. अर्चना अलोणी – सांख्यिकीय विश्लेषण
  ४. डॉ.स्वाती देशपांडे – संशोधन पद्धती

  चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये शिक्षणशास्त्र संकायाच्या अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे, विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार व सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

  या चर्चासत्राचा लाभ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांना झाला.

- दिनांक ६ ऑगस्ट २०१९ मंगळवार रोजी मातोश्री रमाई भिमराव आंबेडकर सभाकक्षामध्ये 'शिक्षण व अनुशासन' या विषयावर राष्ट्रीय संस्कृत संस्थान श्रृंगेरीचे प्रो. ए.पी सच्चिदानंद यांचे अतिथी व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानाला प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

- दिनांक २३ ऑगस्ट २०१९ रोजी पद्व्युत्तर शिक्षण विभाग व महिला कक्ष यांच्या संयुक्त माध्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ॲडोलसन्स हेल्थ अकादमीच्या अध्यक्ष्या व प्रसिद्ध स्त्री रोगतज्ञ डॉ. जया शिवलकर यांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थीनींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कुलसचिव प्रो. विजयकुमार अध्यक्षस्थांनी होते. शिक्षणशास्त्र संकायाच्या अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे, पद्व्युत्तर शिक्षण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार, प्रा. अनघा आंबेकर, डॉ. हृषिकेश दलाई तसेच विश्वविद्यालयातील महिला प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

- दिनांक १३ सप्टेंबर २०१९, शुक्रवार रोजी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण –२०१९' या विषयावर प.पु. गोळवळकर गुरुजी शैक्षणिक परिसर रामटेक येथे कक्ष क्र. १ मध्ये चर्चासत्र संपन्न झाले. चर्चासत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ. उशषी गुहा व प्रा. गोपीचंद निंबार्ते उपस्थित होते व त्यांनी पुढील विषयावर मार्गदर्शन केले.

  - Dr. Ushashi Guha – Draft of National Education Policy-2019 and Teacher Education
  - Dr. Gopichand Nimbarte- (VNIT, Nagpur) DNEP 2019: Social Contribution and Elimination of Social Problems Through Education

  कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार यांनी केले तर आभार प्रदर्शन अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे यांनी केले. चर्चासत्राचा लाभ विद्यार्थी,संशोधक व प्राध्यापक यांना झाला. चर्चासत्र व्यवस्थित संपन्न झाले.

- दिनांक १८ ऑक्टोंबर २०१९ रोजी संशोधनावर आधारित विशेष व्याख्यानाचे आयोजन पद्व्युत्तर शिक्षण विभागाद्वारे करण्यात आले होते. यामध्ये विषयतज्ञ म्हणून डॉ. के. एम. भांडारकर व संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांनी पुढील संशोधन विषयावर मार्गदर्शन केले.
    - Dr. K. M. Bhandarkar – Statistics in Research
    - Prof. Nanda Puri – Interdisciplinary Research

  या व्याख्यानाला संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

- दिनांक १४ फेब्रुवारी २०२० शुक्रवार रोजी क. का. सं. वि. रामटेक येथे पद्व्युत्तर शिक्षण विभागातर्फे ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ वर आधारित उच्च शिक्षणातील संधी व आव्हाने'' या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन प्रख्यात शिक्षणतज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलपती, कृष्णा इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस कराड यांच्या शुभहस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ मसुदा समितीतील सन्माननीय सदस्य प्रो.एम.के. श्रीधर उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. कुलसचिव प्रो. विजयकुमार, शिक्षणशास्त्र संकायाच्या अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे ,शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार, परिषद समन्वयक डॉ. राजश्री मेश्राम प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

  कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाला. प्रास्ताविक डॉ. कीर्ती सदार यांनी केले. स्वागतपर भाषण डॉ. ललिता चंद्रात्रे यांनी केले. उद्घाटन सत्राचे संचालन प्रा. पल्लवी कावळे यांनी केले तर आभार डॉ. राजश्री मेश्राम यांनी मानले. नोंदणी कार्य प्रा. अनघा आंबेकर यांनी पाहिले.

  उद्घाटनपर भाषणात डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी उपल्या ओजस्वी, प्रभावी भाषणात नव्या शैक्षणिक धोरणासमोर असलेली आव्हाने सोदाहरण विशद केली. बीजभाषक प्रो. एम. के. श्रीधर यांनी शैक्षणिक धोरणातील महत्त्वपूर्ण वैशिष्टयांवर प्रकाश टाकला. कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी हे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जोपर्यंत विद्यापीठे, महाविद्यापीठे स्वयंपूर्ण होणार नाही तोपर्यंत त्यांना स्वायत्तता प्राप्त होणार नाही.

  उद्घाटन सत्रानंतर पेपरसादरीकरण सत्र संपन्न झाले. यामध्ये एकुण ४० प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी पेपर सादरीकरण केले. या सत्राकरिता अध्यक्ष म्हणून हिन्दी विश्वविद्यालय, वर्धा येथील शिक्षणविभागाचे विभागप्रमुख प्रो. गोपालकृष्ण ठाकुर व संस्कृत भाषा संकायच्या अधिष्ठाता प्रो. प्रीती सागर लाभले. समन्वयक म्हणून डॉ. कीर्ती सदार यांनी कार्य पाहिले. या सत्राचे संचलन प्रा. कविता गोमासे यांनी केले.

  राष्ट्रीय परिषदेच्या समारोपामध्ये प्रमुख अतिथी व वक्ते म्हणुन मा. डॉ. पुरणचंद्र मेश्राम, माजी कुलसचिव रा. तु. म. नागपूर विद्यापीठ उपस्थित होते. यावेळी विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी, कुलसचिव प्रो. विजयकुमार मंचावर उपस्थित होते. यावेळी परीषदेचे अहवाल वाचन करण्यात आले. मुख्य वक्ता डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी नव्या शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करुन नव्या शैक्षणिक धोरणातील आव्हाने आणि अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडचणीबाबत विस्तृत मत मांडले. समापन सत्राचे संचलन व आभार शबाना अंजुम यांनी मानले. राष्ट्रीय परिषद व्यवस्थितरित्या संपन्न झाली. या परिषदेला प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

- दिनांक १५ मे २०२० रोजी शिक्षण विभागातर्फे "E-Learning Challanges and Opportunities" या विषयावर राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाले. या वेबिनारला उद्घाटक व बीजभाषक म्हणून प्रो. निता इमानदार, विभागप्रमुख, मनिपाल सेन्टर ऑफ युरोपियन स्टडीज, मनिपाल युनिव्हसिटी या लाभल्या. अध्यक्षपद मा. कुलगुरु

प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. वेबिनारची सुरुवात वैदिक मंत्राने झाली. प्रास्ताविक अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे यांनी केले. अतिथी परिचय विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार यांनी करुन दिला तर संचालन वेबिनार समन्वयक प्रा. हृषिकेश दलाई यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून

१. डॉ. मन्दार भानूषे २. डॉ. परविनकुमार शर्मा ३. डॉ. व्यंकट सुब्रमण्यम लाभले. त्यांनी पुढील विषयावर मार्गदर्शन केले.

- Dr. Mandar Bhanushe : MOOC
  Assit. Prof., Mumbai University
- Dr. Parveenkumar Sharma : Quiz and Making podcasts
  Assit. Prof., MMDU, Ambala, Haryana
- Dr. Venkata Subramanian : Sanskrit E-Learning does one Size fits all can studies and Examples.
  Co-founder & CEO Vyoma
  Linguistic Lab Foundation, Bangalore

या राष्ट्रीय वेबिनारमध्ये संपूर्ण देशातून २००० च्या वर पार्टीसिपंट सहभागी झाले होते. यामध्ये विविध विषयांचे प्राध्यापक, शिक्षण तज्ञ, संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश होता. वेबिनार सर्वांना खूप उपयुक्त ठरला. शेवटी आभार प्रा. रेणुश्री बनसोड यांनी मानले.

बी. बी. ए. / बी. सी.ए.

बी. बी. ए. / बी. सी.ए. ची स्थापना व उद्दिष्टे :–

बी. बी. ए. / बी. सी.ए. ची स्थापना क. का. सं. वि. रामटेक येथे सत्र २०१९–२० पासून करण्यात आली.

रामटेक परिसरातील शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि उद्योजकीय शिक्षणाची सुविधा तसेच अत्यंत नाममात्र शिक्षण शुल्कामध्ये पालकांना आपल्या पाल्याला शिक्षण मिळावे. ह्या उद्देशाने बी. बी. ए. आणि बी. सी.ए. अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.

प्रवेशित विद्यार्थी संख्या

बी. बी. ए. –२२ विद्यार्थी

बी. सी.ए. – ४२ विद्यार्थी

विविध कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग –

- अतिथी व्याख्यान – On ICT- 26th Nov.2019.
- कार्यशाळा – भावनिक बुद्धिमत्ता – 28th Feb. 2020
- आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त– जागरुकता अभियान COVID-19 आणि कॅन्सर – 6thMarch 2020.
- इंद्रधनुष्य सहभाग – 5th Oct.2019
- राहिल शेख – Fine Arts
- अभिषेक दमाहे (BBA) प्रथमेश रोडकर (BCA) मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली येथे आयोजित आंतरवासिता कार्यक्रमात सहभाग उल्लेखनीय– महाराष्ट्रातून केवळ क. का. सं. वि. च्या विद्यार्थ्याचा सहभाग – 14th FEb. 2020 to 28th Feb. 2020

शिक्षकांचे उल्लेखनीय कार्य –

- पालक सभेचे यशस्वी आयोजन
- शिक्षकांचे विविध परीक्षांमधील योगदान – पर्यवेक्षक, प्रूफ रिडीं, प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन
- AIOC मध्ये विविध समितींवर कार्य

विस्तार सेवा कार्य

राष्ट्रीय सेवा योजना

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक शैक्षणिक आणि समाज कार्याच्या माध्यमातून समाजसेवेचे योगदान देण्यात कार्यरत आहे. त्यासाठीच वर्षभर राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठाचे पथक सतत निरनिराळे कार्यक्रम राबवित असते.

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्थापना दिवस :-

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनी म्हणजेच 24.09.2019 रोजी सामाजिक कार्यकर्त्या .... यांनी गाईड च्या विद्यार्थ्यांना आमंत्रित केले. यावेळी त्यांनी अनाथ मुले आणि दारिद्य रेषेखालील लोकांसाठी चंद्रपूर येथे केलेल्या कार्याचे अनुभव विद्यार्थ्यांसोबत वाटले.

विद्यापीठास दिलेली प्रदेश निर्देशकांची भेट : -

राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक निर्देशक श्री. कार्तिकेयन यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि गाईड यांच्याशी संवाद साधला आणि सामाजिक कार्यात कसे सहभागी व्हावे याबाबत मार्गदर्शन दिले. यावेळी आपल्या विद्यापीठातील ५० हुन अधिक स्वयंसेवक सहभागी झाले होते.

महात्मा गांधी जयंती निमित्त सेवाग्राम येथे भेट : -

महात्मा गांधी जयंती (02.10.2019) चे औचीत्त्य साधून NSS च्या विद्यार्थ्यांनी सेवाग्राम जि. वर्धा येथे भेट दिली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना'महात्मा गांधींचे कार्य आणि देशातही चे योगदान या बाबत माहिती देण्यात आली. या वेळी महात्मा गांधी हिंदी विद्यापीठ वर्धा येथेही भेट देण्यात आली. यावेळी १०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्वस्थ भारत प्लग रन : -

दिनांक 30.11.2019 रोजी विद्यापीठ परिसर ते ST स्टॅन्ड, रामटेक दरम्यान स्वस्थ भारत स्वच्छ भारत यांच्या तर्फे प्लग रन चे आयोजन केले गेले यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला. यावेळी सर्वानी ST स्टॅन्ड वर विखुरलेले प्लास्टिक आणि कचरा वेचला आणि विद्यापीठ परिसरात परतले. यावेळी 50 हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

रक्तदान शिबीर : -

दिनांक 24.12.2019 रोजी पं. मदन मोहन मालवीय यांच्या जयंती निमित्त विद्यापीठाच्या भारतीय दर्शन विभागाच्या संयुक्त विद्यमाने रक्त दान शिबीर आयोजित करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांसह 38 जाणणारी रक्तदान केले .

संविधान दिवस : -

दिनांक 26.12.2019 रोजी संविधान दिवसानिमित्त सकाळी प्रार्थनेच्या वेळी विद्यापीठाच्या विद्यार्थी , शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी संविधानाप्रती निष्ठेची शपथ घेतली. या प्रसंगी माननिय कुलगुरू आणि विद्यापीठाचे रजिस्ट्रार उपस्थित होते.

जॉय ऑफ गिव्हींग : -

दुसऱ्या सत्राच्या प्रारंभी दिनांक 24.01.2020 ते 30.01.2020 या दरम्यान NSS सेवकांकडून जॉय ऑफ गिव्हिंग कार्यक्रम आयोजित केला गेला.या कार्यक्रमात विद्यापीठाच्या विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जुने कपडे दान दिले. या कार्यक्रमात सर्वजण उत्साहात सहभागी झाले. यावेळी गरजू आणि निराधार व्यक्तींना देण्यासाठी खूप कपडे जमा करण्यात आले.

राष्ट्रीय एकीकरण शिबीर (NIC) , बेंगळूरू : -

बंगळुरू येथे दिनांक 17.02.2010 ते 23.02.2010 दरम्यान आयोजित एकीकरण (NIC) शिबिरात NSS चे चार (२ मुलगे, २ मुली) विद्यार्थी पाठवण्यात आले. परतल्यावर सहभागी विद्यार्थी लाभान्वित होऊन राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्य अधिक उत्साहाने करू लागले.

राज्यस्तरीय निवासी शिबीर : -

गाळणे, ता. मालेगांव, जि.नाशिक येथे दिनांक 20.022020 ते 26.02.2020 दरम्यान आयोजित राज्यस्तरीय निवासी शिबिरात NSS चे पाच (३ मुलगे ,२ मुली) विद्यार्थी पाठवण्यात आले. परतल्यावर सहभागी विद्यार्थी लाभान्वित होऊन राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्य अधिक उत्साहाने करू लागले.

गृहबद्धता काळात रामटेक पोलिसांना सहकार्य :-

दिनांक 12.04.2020 ते 3.05.2020 या दरम्यान Covid-19 आपत्ती काळात NSS च्या ११ विद्यार्थ्यांनी रामटेक पोलिसांना गुहबद्धतेचे परिपालन नागरीकांकडून करून घेण्यासाठी रामटेक येथील प्रत्येक पोलीस चौकीत जाऊन अतिरिक्त मनुष्यबळ देऊन सहकार्य केले. या विद्यार्थ्यांनी एकूण २२ दिवस पोलिसांना सहकार्य केले.

सार्वजनिक स्वयंपाकघर सेवा (शिधा सेवा) : -

Covid-19 आपत्ती काळात गृहबद्धतेत NSS च्या विद्यार्थ्यांनी दिनांक 17.04.2020 ते 17.05.2020 या दरम्यान विद्यापीठाच्या उपाहारगृहाच्या मदतीने सार्वजनिक स्वयंपाकघर चालवले. या दरम्यान दररोज 40 ते 50 प्रवासी मजुरांना, निराधार व्यक्तींना तसेच कर्तव्यावर असलेल्या पोलिसांना अन्न पुरवठा केला जाई.

मुखाच्छादन आणि निर्जंतुकीकरण द्रव्याचे वाटप : -

दिनांक 12.04.2020 ते 17.05.2020 दरम्यान Covid-19 आपत्तीत पोलीस कर्मचारी, सफाई कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना सुमारे 150 मुखाच्छादन आणि 50 निर्जंतुकीकरण द्रव्याचे वाटप केले गेले

धान्य संच वितरण : -

Covid-19 आपत्ती काळात दिनांक 17.04.2020 रोजी स्वतंत्ररित्या विद्यापीठाच्या NSS युनिट मार्फत ज्यांचे जीवन कोरोना संकटामुळे विस्कळीत झाले आहे अशा गरजू व्यक्तींना 100 धान्यसंच वाटप करण्यात आले तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संयुक्त विद्यमाने 250 धान्य संचांचे वितरण काण्यात आले.

छात्र कल्याण विभागाद्वारे वर्ष 2019-20 मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम व स्पर्धांचे विवरण

1) गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

दरवर्षी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वर्धापणादिनी सर्व शैक्षणिक विभागातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो। प्रत्येक पदव्युत्तर स्तरावरील विशेषाध्ययन विषयामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येतात. वर्ष 2019-20 या शैक्षणिक वर्षात 18-09-2019 रोजी विश्वविद्यालयाच्या स्थापनादिनी हे पुरस्कार निम्नलिखित विद्यार्थ्यांना देण्यात आले.

1. वेद विशेषाध्ययन - महर्षि वेदव्यास पुरस्कार- श्रेयस कुरेकर
2. व्याकरण विशेषाध्ययन - महर्षि पाणिनि पुरस्कार – तृप्ति लांजूडकर
3. साहित्य विशेषाध्ययन -नाट्याचार्य भरतमुनि पुरस्कार- सायली पेशवे
4. दर्शन विशेषाध्ययन- - सर्वदर्शन पुरस्कार- कल्पना चांदूरकर
5. योग विशेषाध्ययन - महर्षि पतंजलि पुरस्कार- सुनीता वाधावन
6. वेदांग ज्योतिष विशेषाध्ययन -होराममर्मज्ञ वराहमिहिर पुरस्कार - श्रीगौरी घटाटे
7. शिक्षण शास्त्र विभाग - -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार- वैशाली चिडे

प्रत्येक विद्यार्थ्याला रोख रू. 2000/- आणि प्रमाणपत्र असे पुरस्कार देण्यात आले.

2. धिषणा परिषद्

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे 2019-20 या वर्षी धिषणापरिषद् नावाचा हा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमांतर्गत प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारी 2 ते 5 या कालावधीत धिषणा परिषदेचे आयोजन केले जाते. या धिषणा परिषदेचे मुख्य उद्देश्य म्हणजे शास्त्ररक्षण व विद्यापीठात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची तैयारी करणे होय. प्रत्येक विभागाचे विद्यार्थी या परिषदेत सहभाग घेतात. या परिषदेत प्राध्यापकांपैकी कोणीही अध्यक्ष म्हणून उपस्थित असतात . सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक या परिषदेला उपस्थित असतात. प्रत्येक महिन्याच्या सोमवारी त्या-त्या विभागातील विद्यार्थ्यांना काही शास्त्रीय विषय दिले जातात व त्या त्या विभागातील प्राध्यापक त्या विद्यार्थ्यांकडून त्या विषयांची व्यवस्थितपणे तयारी करून घेतात. शुक्रवारी दोन वाजता ते विद्यार्थी सर्वांसमोर आपापले विषय मांडतात. व त्याच अनुषंगाने इतर उपस्थित विद्यार्थी त्यांना काही प्रश्न सुद्धा विचारतात.

अशाप्रकारे प्रत्येक शुक्रवारी धिषणा परिषदेचे आयोजन केले जाते. या आयोजनामध्ये सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे सहभाग असतो. या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी वेदांत विभागाचे प्राध्यापक डॉ. धीरज कुमार पांडे हे बघतात. प्रत्येक शुक्रवारी मागील परिषदेचे इतिवृत्त वाचले जातात अशा प्रकारे हा कार्यक्रम पार पडतो. वर्ष 2019-20 मध्ये एकूण 15 धिषणा परिषदेचे आयोजन करण्यात आले.

3. 15 दिवसीय विद्यार्थी अधिष्ठापन कार्यक्रम

दिनांक 01\07\12019 ते 15\7\12019

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागातर्फे नवीन सत्राच्या प्रारंभी नवीन आलेल्या विद्यार्थ्यांकरिता 15 दिवसीय विद्यार्थी अधिष्ठापन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 01\07\2019 ते 15\07\2019 दरम्यान करण्यात आले होते। या कार्यक्रमात नवीन प्रवेशित व पूरातन अश्या एकूण 90 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला। कार्यक्रमाचे खालील उद्दिष्टे होते- 1. नवीन वातावरणात त्यांना रुजवणे 2. निरोगी राहण्याकरिता त्यांना उदबोधन 3. दैनंदिन दिनचर्या 4.प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यात मैत्रीपूर्ण व्यवहार 5. संवेदनशीलता 6. स्वतः चे आकलन विकसित करणे 7. आजूबाजूचे लोक 8. मोठ्या प्रमाणात समाज आणि निसर्गची जाणीव. अधिष्ठापन कार्यक्रमादरम्यानची त्यांच्या शैक्षणिक स्वारस्याबद्दल त्यांना संवेदनशील करण्यासाठी क्रियाकलाप, स्पर्धा, त्यांना उत्कृष्टतेसाठी कार्य करणे, संबंध निर्माण करणे, शिक्षक आणि विदयार्थी आणि एकूणच व्यक्तिमत्व विकास इत्यादि .

अधिष्ठापन कार्यक्रम अंतर्गत खालील प्रमुख क्रियाकलाप ज्यात विद्यार्थीदिवसभर या संपूर्ण कार्यक्रमासाठी व्यस्त होते –

1. शारीरिक क्रियाकलाप: यामध्ये रोजच्या शारीरिक क्रियाकलापांचा समावेश होता। योगासह खेळ आणि खेळ जे संघ कार्यभावना विकसित करण्यास मदत करतील. २. सर्जनशील कला: प्रत्येक विद्यार्थी कलांशी संबंधित एक कौशल्य निवडेल परफॉर्मिंग आर्टसची दृश्य कला म्हणजे चित्रकला, संगीत इ. 3, सार्वभौम मानवी मूल्ये विद्यार्थ्यास स्वतः चे शोध घेण्यास मदत करणे, धैर्य इ. 4, साहित्यिक: वाचन, लेखन, वादविवाद इत्यादींची माहिती। 5. प्रख्यात लोकांची व्याख्याने असे लोक जे विदयार्थ्यांना सामाजिकदृष्ट्या सक्रिय किंवा सक्रिय लोकांसमोर आणतात। 6. स्थानिक क्षेत्राला भेट देणे: यामुळे ते या क्षेत्राशी परिचित होतील आणि उघडकीस येतील, विदयार्थ्यांना सोयीस्कर वाटणे हे या कार्यक्रमाचे उद्दीष्टे होते। हा कार्यक्रम प्रतिदिन सकाळी 6 ते सायंकाळी 10 वाजेपर्यंत चालत असे।

कार्यक्रमाचे उदघाटन विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी केले, व विद्यार्थ्यांना उद्बोधन केले। तसेच या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून साहित्य संकायाच्या प्रमुख माननीय नंदा पुरी उपस्थित होत्या तसेच या कार्यक्रमाचे समापन विश्वविद्यालयाचे माननीय कुलसचिव विजय कुमार यांनी केले। या कार्यक्रमात विश्वविद्यालयातील प्राध्यापकांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते तसेच हैद्राबाद येथून आलेल्या श्री अनिल कुमार यांनी संस्कृत टूल्स विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले। तशेच रामटेक

शहरातील काही मान्यवरांनाही व्याख्यानाकरिता बोलावण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान दोन दिवस सफाई अभियान ही राबवण्यात आले।

या कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन छात्रकल्याण डॉ. जयवंत चौधरी यांनी केले।

4. प्रथम युवा महोत्सव 2019-20

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे मा. कुलगुरू यांच्या प्रेरणेने व आशिर्वादाने दि. 05.10.2019 रोजी रामटेक परिसरात छात्र कल्याण विभागातर्फे प्रथम युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवामध्ये विश्वविद्यालयाशी संलग्नीत एकूण 10 महाविद्यालयातील 120 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, या प्रथम युवा महोत्सवात वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, शास्त्रीय गायन, सुगम संगीत, पाश्चिमात्य गायन, भारतीय समूहगान, शास्त्रीय वाद्य, लोक/आदिवासीनृत्य, शास्त्रीय मृत्य, एकांकिका, मुकनाटय,नकला, प्रहसत, प्रश्नमंजुषा, स्थळ चित्र, चिकटकला, पोस्टर मेकिंग, मती कला, व्यंगचित्र, रागोळी, स्थळ छायाचित्रण या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धापैकी प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले। या महोत्सवाची काही ठळक वैशिष्टे -

1. एकूण 21 स्पर्धेमध्ये 120 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग
2. पहिल्यांदाच एकूण 10 महाविद्यालयांचा सहभाग
3. पहिल्यांदाच एकूण 70 पारितोषिके या युवा महोत्सवात दिले गेले.
4. पहिल्यांदाच इन्द्रधनुष्य येथे घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

या स्पर्धामध्ये जे विद्यार्थी प्रथम आलेले आहे त्या विद्यार्थ्यांना गडचिरोली येथे होत असलेल्या इन्द्रधनुष्य 2019 मध्ये सहभाग घेण्याची संधी मिळाली। या महोत्सवाचे शुभारंभ सकाळी 10 वाजता झाले व समापण 6.30 वा. या कार्यक्रमाच्या समापण समारंभात माननिय कुलसचिव डॉ.सी. जी विजयकुमार, साहित्य विभाग प्रमुख डॉ.कविता होले , ज्योतिष विभाग प्रमुख डॉ.दिनकर मराठे व संचालक छात्र कल्याण डॉ.जयवन्त चौधरी उपस्थित होते.

या महोत्सवाच्या सफल समाप्तिकरिता सर्व अंशकालिन शिक्षक तसेच डॉ. प्रसाद गोखले, डॉ.पल्लवी कावळे, डॉ.दिपक कापडे इत्यादींचे सहकार्य लाभले. ललितकला व गायन कलेकरीता बाह्य परिक्षकांचा सहभाग लाभला.

5. महात्मा गांधी जयन्ती व शैक्षणिक सहल

२ ऑक्टोम्बर हा दिवस संपूर्ण भारतात गांधीजींनी केलेल्या कार्यामुळे व त्यांच्या स्मरणार्थ गांधी जयंती म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी महात्मा गांधीजींशी संम्बधीत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात व भारतदेशाला त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले जाते. या निमित्ताने २ ऑक्टोम्बर

२०१९ रोजी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने गांधीजींचे कार्यक्षेत्र असलेले सेवाग्राम येथे व गांधीजींच्या कार्याला व विचारांना समाजासमोर आणण्याचा प्रयत्न करणारे महात्मा गांधी हिन्दी विश्वविद्यालय वर्धा येथे एका सहलीचे आयोजन केले होते. या सहलीमध्ये माननीय कलगरू तसेच विद्यापीठातील प्राध्यापक व विश्वविद्यालयातील एकूण ११० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सकाळी ७.०० वा. रामटेक येथून ही सहल सूरू झाली सर्वप्रथम महात्मा गांधी हिन्दी विश्वविद्यालय येथे आयोजित महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे माननीय कुलगुरू यांनी व इतर मान्यवरांनी मा कुलपति डॉ.रजनीश शुक्ला म.गा.अ.हि. वि.वर्धा यांच्या अध्यक्षतेत गांधीजींचे महान अस्त्र चरखा चालवून उद्घाटन केले. त्यानंतर माननीय कुलगुरू प्रो.श्रीनिवास वरखेडी यांनी प्रमुख अतिथी भाषण करून गांधीजींचा संदेश सर्वान समोर उपस्थापित केला. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी गांधीजींशी संबधित प्रदर्शनीचे अवलोकन करत विश्वविद्यालयाचे परिभ्रमण केले. म.गा अ.हि.वि.वर्धातर्फे सर्व विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापकांसाठी सूस्वादू जेवनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. जेवनानंतर सर्व चमूने सेवाग्राम येथे गांधी कुटीला भेट दिली. तिथे गाईडच्या माध्यमाने महात्मा गांधी आश्रम बघून माननीय कुलगुरू यांच्या अध्यक्षेत प्रार्थना करण्यात आली. या शैक्षणिक सहली सोबत संचालक छात्र कल्याण डॉ.जयवन्त चौधरी, डॉ. दिनकर मराठे, डॉ.कविता होले, डॉ. कृष्णकुमार पाण्डेय इत्यादी प्राध्यापक उपस्थित होते.

6. शिक्षक दिवस

कविकुलगुरूकालिदास संस्कृत विश्वविद्यालयात ५ सप्टेंबर २०१९ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यादिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षक बनुन स्वयंशासित वर्ग घेतले. नंतर एक कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमात स्वयंशासित वर्गातून क्रमांक काढण्यात आले. त्यात अश्विनी बावणे, राम शर्मा, सिमरन ठाकुर, श्रुति शर्मा, भक्ति पुरंदरे यांचा क्रमांक आला. नंतर एक औपचारिक कार्यक्रम घेण्यात आला. त्यात विश्वविद्यालयाचे कुलगुरू श्रीनिवास वरखेडी तसेच स्वामी रामानन्द तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या जनसंवाद व मिडीया विभागाचे डॉ. प्रा. दिपक शिन्दे प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सिमरन ठाकुर या विद्यार्थिनींनी केले. शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांकडून काही खेळ ठेवण्यात आले होते. खेळांचे नेतृत्व श्रुति शर्मा आणि सफलतेसाठी इतर विद्यार्थ्यांनी मदत केली तर छात्र कल्याण समिती चे प्रमुख डॉ.जयवन्त चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

7. संस्कृत महोत्सव 2019-20 अंतर्गत विविध स्पर्धा

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या विस्तार सेवा मंडळाद्वारे संस्कृत महोत्सव 2019-20 चे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाने एकूण दहा विविध स्पर्धांचे आयोजन केले.

1. **मेघदूत पाठांतरस्पर्धा**

या स्पर्धांमध्ये सर्वप्रथम **मेघदूत पाठांतर** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, या स्पर्धेमध्ये एकूण पांच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या स्पर्धेत प्रथम क्रमांक अमृता बरबडीकर, द्वितीय क्रमांक वैदेही कुलकर्णी व तृतीय क्रमांक मेघा डहारे यांनी प्राप्त केला.

2. **भगवद्गीता पाठांतरस्पर्धा**

द्वितीय स्पर्धा भगवद्गीता पाठांतर स्पर्धा (बारावा अध्याय) या स्पर्धेत एकूण दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, या स्पर्धेत प्रथम क्रमांक हर्ष शर्मा, द्वितीय क्रमांक शिवकुमार, तृतीय क्रमांक शिवानी सेनगुप्ता व प्रोत्साहनपर क्रमांक चंद्रशेखर मिश्रा यांना प्राप्त झाला.

3. **स्वरचित कविता वाचनस्पर्धा**

या स्पर्धेत एकूण 11 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, यामध्ये देशभक्तीपरक कविता वाचन, सामाजिक कविता वाचन इत्यादी कवितांचा प्रकार होता या स्पर्धेत प्रथम क्रमांक रुपेश रुद्रकार, द्वितीय क्रमांक हिमांशू वैष्णव, तृतीय क्रमांक सम्मेद कोल्हे व प्रोत्साहनपरक क्रमांक ऋतुजा पाटील यांना प्राप्त झाला.

4. **संस्कृत श्लोक अंताक्षरीस्पर्धा**

या स्पर्धेत एकूण 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धे अंतर्गत संस्कृतच्या सगळ्या छंदांचा प्रयोग केल्या गेला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अनुज शर्मा, द्वितीय क्रमांक वैदेही कुलकर्णी, व तृतीय क्रमांक हिमांशु वैष्णव व प्रसाद भोगे यांना विभागून दिला गेला.

5. **भाषणस्पर्धा**

या स्पर्धेचा विषय होता स्वच्छता, पर्यावरण व संस्कृत भाषा, या स्पर्धेमध्ये एकूण 13 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वितराग वसवाडे, द्वितीय क्रमांक गणेश चंदनबटवे, तृतीय क्रमांक राम शर्मा व प्रोत्साहनपरक क्रमांक अश्विनी पुजारे यांना प्राप्त झाला.

6. **ध्येयवाक्य प्रश्नस्पर्धा**

भारतातील विविध संस्थांची, विविध विश्वविद्यालयाची, सहकारी संस्थांची जी ध्येय वाक्य आहे त्या ध्येय वाक्यांशी संबंधित ही स्पर्धा होती या स्पर्धेमध्ये एकूण 12 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अमृता बरबडीकर, द्वितीय क्रमांक अश्विनी बावणे व तृतीय क्रमांक राम शर्मा यांना प्राप्त झाला.

7. **संस्कृत गीत गायनस्पर्धा**

स्पर्धा या स्पर्धेमध्ये एकूण 16 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये विविध संस्कृत गीतांचे गायन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्रज्ञा करकरे, द्वितीय क्रमांक सिमरण ठाकूर, तृतीय क्रमांक विभागून अमृता बरबडीकर व पल्लवी खेवले यांना देण्यात आला.

8. **संस्कृत रक्षासूत्र निर्माणस्पर्धा**

या स्पर्धेचे प्रथमच विद्यालयात आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण 11 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये प्रथम क्रमांक ऋतुजा पाटील, द्वितीय क्रमांक राखी तुरनकर, तृतीय क्रमांक अंशिता बावणे व प्रोत्साहनपर क्रमांक धीरज बांगडे यांना देण्यात आला.

9. **संस्कृत फलक निर्माण स्पर्धा**

संस्कृत फलक निर्माण स्पर्धेमध्ये संस्कृत भाषेत विविध फलक बनवून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये एकूण तीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यामध्ये भावना मेनन या विद्यार्थिनीला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

10. **संस्कृत निबंध स्पर्धा**

संस्कृत निबंधस्पर्धेमध्ये एकूण 35 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांनी आपले निबंध छात्र कल्याण विभागामध्ये सादर केले. यामध्ये प्रथम क्रमांक संचिता पाठक, द्वितीय क्रमांक सिमरण ठाकूर व तृतीय क्रमांक उमेश सुकुरवाडी यांना प्राप्त झाला.

पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचा संस्कृत महोत्सव 2019- 20 या कार्यक्रमाच्या समापण कार्यक्रमात विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

8. **महाराष्ट्र प्रांतीय शास्त्रीय पाठांतर स्पर्धेकरिता निवड फेरी**

राष्ट्रीय संस्कृत संस्थान मुंबई येथे होणाऱ्या महाराष्ट्र प्रांतीय शास्त्रीय पाठांतर स्पर्धा -2019-20 या स्पर्धेमध्ये रामटेक परिसरात व वारंगा परिसरात शास्त्री,आचार्य व विशारद वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची या पाठांतर स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरिता एक निवड फेरी घेण्यात आली होती.

या स्पर्धांमध्ये व्याकरण भाषण, साहित्य भाषण, सांख्ययोग भाषण, वेदांत भाषण, धर्मशास्त्र भाषण, ज्योतिष भाषण, जैन बौद्ध दर्शन भाषण, वेदभाष्य भाषण, व्याकरण शलाका परीक्षा, पुराण इतिहास शलाका परीक्षा, अमरकोश कंठपाठ अष्टाध्यायी कंठपाठ, धातुरूप कंठपाठ, भगवद्गीता कांठपाठ, साहित्य शलाकापरीक्षा, काव्यकंठपाठ इत्यादी स्पर्धांकरिता विद्यार्थ्यांची निवड फेरी छात्र कल्याण विभागाद्वारे दिनांक 10-11- 2019 रोजी घेण्यात आली होती.

या विविध स्पर्धांकरिता विश्वविद्यालयात अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व ज्या विद्यार्थ्यांची निवड झाली त्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र प्रांतीय शास्त्रीय पाठांतर स्पर्धेकरिता मुंबई येथे पाठविण्यात आले होते.

9. **गणेशोत्सव** 2019- 20

गणेशोत्सव हा भारतीयांचा एक सार्वजनिक उत्सव आहे . भारतीय समाजामध्ये एकी असावी या उद्देशाने बाळ गंगाधर टिळकांनी ह्या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या लोकजागृती करून घेण्यासाठी या उत्सवाचा प्रभावीपणे अवलंब करण्यात आला. महाराष्ट्रात या सार्वजनिक गणेशोत्सवाला खूप मोठी लोकप्रियता लाभली. ह्या उत्सवात गणपतीची पूजा केली जाते. भारतीयांचे आराध्य दैवत असलेल्या विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन भाद्रपद शुद्ध चतुर्थीला होते, व दहा दिवस मोठ्या उत्साहाने हा उत्सव साजरा करण्यात येतो.

हेच उद्देश मनात ठेवून विश्वविद्यालयामध्ये शिकणारा प्रत्येक विद्यार्थी व इथे राहणारा प्रत्येक कर्मचारी मिळून हा उत्सव साजरा करतात। छात्र कल्याण विभागाने प्रत्येक उत्सव साजरे करण्याचे काही उद्दिष्ट ही ठरवलेले आहे- 1. सर्व विद्यार्थ्यांनी मिळून कार्य केले पाहिजे । 2. सर्व विद्यार्थ्यांना माहाराष्ट्रात साजरे होणारे उत्सव व भारतात साजरे होणाऱ्या उत्सवांची माहिती असणे इत्यादी । ह्याच सर्व उद्देशाने दिनांक 02-09-2019 रोजी विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागांतर्गत उत्सव मंडळाद्वारे गणेश उत्सवाला प्रारंभ झाला. मोठ्या उत्साहात गणेशाचे विश्वविद्यालयात आगमन झाले. विश्वविद्यालयाच्या सार्वभौमिक विकासासाठी गणेशाचे पूजन करण्यात आले. प्रतिदिन सकाळी 8 वाजता व संध्याकाळी 7 वाजता विद्यार्थ्यांद्वारे गणेश पूजन व आरती होत होती। या गणेश उत्सवात विश्वविद्यालयातील प्राध्यापकांचा ही मोठा सहभाग होता. 12-09-2019 रोजी मोठ्या उत्साहात माननीय कुलगरूंच्या उपस्थितीत गणपतीचे विसर्जन करणात आले, व सर्वांना महाप्रसाद ही देण्यात आला.

या गणेश उत्सवाचे वैशिष्ठ म्हणजे या उत्सवात पर्यावरणाला धोका निर्माण होईल अश्या कोणत्याही प्रकारच्या वस्तूचा प्रयोग नाही करणात आला. कोणत्याही प्लास्टिकच्या वस्तूचा प्रयोग नाही करणात आला. याच सोबत या दहा दिवसांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करणात आले जसे भाषण स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, इत्यादी व विजेता विद्यार्थ्यांना पारितोषिके ही देण्यात आले. अश्या प्रकारे शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये विद्यार्थी उत्सव मंडळातर्फे प्लास्टिकमूक्त गणेश उत्सवाचे आयोजन करण्यात आले.

10. **सक्रमणोत्सव २०१९-२०**

मकर संक्रान्तिच्या निमित्ताने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचे अध्यक्ष माननीय कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी व प्रमुख पाहुणे म्हणुन पर्यटन मित्र श्री.चंद्रपालजी चौकसे उपस्थित होते. श्री चंद्रपालजी चौकसे यांनी सर्वांना मकर संक्रान्तिचे महत्त्व सांगूण विश्वविद्यालयाला रू ५१,०००/- दान दिले.

या कार्यक्रमात मंचावर परिक्षा नियंत्रक, पुस्तकालय अध्यक्ष, संचालक रामटेक परिसर, संचालक छात्र कल्याण व सर्व संकायाचे प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. संचालक छात्र कल्याण डॉ.जयवन्त चौधरी यांनी वर्ष भर विविध स्पर्धेमध्ये गेलेल्या विद्यार्थांचे व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व संपुर्ण वर्षात विद्यार्थानी कुठेकुठे सहभाग घेतला हे सांगितले. माननीय कुलगुरू यांनी सर्व विद्यार्थांचे अभिनंदन केले व पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात AIOC मध्ये सेवा करणाऱ्या सर्व शिक्षकांचा कर्मचाऱ्यान्चा व स्वयंसेवकांचा माननीय कुलगुरू यांनी प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. या कार्यक्रमात वारंगा परिसरातील ५० विद्यार्थी व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ५० विद्यार्थी नागपुर येथुन आले होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.पल्लवी कावळे यांनी केले. जेवनानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आपले सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

11. विशेष व्याख्यान

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागातर्फे शुक्रवार दिनांक १३-०९-२०१९ रोजी दुपारी दोन वाजता धिषणा परिषदेअंतर्गत छात्र कल्याण विभागातर्फे MPSC, UPSC व **फर्दर जोब सेक्युरिटी** याविषयी एक विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वपूर्ण व उपयोगी व्याख्यान ठेवण्यात आले होते, व्याख्याता म्हणून संदीप सिंग हे युनिक अकॅडमी, पुणे येथे व्याख्याता आहे.व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी MPSC, UPSC व करिअर विषयी प्रश्न सुद्धा विचारले.

तसेच दिनांक 12- 2- 2020 रोजी मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभाग येथून आलेल्या डॉक्टर शकुंतला गावंडे यांचे विद्यापीठातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान ठेवण्यात आले होते त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता **संशोधनाच्या दिशा.**

भारतातील इतर शैक्षणिक संस्थांमध्ये विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

1. इंद्रधंनुष्य सांस्कृतिक युवा महोत्सव 2019-20

17 वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक इंद्रधंनुष्य युवा महोत्सव 2019 यावर्षी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे दिनांक 02 ते 06 डिसेंबर 2019 या कालावधीत आयोजित करण्यात करण्यात आला होता. कार्यक्रमामध्ये एकूण 17 कला प्रकारामध्ये विश्वविद्यालयातील 21 विद्यार्थ्यांनी घेतला होता.

2. महाराष्ट्र प्रांतीय शास्त्रीय पाठांतर स्पर्धा

दिनांक 13 नोव्हेंबर 2019 रोजी मुंबई येथे के. जे. सोमय्या या ठिकाणी राष्ट्रीय संस्कृत संस्थान तर्फे पाठांतर, शलाका, भाषण, काव्य कंठ पाठ या विषयी विविध राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण 07 विद्यालयांनी सहभाग घेतला होता यात रामटेक येथील कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयच्या एकूण 17 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

3. 14 वा अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह 2019-20

राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ तिरुपती द्वारे 14 व्या अखिल भारतीय छात्र प्रातिभ समारोह 2019-20 चे आयोजन तिरुपती विद्यापीठ येथे करण्यात आले होते या छात्र प्रतिभा समारंभामध्ये विश्वविद्यालयातील एकूण 15 विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

4. 58 व्या अखिल भारतीय शास्त्रीय स्पर्धा

राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या एकलव्य परिसर अगरतला, त्रीपुराद्वारे 58 व्या अखिल भारतीय शास्त्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विश्वविद्यालयातील आकाश पाटील व श्रुति शर्मा या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

5. Short Internship Programme, New Delhi

NATIONAL HUMAN RIGHTS COMMISSION Manav Adhikar Bhawan द्वारे दि. 14: 02: 2020 ते 28.02.2020 पर्यंत Short Internship Programme या कार्यक्रमाचे आयोजन दिल्ली येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात आयोगाच्या मानवी हक्क आणि आयोगाच्या कामकाजाच्या विविध बाबींची माहिती दिली गेली. या कार्यक्रमामध्ये विश्वविद्यालयातील प्रथमेश शिरवडकर, विशाल गोरे, आदेश कुमार,वीरेंद्र पटले, अभिषेक दमहे या 05 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

6. 35th AIU National Youth Festival & Amity Utsav.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही आयोजित 35वे भारतीय विश्वविद्यालय संघ(AIDS) राष्ट्रीय युवा महोत्सव सोहळा 3 फेब्रुवारी ते 7 फेब्रुवारी 2020 या कालावधीत नोएडा उत्तरप्रदेश येथील अमेठी विद्यापीठात पार पडला . या महोत्सवात सम्पूर्ण देशभरातून जवळपास 93 विद्यापिठांचा सहभाग असून या महोत्सवात एकूण 25 पेक्षा जास्त स्पर्धामध्ये जवळपास 1200 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय युवा महोत्सवात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने पहिल्यांदाच सहभाग घेतला. जीवाजी विद्यापीठ येथे झालेल्या मृगनयनी राज्यस्तरीय युवा महोत्सवात ज्या विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले होते त्याच विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभाग घेतला. या 25 स्पर्धा पैकी "ऑन द स्पॉट पेन्टींग" व "इन्स्टालेशन" या दोन स्पर्धामधे अनामिका बारंगे, ऋचा बर्वे, साक्षी राठी, नविया अलि कागजवाला, अंकुश तरफदार या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या चमू सोबत संघ व्यवस्थापक म्हणून रश्मी शेलवट व डॉ.बाबट हे दोन प्राध्यापक सुध्दा गेले होते.

सर्व विद्यार्थ्यांचे संचालक डॉ.जयवन्त चौधरी व विश्वविद्यालयाचे कुलगुरू माननीय श्रीनिवास वरखेडी यांनी अभिन्दन केले.

7. आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

आंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये भाषण कौशल वाढविण्याकरिता व समाजात स्त्री जनजागृती वाढविण्याकरिता विदर्भ साहित्य संघ व श्री. नरेंद्र तिडके महाविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने २७

जानेवारी २०२० रोजी श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबाळा रोड, रामटेक, जि. नागपूर येथे **"ना. के. बेहरे स्मृती विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेचा विषय होता : **स्त्री सुरक्षितता : कायदा आणि समाजपरिवर्तन** या वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागातर्फे रामटेक परिसरातील एम ए योग या विषयात शिकणारी **तेजस्विनी माणिकराव** व वारंगा परिसर नागपूर येथून साहित्यात एम ए करणाऱ्या **मैथिली अंजनकर** या दोन विद्यार्थिनींनी सहभाग घेतला। या स्पर्धेत त्यांनी आपले उत्कृष्टपणे भाषण केले । त्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला।

विद्यार्थिनींचे माननीय कुलगुरू व छात्र कल्याण संचालक डा जयवंत चौधरी यांनी अभिनंदन केले।

8. राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा -2019

शिक्षण प्रसारक मंडळ कामठी, द्वारा संचालित सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयाचे संस्थापक सेठ श्री नेमकुमारजी पोरवाल यांच्या पुढाकाराने इ.स. १९६५ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. हे महाविद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरशी संलग्नित असून नॅक द्वारा मानांकित 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

महाविद्यालयातीलच नव्हे तर विविध महाविद्यालयाच्या सर्वगुण संपन्नतेचा ध्यास निर्माण करण्यासाठी महाविद्यालयानी सेठ केसरीमल पोरवाल यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरिय वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन केले होते.

या वादविवाद स्पर्धेचा विषय होता **अभिव्यक्ती स्वातंत्र्य एक अमर्यादित हक्क असला पाहिजे**

या वादविवाद स्पर्धेत कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागातर्फे एम ए योग च्या **तेजस्विनी माणिकराव** व व्याकरण शास्त्राच्या शास्त्री द्वितीय वर्ष्याच्या **आकाश पाटील** या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यांनी उत्कृष्टपने आपले वक्तृत्व या स्पर्धेत मांडले यांना प्रमाण पत्र देण्यात आले । छात्र कल्याण संचालक डा जयवंत चौधरी व विश्वविद्यालयाच्या कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

9. आंतरविद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

दिनांक १०-१२-२०१९ रोजी orange city college of social work या येथे आंतरविद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नागपुर जिल्हातील विविध महाविद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

या स्पर्धेमध्ये कविकलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयामधुन M.A.II year ची विद्यार्थिनी **मैथिली अंजनकर** व B.All year चा विद्यार्थी **राधेय शेरेकर** यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेसाठी एकूण ३ विषय दिल्या गेले होते ते खालीलप्रमाणे - **१. मानव अधिकार आणि भारतीय लोकशाही पुढील आव्हाने. २. लोकशाही व्यवस्थेचे संरक्षक म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका ३. २१ व्या शतकातील प्रजासत्ताक भारतामधिल वाढती सामाजिक असुरक्षितता.** छात्र कल्याण संचालक डा जयवंत चौधरी व विश्वविद्यालयाच्या कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

10. आन्तरमहाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव वेध

आर.एस.मुंडले धरमपेठ आर्ट व कॉमर्स महाविद्यालय नागपुर या महाविद्यालयाद्वारे "आन्तरमहाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव वेध" महोत्सवाचे आयोजन करण्यात होते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वेध २०२० चे आयोजन २७ जानेवारी २०२० ते २९ जानेवारी २०२० या कालावधित पार पडले.

महाविद्यालयाने वेध –२०२० मध्ये अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. जसे. रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा वादविवाद स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, प्रश्नोत्तर स्पर्धा, समुह नृत्य इ. - या स्पधांपैकी समुह नृत्य या स्पर्धाप्रकारामध्ये समूहनृत्य या स्पर्धाप्रकारामध्ये देशभक्ति गाण्यावर विश्वविद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

१. हर्ष शर्मा - प्रा.शा.द्वि.वर्ष व्याकरण २. चन्द्रशेखर मिश्रा - प्रा.शा.द्वि. वर्ष व्याकरण ३. प्रसाद भोगे - प्रा.शा.द्वि.वर्ष साहित्य ४. अभिराम गदाधर - प्रा.शा.प्र.वर्ष ५. शिवली सेनगुप्ता - प्रा.शा हि वर्ष दर्शन ६. कोमल - शाहि वर्ष-साहित्य ७. ऋतुजा पाटील - शा.द्वि.वर्ष साहित्य ८. माहि - शाहि वर्ष -साहित्य

या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना डॉ. रेणुका करंदिकर मॅडम, सत्यजित खताळ व अनुज शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व विद्याथ्यांचे मा.कुलगुरू व संचालक छात्र कल्याण यांच्या द्वारे अभिनन्दन करण्यात आले.

हस्तलिखित संसाधन केंद्र, रामटेक

कविकुलागुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक हे २००४ पासून राष्ट्रीय हस्तलिखित मिशन नवी दिल्ली चे राष्ट्रीय हस्तलिखित संसाधन केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. MRC भारताच्या हस्तलिखित वारसाची महत्त्वपूर्ण माहिती शोधण्यात, दस्तऐवजीकरण करण्यास, संरक्षणास आणि सुलभ करण्यासाठी एक समग्र दृष्टीकोन विकसित करण्याचा प्रयत्न करते . केंद्राची उद्दिष्टे सर्वेक्षण, डेटा संग्रहण, कागदपत्रे जतन करणे आहे. आजतागायत महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा भागासह एकूण १६५२८ हस्तलिखिते केंद्राकडे नोंदविली आहेत. तसेच हस्तलिखित जागृती मोहीम अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले.

२८-०९-२०१५ रोजी कविकुलागुरू कलिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक आणि राष्ट्रीय हस्तलिखित मिशन, नवी दिल्ली यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला आहे. राष्ट्रीय हस्तलिखित मिशन, नवी दिल्ली यांनी 2015 मध्ये MRC रामटेक यांना प्रथम हप्ता म्हणून ४.५ लाख रुपये सुपूर्द केले आहेत.

जानेवारी २०१८ मध्ये कविकुलागुरू कलिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक आणि राष्ट्रीय हस्तलिखित मिशन दिल्ली यांच्यात झालेल्या सामूहिक सामंजस्य कराराचे जाने- २०१८ ते डिसेंबर २०२० पर्यंत नूतनीकरण करण्यात आले.

केकेएसयू एमआरसीची जबाबदारी महाराष्ट्र राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा भागातील हस्तलिखितांची देखरेख आणि दस्तऐवजीकरण आणि सर्व हस्तलिखितांशी संबंधित क्रिया जसे की सर्वेक्षण (हस्तलिखित जिथे उपलब्ध आहेत अशा संस्थागत तसेच खाजगी हस्तलिखितांचे संग्रहण) प्रमाणे आहे.

- **हस्तलिखितांचे डिजिटलायझेशन :**

केकेएसयू ग्रंथालयातील उपलब्ध हस्तलिखितांचे डिजिटलायझेशन प्रगतीपथावर आहे .हे काम ऑगस्ट 2019 मध्ये सुरू झाले आहे. एनएमएमच्या मदतीने जवळपास 2600 हस्तलिखितांचे डिजिटायझेशन केले जाईल.

- **हस्तलिखितशास्त्र अभ्यासक्रम :**

विद्यार्थ्यांमध्ये हस्तलिखिते आणि विविध लिपींचे ज्ञान निर्माण करण्यासाठी, केकेएसयूने अल्पकालीन अभ्यासक्रम - हस्तलेखनशास्त्र व पॅलेग्राफी इन डिप्लोमा. हा कोर्स २०१४-१५ पासून आजपर्यंत यशस्वीरित्या सुरू आहे.

*****

क्रीडा विभाग

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 2019–20 पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे दिनांक 26–12 –2019 ते 31–12–2019 या कालावधीत संपन्न झाला. यात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या चमूने सहभाग घेतला एकून 32 मुले व मुली यांचा समावेश होता यामध्ये कबड्डी व वैयक्तिक खेळ यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला चमूसोबत डॉ. अमोल मांडेकर संचालक शारिरीक शिक्षण व संघव्यावस्थापक म्हणून डॉ. प्रशांत पाठक व प्राध्यापक अतुल मिराशे संघ व्यावस्थापक म्हणून चमूसोबत उपस्थित होते.

तसेच सत्र 19–20 मध्ये विश्वविद्यालयाच्या टी–20 क्रिकेट स्पर्धेमध्ये विश्वविद्यालयाच्या 16 शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा–यांनी सहभाग नोंदविला सदर स्पर्धा ही माहे जानेवारीमध्ये स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेड येथे घेण्यात आली होती. सदर स्पर्धेचे फोटो सोबत जोडलेले आहे.

*****

महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा महिला कक्ष खालील उद्देशांच्या परिपूर्तीसाठी स्थापित झालेला आहे :

- महिलांकरिता विशेष सुविधा
- लैंगिक समानता
- स्त्रियांची स्वयंपूर्णता
- लिंग समानुभूती
- विद्यार्थिनी आणि कर्मचाऱ्यांच्या समस्यापूर्तीसाठी सुविधेची उपलब्धता

सन २०१९–२० मध्ये विश्वविद्यालयाने महिला सुविधा कक्ष, हिरकणी कक्ष आणि मुलींची खोली यांच्या स्थापनेसाठी अंदाजे रु.२,००,०००/– ची वित्तीय तरतूद उपलब्ध करून दिली होती. यामध्ये मुलींच्या वसतिगृहाचा ही समावेश होता.

हिरकणी कक्ष, महिला सुविधा कक्षाचे उद्‌घाटन

दि. २.८.२०१९ रोजी प्रा. रत्ना बासू, कोलकाता, कार्यकारी मंडळ सदस्य AIOC यांच्या हस्ते तसेच मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यात खालील सुविधांची उपलब्धता करण्यात आली. स्तनदा मातांसाठी विशेष सुविधा, फ्रीज, मायक्रोवेव्ह, पलंग, गाद्या, खुर्च्या, ड्रेसिंग टेबल, बी.पी. मशिन, वजनकाटा इ. मुलींना आराम करण्यासाठी तसेच त्यांच्या विशेष शारीरिक गरजांसाठी सुसज्ज Girls Common Roomची स्थापना करण्यात आली.

- **विशेष व्याख्यानांचे आयोजन**–२३.०८.२०१९ रोजी ख्यातनाम समुपदेशक आणि कुमारवयीन मुलांचे केंद्राच्या संचालिका डॉ. जया शिवलकर याचे व्याख्यान समुपदेशन तसेच भावनिक बुद्धिमत्ता या विषयावर झाले. या प्रसंगी त्यांच्या दिवंगत भगिनी डॉ. विनया रणसिंग यांची ग्रंथसंपदा (१२३) त्यांनी विश्वविद्यालयास प्रदान केली. यामध्ये शिक्षणशास्त्र आणि ज्योतिषावरील ग्रंथांचा प्रामुख्याने समावेश आहे. सहभागी संख्या – १००.

- १९.१२.२०१९ –'विद्यार्थ्यांसाठी पोषक आहाराची आवश्यकता' या विषयावर रामटेक येथील डॉ. अंशुजा किंमतकर यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थिनींची शारीरिक आणि मानसिक क्षमता वाढविण्यासाठी संतुलित आहाराचे महत्व त्यांनी विशद केले. सहभागी संख्या – १००.

- ६.३.२०२० – आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त डॉ. मंजु गिरी आणि डॉ.अर्चना कोठारी, स्त्री रोगतज्ञ आणि IMA सचिव ह्यांचे 'कॅन्सर आणि लसीकरण' यांची जागरुकता यावर विशेष व्याख्यान झाले. विद्यार्थिनी, शिक्षक आणि रामटे परिसरातील स्त्रियांनी याचा लाभ घेतला. सहभागी संदस्य १५०. सदर कार्यक्रमाचा अहवाल युजीसीला पाठविण्यात आला.

- **कार्यशाळेत सहभाग** – दि. २२ व २३ जानेवारी २०२० रोजी पं. रविशंकर शुक्ला विश्वविद्यालय, रायपूर (छ.ग.) येथे आयोजित 'सुरक्षित परिसर आणि UGC मार्गदर्शक सूचनांचे पालन' या विषयावरील कार्यशाळेत महिला कक्ष समन्वयक प्रा.अनघा आंबेकर आणि अंतर्गत तक्रार समिती सदस्य डॉ रेणुका बोकारे यांनी सहभागी होऊन सादरीकरण केले.

- **सखी मतदार केंद्र येथे लोकसभा व विधानसभा निवडणूक प्रसंगी सक्रीय सहभाग :** एप्रिल २०१९ तसेच ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या निवडणूकांसाठी सलग दुसऱ्यांदा रामटेक येथील मतदार केंद्र 'सखी मतदार केंद्र' म्हणून निवडण्यात आले. हे केंद्र पूर्णपणे महिलांद्वारे व्यवस्थापित होते. प्रीसायडिंग अधिकारी अनघा आंबेकर ह्यांनी आपल्या स्त्री सहकाऱ्यांच्या मदतीने यशस्वीपणे कार्य केले.

- **महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता :** नियमित वैद्यकीय तपासणी आणि सल्ला व मार्गदर्शन याासाठी विश्वविद्यालयाच्या महिला कक्षाद्वारे वैद्यकीय अधिकारी सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. डॉ. वर्षा पावडे (खरड), रामटेक, ह्या आपल्या सेवा विश्वविद्यालयाला देत आहेत. नियमित तपासणी तसेच विशेष गरज असणाऱ्या विद्यार्थी व कर्मचारी यांना नियमितपणे सल्ला व मार्गदर्शन केले जाते.

- **महिलांसाठी विश्वविद्यालय परिसरात विशेष सुविधा :** विश्वविद्यालय परिसरात तसेच मुलींच्या वसतिगृहात पर्यावरण पूरक इन्सिनरेटर बसविण्यात आले आहेत. स्वच्छ आणि सुरक्षित प्रसाधनगृह, सॅनिटरी नॅपकिन, व्हेंडिंग मशिन उपलब्ध आहेत. संपूर्ण परिसर कर्मचारी व विद्यार्थिनींसाठी अत्यंत सुरक्षित आणि सोयीस्कर आहे कारण संपूर्ण परिसर सि.सि.टी.व्ही.च्या निगराणीखाली आहे.

- **ICC (अंतर्गत तक्रार समिती)** : अंतर्गत तक्रार समिती कार्यक्षम आणि सुयोग्य पद्धतीने सुजीसीच्या नियमांन्वये महिलांच्या सुरक्षिततेसाठी कार्य करीत आहे. महिला अत्याचार अथवा तत्सम सर्व विद्यार्थिनी आणि कर्मचारी तक्रार दाखल करु शकतात. समिती अत्यंत गोपनी पद्धतीने कार्य करुन तक्रारकर्त्याला न्याय मिळवून देते. तक्रारपेट्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. समितीशी संपर्कासाठी सर्वसमिती सदस्यांची यादी सूचना फलकांवर उपलब्ध आहे.

- **कोविड–१९ दरम्यान घरगुती हिंसाचार यावर वेबिनारचे आयोजन** : ३० एप्रिल २०२० रोजी सदर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव, अधिष्ठाता, शिक्षक, कर्मचारी आणि विशेष अतिथींचा सहभाग होता. (सदस्य ३४) कोविड–१९ च्या कालावधीत महिलांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक सहाय्य कसे द्यावयाचे तसेच त्यांचे बळ कसे वाढवायचे आणि बाह्य वातावरणाशी सक्षमपणे कसे तोंड द्यावे याविषयी चर्चा करण्यात आली. तसेच कोविड–१९ नंतरच्या काळात या संदर्भात विश्वविद्यालय महत्वाची भूमिका घेईल. याविषयी विश्वास व्यक्त करण्यात आला.

- **जेंडर चॅम्पियन समितीचे गठन :** यूजीसीच्या नियमावलीनुसार प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेमध्ये लिंग समभाव जागृतीसाठी सदर समितीचे गठन करण्यात यावे. ह्या समितीत नोडल शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनी आणि विद्यार्थी ह्यांचा समावेश आहे. ह्या समितीच्या कार्यामुळे लिंग समभाव जागृती होईल तसेच कुटुंब आणि सामाजिक पाठिंबाही मिळेल.

मराठी भाषा पंधरवडा कार्यक्रम अहवाल

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे शासनपरिपत्रकानुसार मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी या सर्व कार्यक्रमांच्या समन्वयक होत्या.

सांप्रत सुरू असलेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेत शोधनिबंधांचे एक विशेष सत्र मराठी साहित्य व संस्कृती या विषयावर आयोजिण्यात आले. डॉ. मदन कुळकर्णी, निवृत्त विभागप्रमुख, स्नातकोत्तर मराठी विभाग, नागपूर विद्यापीठ हे यांनी या सत्राचे अध्यक्षपद भूषविले. प्राच्यविद्या परिषदेचे आणि ही परिषद् महाराष्ट्रात आयोजित असल्याचे औचित्य साधून हे सत्र यावर्षी विशेषत्वाने अंतर्भूत करण्यात आले. या सत्रात 23 संशोधकांनी शोधनिबंध सादर केले.

तसेच विश्वविद्यालयातर्फे नुकत्याचे प्रकाशित झालेल्या कालिदास समग्र वाङ्मयाच्या संपादक मंडळ आणि अनुवादकांचा सत्कार करण्यात आला. संपादकांमध्ये डॉ. मदन कुळकर्णी, डॉ. लीना रस्तोगी, प्रो. नंदा पुरी, प्रो. मधुसूदन पेन्ना, प्रो. कविता होले आणि या संपूर्ण प्रकल्पाचे कार्यकारी संपादक डॉ. पराग जोशी यांचा समावेश होता. तसेच अनुवादकांमध्ये डॉ. शैलजा रानडे, डॉ. वीणा गानू, डॉ. कावेरी जाधव, डॉ. रमा गर्गे, डॉ. राजेंद्र जैन, डॉ. रेणुका बोकारे, डॉ. मृदुला तापस, प्रा. संभाजी पाटील, डॉ. पल्लवी कर्वे, प्रा. पल्लवी कावळे यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्कृत तथा संस्कृतेतर संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांनी भूषविले. संपादकांचा सत्कार कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी तर अनुवादकांचा सत्कार प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवयित्री आणि साहित्य विहार संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशा पांडे यांनी केला.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार कु. अमृता बरबडीकर हिने मानले.

सांस्कृतिक नजराणा देखील या संवर्धन पंधरवडयानिमित्त 'गर्जा महाराष्ट्र माझा' या कार्यक्रमाद्वारे रसिकांना सादर करण्यात आला. विश्वविद्यालयाची माजी विद्यार्थिनी सौ. मंजिरी वैद्य अय्यर आणि चमूने हा कार्यक्रम परिषदेच्या दुस–या दिवशी सादर करून सांध्यकालीन सांस्कृतिक सत्राची दिमाखदार सुरुवात केली. 'सूर निरागस हो' या गणेशवंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कलाकारांनी या गीतावर नृत्यही सादर केले. अमर कुळकर्णी यांनी 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताने मराठी राज्य महाराष्ट्राचा जयजयकार केला. त्यानंतर अमर, मंजिरी व आदित्य ने आपली लोकपरंपरा असलेल्या भूपाळी सादर केल्या . घनश्याम सुंदरा, ये ग ये ग विठाबाई, खेळ मांडियेला, अबीर गुलाल, स्वयंवर झाले सीतेचे, सेतू बांधा रे अशी विविध गीते गायकांनी सादर केली तर काही गीतांवर नृत्यही सादर करीत मराठी पाऊल कसे पुढे पडते आहे याची प्रचिती दिली.

या कार्यक्रमांना विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक, रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सहसमन्वयक प्रा. पल्लवी कावळे तसेच सहका–यांनी हे कार्यक्रम सफल होण्यासाठी सहकार्य केले.

''मराठी भाषा गौरव दिन'' अहवाल

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे नागपूर व रामटेक येथे बुधवार, दि. 27 फेब्रुवारी 2020 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठया उत्साहाने संपन्न झाला. रामटेकमधील ख्यातनाम पत्रकार आणि समर्थ उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री दीपक गिरधर हे प्रमुख अतिथी व व्याख्याते या नात्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी आणि व्यासपीठावर विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग प्रमुख व रामटेक परिसर संचालक प्रो. कविता होले उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाला. प्रमुख व्याख्याते श्री. दीपक गिरधर यांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रमुख अतिथी श्री. दीपक गिरधर म्हणाले, ''ज्ञानेश्वर महाराज, म्हाइंभट यांच्या अमृतातेही पैजा जिंके अशा मराठीची समृद्ध परंपरा कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, भा. रा. तांबे यांनी समृद्ध केली. कालानुरूप मराठी वर इंग्रजीचे अतिक्रमण झाले आहे. मराठीची समृद्ध परंपरा जोपासायची असेल तर आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा उपयोग केला पाहिजे. संस्कृत विद्यापीठ हे केवळ संस्कृत भाषेसाठी असले तरी या विद्यापीठात मराठीचा होत असलेला गौरव हा निश्चितच अभिनंदनीय व अभिमानास्पद आहे. इंग्रजी शाळांच्या वाढत्या संख्येमुळे मराठी शाळा व पर्यायाने मराठी भाषा लुप्त होत आहे. आजच्या पिढीला मराठी भाषेची गोडी, आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज आहे. मराठी पुढील पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी, समृद्ध करण्यासाठी महाराष्ट्रात मराठी भाषा विद्यापीठ व्हावे आणि अर्थार्जन करून देणारे विविध आयामही प्राप्त झाले तर ख–या अर्थाने आधुनिक कालात मराठी जिवंत राहील.''

कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रो. नंदा पुरी यांनी मराठी भाषेत आणि मराठी भाषेसाठी संस्कृत विद्यापीठाने समग्र कालिदास वाङ्मयाचा मराठी अनुवाद करून कालिदाससाहित्य समाजोन्मुख केल्याचे साभिमान नमूद केले. मराठी भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी ही आपलीच असून आपली मराठी अस्मिता आपण जपण्यासाठी जागृत राहण्याचे आवाहन केले. भाषेच्या अभिव्यक्तीची पराकोटी ही काव्यात दिसून येते. आज संपन्न झालेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीची समृद्धी आणि विचारांची विविधता कौतुकास्पद आहे. विश्वविद्यालयाने कायमच संस्कृतसह मराठी तसेच अन्य भाषाभगिनींचा समादर केला आहे आणि या अनुषंगाने विश्वविद्यालय निरंतर कार्य करेल अशी ग्वाही दिली.

या निमित्ताने स्वरचित मराठी काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये 16 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. कलापिनी अगस्ती आणि प्रा. अनघा आंबेकर यांनी केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक चिन्मय मुंजे, द्वितीय क्रमांक ऋतुजा पाटील, तृतीय क्रमांक प्राजक्ता कुलकर्णी व अमृता बरबडीकर आणि उत्तेजनार्थ पुरस्कार संचिता पाठक यांना प्राप्त झाला. पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून अभिनंदन करण्यात आले.

मराठी काव्यवाचन कार्यक्रमाचे तसेच मुख्य कार्यक्रमाचे संचालन अनुक्रमे डॉ. पूनम तिडके व सौ. माधवी कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रो. कविता होले यांनी केले.

या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, विभाग प्रमुख तसेच रसिक श्रोत्यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार 2019

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी **पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार''** प्रदान केला जातो. **महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार आज शुक्रवार, दि. 10 जानेवारी 2020 रोजी प्रदान करण्यात आले.**

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या आध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळयाला प्रमुख अतिथी म्हणून मा. केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, श्री. हरिश्चंद्र अग्रवाल, मुख्य अधिकारी, डाक विभाग (पोस्ट मास्टर जनरल) बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुरेश शर्मा, श्री. रमेश शर्मा , नागपूरचे जिल्हाधिकारी श्री. रवीन्द्र ठाकरे, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. प्रशांत सवाई, विशेषत्वाने उपस्थित होते.

ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे. समाजात संस्कृत भाषेला गौरवयुक्त स्थान मिळवून देण्यात ज्यांनी अमूल्य योगदान प्रदान केले अशा महान विभूतींना महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार विश्वविद्यालयाकडून दिला जातो.

2019 चा ज्येष्ठ संस्कृत विद्वान् संवर्गात संस्कृत पंडित व वेदभाष्यकार प्रो. देवीसहाय पाण्डेय तसेच प्रख्यात वेदान्त, व्याकरणशास्त्रपंडित प्रो. कंदाडै रामानुजाचार्य, हैद्राबाद आणि युवा संस्कृत विद्वान् संवर्गात प्रख्यात न्याय व वेदान्त शास्त्र पंडित प्रो. मणिशास्त्री द्रविड, चेन्नई यांना प्रस्तुत पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, चंदनहार, सन्मानपत्र, भेटवस्तू व रोख पुरस्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सन्मानपत्राचे वाचन डॉ. रेणुका बोकारे, डॉ. पराग जोशी व डॉ. दिनकर मराठे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिनकर मराठे, डॉ. पराग जोशी यांनी केले. वंदे मातरम् ने सांगता झाली.

परिषदेच्या 50 व्या अधिवेशनानिमित्त बैद्यनाथ प्रतिष्ठानचे संचालक श्री. सुरेश शर्मा यांनी तीनही पुरस्कार्थींना 50000/– रू. देण्याचे जाहीर केले व त्यानुसार सदर रकमेचे धनादेश तीनही पुरस्कारार्थींना देण्यात आले. महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्काराच्या समन्वयक या नात्याने जनसंपर्क अधिकारी डॉ. रेणुका बोकारे यांनी यशस्वी कार्य केले

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद शताब्दी समारोह

१० ते १२ जानेवारी २०२०

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद उद्घाटन समारोह -

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वतीने आयोजित अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचा शताब्दी महोत्सव आणि सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडु यांच्या हस्ते 10 जानेवारी २०२० रोजी कविवर्य सुरेश भट सभागृहात थाटात पार पडले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री नितीन राऊत, कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी, परिषदेचे अध्यक्ष गौतम पटेल, कार्यकारी सचिव सरोजा भाटे, स्थानिक सचिव मधुसूदन पेन्ना व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी, जगातील चीन, पर्शियन, जर्मन पर्यटकांनी आणि प्रवासी अभ्यासकांनी भारतीय संस्कृती आणि सभ्यतेवर संशोधन केले. भाषेतूनच संस्कृती आणि भावनेची ओळख पटते. भारतात विविध भाषा आणि संस्कृती एकत्र नांदते आणि त्यातून एकतेचे दर्शन घडते. भारतात १५९०० भाषा आणि बोली प्रचलित आहेत. यातील बहुतांश भाषांची जननी संस्कृत आहे. या परिषदेने आपल्या शोधकार्य इतर भाषेतून अनुवादित केल्यास ते सर्वांना उपलब्ध होण्यास मदत होईल असे आवाहन उपराष्ट्रपतींनी केले. आधुनिक काळात भौगोलिक नव्हे तर प्राचीन इतिहास आणि संस्कृती यामुळे जगात भारताची ओळख आहे. जगातील विविध देशात भारतीय संस्कृती आणि साहित्यावर संशोधन व अभ्यास सुरू आहे. देशांतर्गत विचार केल्यास जनमानसात राष्ट्रीय भावनेला प्रोत्साहन देण्यात प्राच्यविद्येचे विशेष योगदान असल्याचे प्रतिपादन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी केले. भारतीय शिक्षण प्राथमिक स्तरापासून ते हायस्कूलपर्यंत मातृभाषेतून होणे आवश्यक आहे. प्रशासकीय कामात देखील स्थानिक भाषेचा वापर झाल्यास जनसामान्यांसाठी ते अधिक श्रेयस्कर ठरते. भारतीयांवर ब्रिटीशांनी इंग्रजी qबबविल्यामुळे आज इतर भाषांवर अन्याय होत आहे. इंग्रजीतून शिक्षण घेतल्यास माणूस मोठ्या पदापर्यंत जाऊ शकतो हा समज आता समाजातून दूर करण्याची गरज आहे. कॉनव्हेंटमधून शिक्षण न घेतलेल्या अनेक महान व्यक्ति होऊन गेल्या आणि त्या उच्चपदापर्यंत पोहोचल्या. त्याचप्रमाणे भारतीय इतिहास, संस्कृती, क्रांतीकारकांचा इतिहास तसेच कला, कौशल्य देखील अभ्यासक्रमात शिकविण्याची गरज असल्याचे आवाहन उपराष्टपतींनी यावेळी केले. संस्कृत भाषा ही सर्व भाषांची जननी आहे. त्यामुळे संस्कृत असो, योगाभ्यास असो या सर्वांना जाती, धर्माच्या चष्म्यातून न पाहता ज्ञान आणि आरोग्य संवर्धन या दृष्टीकोनातून त्याकडे पहावे असेही यावेळी व्यंकय्या नायडू यांनी सांगितले.

तत्पूर्वी पालकमंत्री नितीन राऊत यांनी आपल्या भाषणात परिषदेत सहभागी सर्व विद्वान प्रतिनिधींचे स्वागत केले तसेच या परिषदेतील ठरावातून येणारे निर्णय आयोजकांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठविल्यास शासन विचार करेल आणि त्यावर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होईल असे आश्वासन दिले. प्रारंभी प्रास्ताविकातून गौतम पटेल यांनी प्राच्यविद्या हे शाश्वत साहित्य आहे, आणि दरवर्षी त्यात भर पडत असल्यामुळे तो एक ऐतिहासिक दस्तावेज देखील असल्याचे सांगितले.

श्री. नितीन गडकरी यांनी भारतीय प्राच्यविद्येचा आणि संस्कृतचा अन्य देशात गौरव केला जातो याचे उदाहरण सांगितले. भारताचा हा मूल्यविचार, ज्ञानखजिना अनमोल असून तो पुढील पिढयांपर्यंत संक्रमित करण्यात संस्कृत विद्यापीठ आघाडीवर आहे. संस्कृत विद्यापीठाच्या स्थापनेचे श्रेय हे स्वर्गीय सुधाकरराव नाईक आणि स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांना आहे.

मुख्य सोहळ्याचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी तर मान्यवरांचे स्वागत डॉ श्रीनिवास वरखेडी यांनी केले. स्थानिक सचिव प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी आभार मानले.

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेची वैशिष्टये –

सारस्वत यात्रा – अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या पूर्वसंध्येला आज गुरुवार, दि. 9 जानेवारी 2020 रोजी दुपारी 3 ते 5 या दरम्यान सारस्वत यात्रेने झाला. यात्रेचे उद्घाटन श्री. श्रीश देवपुजारी, अखिल भारतीय संघटनमंत्री, संस्कृत भारती, नवी दिल्ली यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचे अध्यक्ष प्रो. गौतम पटेल, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते संस्कृत विद्वान् प्रो. सत्यव्रत शास्त्री तसेच कार्यकारी सचिव प्रो. सरोजा भाटे, कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी भगवी पताका फडकावून सारस्वत यात्रेचा शुभारंभ केला. परिषदेचे स्थानिक सचिव प्रो. मधुसूदन पेन्ना, समन्वयिका डॉ. कलापिनी अगस्ती, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी विशेषत्वाने उपस्थित होते. परिषदेच्या पूर्वसंध्येला आयोजित या यात्रेत 15 शाळांचे सुमारे 800 च्या वर विद्यार्थी आपल्या शिक्षकांसह सहभागी झाले होते. विश्वविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक यांच्या सह स्वतः कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनीही ग्रंथदिंडीसह मार्गक्रमण केले. सदर यात्रेत प्राच्यविद्या अनुरागींनी मोठया संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण रेशिमबाग परिसराने जल्लोष, उत्साह आणि ऊर्जेचा अनुभव या निमित्ताने घेतला. परिसरातील नागरिकांनीही या यात्रेचे उत्साहाने आणि आनंदाने स्वागत केले.

111 ग्रंथांचे प्रकाशन – सारस्वतम्

उद्घाटन समारोहात मा. उपराष्ट्रपती महोदयांच्या हस्ते शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने 111 पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. संस्कृत, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या चार भाषांमध्ये साहित्य, वेदान्त, न्याय, दर्शन, ज्योतिष, योग, शिक्षणशास्त्र, आयुर्वेद, वास्तु, भाषाशास्त्र इ. विविध शास्त्रांवरील संशोधनपर 111 ग्रंथ सारस्वतम् चे डिजिटल प्रकाशन करण्यात आले. 50 अधिवेशनांमधील आध्यक्षीय भाषणांचा संग्रह असलेले Oriental Legacy हा ग्रंथही मा. उपराष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते याप्रसंगी प्रकाशित करण्यात आला.

Documentary on History of AIOC

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचा 100 वर्षांच्या इतिहासाचा वेध घेणा–या History of AIOC एका लघुपटाचे प्रदर्शन करण्यात आले. मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या मार्गदर्शनातून साकारलेल्या या लघुपटाची निर्मिती कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने केली आहे. जनसंपर्क अधिकारी रेणुका बोकारे यांनी संहितालेखन, दिग्दर्शन व निवेदन केले आहे.

विशेष टपाल तिकीटाचे प्रकाशन –

मान्यवरांच्या शुभहस्ते परिषदेच्या शताब्दी समारोहानिमित्त विशेष टपाल तिकीटाचे, पोस्टल कव्हरचे प्रकाशन करण्यात आले. डाक विभागाचे श्री. हरिश्चंद्र अग्रवाल मुख्य पोस्ट मास्टर जनरल, मुंबई यांचे मौल्यवान सहकार्य या प्रकाशनासाठी लाभले.

वैदर्भी विशेषांकाचे प्रकाशन –

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेनिमित्ताने प्राच्यविद्येच्या क्षेत्रात वैदर्भीयांच्या योगदानाची गौरवपूर्ण दखल घेणारा वैदर्भी विशेषांक देखील प्रकाशित करण्यात आला.

प्राच्यविद्याशेमुषी – मान्यवर वक्त्यांची व्याख्याने

या त्रिदिवसीय परिषदेत विविध सत्रांमध्ये प्राच्यविद्या अध्ययन व संशोधन – भविष्यातील दिशा या आशयसूत्रावर भारतातील विविध प्राच्यविद्यातज्ज्ञांची व्याख्याने संशोधक विद्यार्थी तसेच अभ्यासकांसाठी आयोजित करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्लीचे सन्माननीय कुलगुरू प्रो. रमेशचंद्र पाण्डेय यांच्या शुभहस्ते आणि कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे संस्थापक कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. 'अक्षर पुरूष दर्शन' या विषयावर महामहोपाध्याय स्वामीजी भद्रेश दास यांचे उद्घाटन पर व्याख्यान झाले. या व्याख्यानमालेत प्रो. अरविंद राव, प्रो. कुटुंबशास्त्री, डॉ. बलदेवानंद सागर, श्री. सुरेशजी सोनी, प्रो. हरेकृष्ण शतपथी, प्रो. वसंत भट्ट, प्रो. श्रीकांत बहुलकर, प्रो. नागराज पातूरी, श्री. विजय फणशीकर इ. विद्वानांचा समावेश आहे.

शास्त्रार्थ परिषद - अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेत २ शास्त्रार्थ परिषद संपन्न झाल्य. या शास्त्रार्थाच्या अध्यक्षस्थानी प्रो. मणी द्राविड शास्त्री होते तर, निरिक्षक प्रो. कोरडा सुब्रमणियम् होते. या परिषदेत प्रो. नारायण पुजारी, भद्रेश दास, बृजभूषण ओझा द्वारा प्राचीन व्याकरण, डॉ. गणेश ईश्वर भट्ट द्वारा अद्वैत वेदांत विषयांवर और डॉ. गुरुराज कालकर यांनी भाट्ट मीमांसे वर आपले विचार प्रकट केले.

द्वैत वेदांत या विषयावर डॉ. नारायण पुजारी यांनी वेदाभ्यास या विषयावर प्रो. वीरनारायण पांडुरंगी , साहित्य या विषयावर प्रो. कोम्पेला सूर्यनारायण यांनी विचार मांडले. तर, प्रो. रंगा रामानुजाचार्य यांनी विशिष्टाद्वैत, मीमांसा या विषयावर पं. महेश्वरम् यांनी विचार व्यक्त केले. प्राचीन न्याय या विषयावर डॉ. चंद्रशेखर जोशी आणि व्याकरण या विषयावर श्रुती के.एस. यांनी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. काही मुद्यांवर शास्त्र चर्चा चांगलीच रंगली.

राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन

नागपुरात प्रथमच एखादया विद्यापीठाच्या पुढाकाराने भारतातील नामवंत प्रकाशनांना एकत्रित आणणा–या त्रिदिवसीय राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन दि. 10 ते 12 जानेवारी 2020 दरम्यान सी.पी.ॲंड बेरार महाविद्यालय मैदान परिसर, रेशिमबाग येथे करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन वाल्मिकी संस्कृत विद्यापीठाचे प्रो. श्रेयांश द्विवेदी, प्रो. धर्मराज अडग, मा. कुलगुरू यांच्या शुभहस्ते आणि कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न झाले. या प्रदर्शनात भारतातील नामवंत प्रकाशक सहभागी झाले आहेत.

शोधनिबंध सत्रे – उद्घाटन समारोहानंतर 17 विविध विभागांमध्ये शोधनिबंधवाचन सत्रांना सुरुवात झाली असून जवळपास 1000 शोधनिबंध भारतभरातून आलेले प्रतिनिधी सादर करणार आहेत. संस्कृत पत्रकारिता, संस्कृत शिक्षणशास्त्र आणि मराठी साहित्य व संस्कृती हे तीन विभाग या अधिवेशनात नव्याने अंतर्भूत केले गेले.

कविसंमेलन – अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या समारोपाच्या दिवशी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. एकापेक्षा एक सरस कविता सादर करून कवीमंडळींनी प्राच्य विद्या परिषदेला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले.

प्रो. रमाकांत शुक्ला यांच्या हस्ते कविसंमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्यासह इतर पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रो. राजेंद्र मिश्रा होते. तर, प्रमुख अतिथी म्हणून प्रो.रमाकांत शुक्ला यांची उपस्थिती होती. प्रो. गोपबंधू मिश्रा यांचीही विशेष उपस्थिती होती. विद्यापीठाच्या आजवरच्या कुलगुरूंवर कविता सादर करून डॉ. लीना रस्तोगी यांनी कवीसंमेलनात रंग भरला. सोबतच, प्रो. हरदत्त शर्मा, प्रो.देवीसहाय पांडेय् , प्रो. हर्षदेव माधव, प्रो. मधुसूदन पेन्ना, प्रो.नंदा पुरी, डॉ.लीना रस्तोगी, श्रुती कानिटकर, राधावल्लभ त्रिपाठी, युवराज भट्टराई आणि राजेंद्र त्रिपाठी यांनी कविसंमेलनात भाग घेतला. तर सूत्रसंचालन सौरभ द्विवेदी यांनी केले. स्त्रीशक्ती, प्रदूषित पृथ्वीचे मनोगत, कवी कालिदास आणि त्यांच्या रचना, भारतमाता यासह विविध विषयांवरच्या या रचनांनी काव्यानंदाचे एक नवे दालन रसिकांसाठी खुले केले.

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद समापन समारोह -

जागतिक भाषांचा अभ्यास केल्यास प्राच्वविद्या हेच जगातील भाषांमधील वैविध्याचे माध्यम असल्याचे दिसत पण ही बाब प्राच्यविद्या परिषदेने संशोधनाच्या माध्यमातून सिद्ध करुन जगापुढे आणावी असे प्रतिपादन पद्मविभूषण शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांनी आज रविवार, दि. 12 जानेवारी 2020 रोजी परिषदेच्या समारोप समारोहात केले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या यजमानत्वाखाली मागील तीन दिवसांपासून नागपुरात सुरू असलेल्या अ. भा. प्राच्वविद्या परिषदेचा समारोप आज डॉ. विजय भटकर यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी सत्यव्रत शास्त्री, आर. सी. सिन्हा, शुकदेव शर्मा, हरिदत्त शर्मा, प्रो. चंद्रकात शुक्ल आणि प्रो. राधावल्लभ त्रिपाठी परिषदेचे अध्यक्ष गौतम पटेल, कार्यकारी सचिव सरोजा भाटे, कुलगुरु श्रीनिवास वरखेडी, स्थानिक सचिव मधुसूदन पेन्ना, कुलसचिव सी.जी. विजयकुमार, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. विजय भटकर यांनी, आजवर मी अनेक परिषदांमध्ये सहभागी झालो पण आज मला याठिकाणी निराळी अनुभूती होत आहे. सध्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन सभ्यता अस्तित्वात आहेत. त्यांचा अनेकांनी अभ्यास केला पण चिरंतन टिकली ती भारतीय सभ्यता. त्याचे मूळ कारण वसुधैव कुटुंबकम हा भाव आहे. भारतीय सभ्यतेने अनेक आक्रमणांचा सामना केला पण ती नामशेष होऊ शकली नाही. त्यात शाश्वत सातत्य आणि नित्यनूतनता हा भाव असल्याचे ते द्योतक आहे. मुख्य म्हणजे भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा संस्कृत भाषा आहे आणि वेद, उपनिषदे, पुराण हे सर्व संस्कृतमध्ये आहे. येत्या काळात जगातील भाषांचा अभ्यास करुन त्यात संस्कृतचे किती शब्द कोणत्या जागतिक भाषेत अंतर्भूत आहेत याचा अभ्यास होण्याची गरज आहे. त्यातून लक्षात येईल की जगातील सर्व भाषांचा मूळ स्त्रोत संस्कृत आहे. आगामी काळात संगणक शास्त्रज्ञाना देखील संस्कृत भाषेचे ज्ञान प्राप्त करावे लागले, कारण त्याशिवाय या क्षेत्रात टिकाव धरणे कठिण होईल. आपल्या संस्कृतीत अहं ब्रह्मास्मि। असे म्हटले आहे. त्यामुळे संस्कृत आणि प्राच्वविद्येतच स्वतरू ला ओळखण्याचे शिक्षण दिले जाते. आगामी काळ हा प्राच्यविद्येचाच असणार आहे. यात महिलांचा सहभाग आगामी काळात अधिक असेल आणि मानवतेचे भविष्य यातूनच ठरणार असल्याचेही डॉ. विजय भटकर यांनी सांगितले.

वेदमंत्रोच्चारणात दीपप्रज्वलन करून तसेच पाली भाषेतील मंगलाचरणाने समारोप सत्राचा प्रारंभ झाला. मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागातर्फे पाली भाषेत प्रार्थना सादर केली. याप्रसंगी मधुसूदन पेन्ना यांनी पीपीटी प्रेझेन्टेशनच्या माध्यमातून परिषदेचा अहवाल सादर केला. याप्रसंगी प्रो. आर सी सिन्हा, अध्यक्ष, भारतीय दा"र्निक अनुसंधान परिषद्, नवी दिल्ली आणि प्रो. सत्यव्रत शास्त्री यांची भाषणे झाली. कार्यक्रमाच्या शेवटी सरोजा भाटे यांनी शोधप्रबंध स्पर्धेतील उत्कृष्ट प्रबंध सादर करणा–या संशोधकांचा पुरस्कार घोषित केले. मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आले. प्रदान करण्यात आले. या परिषदेत एकूण १०२२ शोधनिबंध सादर झाले.

पुरस्कार आणि सत्कार

या कार्यक्रमात प्राच्यविद्यावरेण्य प्रो. सत्यव्रत शास्त्री यांना प्राच्यविद्याभास्कर, गौतम पटेल यांना सनातनविद्याभास्कर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उत्कृष्ट आयोजनाबद्दल कुलगुरू श्रीनिवास वरखेडी, मधुसूदन पेन्ना यांचा सत्कार करण्यात आला. सारस्वत यात्रेत उत्कृष्ट प्रद"र्न करणा–या शाळा व महाविद्यालयांना पुरस्कृत करण्यात आले.

या परिषदेविषयी अर्पिता रंजन, दिल्ली, राधा मेहता पुणे, रिता भट्टाचार्य कोलकाता आणि डॉ. कोकिळा यांनी अनुभव कथन केले. या परिषदेत वि"ोष सहयोग देणा–या श्री. न. र. पत्तरकिने, श्री रमे"ा भट यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी परिषदेसाठी सहकार्य करणा–या सर्वांचे आभार मानले. परिषदेचे सहसचिव डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी आभार मानले. शांतिपाठाने कार्यक्रमाची समाप्ती झाली. कार्यक्रमाचे संचालन श्री. सुमित कठाळे आणि डॉ. रेणुका बोकारे यांनी केले.

सांस्कृतिक कार्यक्रम –

परिषदेच्या 3 दिवसांमध्ये दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता आली. सांस्कृतिक कार्यक्रम पुढीलप्रमाणे –

AIOC 2020
10th & 11th January 2020
Cultural Events

Sr. No.	Date	Program	Institute	Time & Duration
1	10.01.2020	Bharatnatyam – Rutusamhar	Sandhya Purecha & Group, Mumbai	5.30 to 6.15 45min
2	Do	Dance Drama – Kavyakruti	, Abhinav Institute, Nirupama Rajendra & Group, Bengaluru	6.30 to 8.00 1.30 hour
3	Do	Amprapali Dance Drama (Hampiholi)	Sanskrit Bhasha Pracharini Sabha & Swarsangam, Nagpur	8.15 to 9.05 50 min
4	11.01.2020	Maharashtra Darshan ,	KKSU Alumni, Manjiri Vaidya & Group, Nagpur	5.30 to 7.00 1.30 hour
5	Do	Pratima Dance Drama,	Natyadharmi, Doha	7.00 to 8.30 1.30 hour
6	Do	Yoga Practicals	KKSU Students	8.30 to 9.00 30 min
7	Do	Striyashcharitam - Sanskrit Drama	Vibha Kshirsagar, Nagpur	9.00 to 9.45 45 min

.....

राष्ट्रीय परिषद अहवाल

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019 वर आधारित उच्च शिक्षणातील संधी व आव्हाने

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक च्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातर्फे ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019 वर आधारित उच्च शिक्षणातील संधी व आव्हाने''या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज शुक्रवार, दि. 14 फेब्रुवारी 2020 रोजी रामटेक येथे सकाळी 10.30 वाजता संपन्न झाले.

या परिषदेचे उद्घाटन प्रमुख अतिथी प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा ,कुलपती, कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी या नात्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019 मसुदा समितीतील सन्मान्य सदस्य प्रो. एम्. के. श्रीधर उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. कुलसचिव प्रो. विजयकुमार, शिक्षणशास्त्र संकायाच्या अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे, शिक्षण विभाग प्रमुख डॉ. कीर्ती सदार, परिषद् समन्वयक डॉ. राजश्री मेश्राम प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाला. प्रास्ताविक डॉ. कीर्ती सदार यांनी केले. स्वागतपर भाषण शिक्षणशास्त्र संकायाच्या अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे यांनी केले. कुलगुरू प्रो. वरखेडी यांनी प्रो. श्रीधर आणि प्रो. मिश्रा यांचा शाल, श्रीफळ, पेंटिंग आणि कॉफी टेबल बुक व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

उद्घाटन पर भाषणात डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांनी आपल्या ओजस्वी, मुद्देसूद आणि प्रभावी भाषणात नव्या शैक्षणिक धोरणासमोर असलेली आव्हाने सोदाहरण विशद केली. डॉ. मिश्रा म्हणाले, शिक्षणाचा हक्क हा केवळ 6 ते 14 या वयोगटापुरताच मर्यादित न राहता तो त्यापूर्वी आणि त्यानंतर सुद्धा मिळणे अनिवार्य असून तसा स्पष्ट उल्लेख प्राथमिक हक्क मसुद्यात असणे आवश्यक आहे. तसेच केवळ शिक्षणाचा हक्क पुरेसा नसून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळणे आवश्यक आहे, आज शिक्षणावर खाजगी संस्थांचा आधिक्याने प्रभाव आहे. देशाच्या विकास दरात 6 टक्के इतका भाग शिक्षणासाठी राखून ठेवणे आवश्यक असताना, तो ठेवला जात नाही. पूर्वीच्या काळात जातिधारित शिक्षणव्यवस्था होती ती आता अर्थ आधारित आहे. वर्तमानकाळात शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष देणे आवश्यक असून त्याबाबतीत गांभीर्याने पावले उचलणेही आवश्यक आहे. प्राथमिक ते उच्च शिक्षणातील पायाभूत सुविधा यांची आपल्या देशातील दयनीय स्थिती ही दुर्दैवी आहे. शिक्षण क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप हा तर शिक्षण क्षेत्राला आणखीच शोचनीय बनवतो. शैक्षणिक नियुक्त्या आणि शिक्षणावर राजकीय क्षेत्रातील लोकांनी निर्णय घ्यावे हे खरोखरच आपले दुर्भाग्य आहे. हे सर्व घटक शैक्षणिक क्षेत्रातील आव्हाने असून नव्या शैक्षणिक धोरणात जर यावर प्रायोगिकरित्या विचार, मंथन आणि प्रत्यक्ष कार्य झाले तरच हे धोरण केवळ वाचनीय आणि विचारणीय न ठरता प्रत्यक्ष कार्यप्रवण ठरेल. स्वामी विवेकानंदांनी शिक्षण हे चारित्र्य, मानव आणि राष्ट्र निर्मितीसाठी आवश्यक आहे हेच शिक्षणाचे स्थायी उद्दीष्ट असल्याचे सांगितले होते दुर्दैवाने त्याचाच आम्हाला विसर पडल्याचे सांगितले.

बीजभाषक प्रो. एम्. के श्रीधर यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या वैशिष्टयांवर प्रकाश टाकला. आपल्या बीजभाषणात प्रो. श्रीधर म्हणाले, शिक्षणक्षेत्रातील केंद्रीकरण, एकसारखेपणा आणि कप्पाबंदता ही नव्या शैक्षणिक धोरणात नाही. या धोरणानुसार कला शाखेचा विद्यार्थी त्याच्या आवडीनुसार वाणिज्य, विज्ञान किंवा अभियांत्रिकीचा विषय शिकू

शकतो. शिक्षण क्षेत्रात विकेंद्रीकरण झाल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय शिकता येऊन त्यात करिअर करता येईल. महाविद्यालयांनी स्वायत्तता स्वीकारल्यास विविध आंतरशाखीय अभ्यासक्रम एकाच ठिकाणी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात तसेच ही स्वायत्त महाविद्यालये पदवी प्रदान करू शकतात. ऑटोनॉमस डिग्री जनरेटिंग कॉलेज ही संकल्पना आम्ही या धोरणात अंतर्भूत केली आहे. विद्यार्थ्यांना विषयाच्या पलिकडे विचार करण्यास प्रवृत्त करणारे शिक्षण मिळावे हा या धोरणातील महत्त्वाचा भाग आहे. याशिवाय विविध शाखांसाठी विविध नियामक मंडळे अस्तित्त्वात असून त्याऐवजी एक समान नियामक मंडळ उच्च शिक्षण क्षेत्रात असावे असाही विचार आहे. शिक्षणात भारतीय मूल्ये, संस्कृती आणि विचारधारा यांचा समावेश महत्त्वाचा असून भारतातील शिक्षणाचा आत्मा असलेली ही भारतीयता युवा पिढीत रुजविणे हेच या शैक्षणिक धोरणाचे सार आहे असेही त्यांनी शेवटी आवर्जून सांगितले.

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी हे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, जोपर्यंत विद्यापीठे अथवा महाविद्यालये स्वयंपूर्ण होणार नाहीत, सरकारवरची अवलंबिता कमी करणार नाहीत तोपर्यंत त्यांना स्वायत्तता प्राप्त होणार नाही. नव्या शैक्षणिक धोरणानुसार स्वायत्ततेचे अनेक फायदे असून ते स्वीकारणारी महाविद्यालये आणि विद्यापीठे नव्या युगाला साजेसे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास सक्षम ठरतील. पारंपरिक विचारप्रणाली बदलून नव्या प्रणालीचा अवलंब करणे बदलत्या युगानुसार आवश्यक आहे. पूर्वी गुरुकुलकाळात विविध विषयांचे शिक्षण घेता येत असे. आजच्या सारखी कप्पाबंद स्थिती शिक्षणाची नव्हती. नव्या शैक्षणिक धोरणात असलेली लिबरल आर्टस् ही संकल्पना प्राचीन शिक्षणपद्धतीने सहजपणे आत्मसात केली होती. संस्कृत विद्यापीठांना अनेक नव्या संधी उपलब्ध असून गुणवत्तापूर्ण, प्रायोगिक आणि ते प्रायोगिक शिक्षण राबविण्याची इच्छाशक्ती यांची नितांत आवश्यकता आहे. या संधींचा फायदा संस्कृत विद्यापीठांनी घ्यावा असे आवाहनही प्रो. वरखेडी यांनी याप्रसंगी केले.

या परिषदेला भारतभरातून सहभागी प्रतिनिधींनी विविध सत्रांमध्ये शोधनिबंध सादर केले. गोपाल कृष्ण ठाकूर, विभाग प्रमुख , शिक्षण विभाग, हिंदी विश्वविद्यालय, वर्धा आणि प्रीती सागर, अधिष्ठाता हिंदी विश्वविद्यालय, वर्धा यांनी विविध सत्रांचे अध्यक्षपद भूषविले. शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्ती सदार यांनी सत्रांचे समन्वयन केले.

या परिषदेच्या समारोपाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे पूर्व कुलसचिव डॉ. पूरणचंद्र मेश्राम यांनी नव्या शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन केले.

उद्घाटन आणि समारोप सत्राचे संचालन अनुक्रमे प्रा. पल्लवी कावळे आणि प्रा. शबाना अंजुम यांनी केले तर आभार अनुक्रमे डॉ. राजश्री मेश्राम व प्रा. कविता गोमासे यांनी मानले.

या परिषदेला विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

सामान्य प्रशासन विभाग

- विद्यापीठ कायदा कलम २५ /२ अन्वये, २०१९–२०२० या शैक्षणिक सत्रामध्ये मा. व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या एकुण ६ सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. कोविड–२०१९ च्या अनुषंगाने प्रथमच ऑनलाईन सभा आयोजित करण्यात आल्या. सभेचे इतिवृत्त तयार करणे, कार्यवाही करीता पाठविणे, प्राप्त कार्यवाहीकरीता अहवाल सादर करणे, प्राप्त आदेशानुसार कार्यवाहीनुसार पत्र, सूचना निर्गमीत करण्यात आल्या.
- विश्वविद्यालयाद्वारे स्थपित अनेक समित्यांचे गठन व पुर्नगठन संबंधी प्रक्रिया करण्यात आल्या आहे. जसे छात्राकल्याण समन्वयक आणि समिती गठन करणे, विस्तार सेवा मंडळ समिती, महिला सेल, महिला तक्रार निवारण समिती, कोविड–१९ समिती, वार्षिक अहवाल समिती, कक्ष सीपन करणे, समन्वयकांची नियुक्ती करणे, दिव्यांग समिती, इत्यादी.... याप्रमाणे अनेक समितींचे गठनाची प्रक्रिया करून बैठकी आयोजित करण्याबाबत सूचना निर्गमित करणे, जुन्या आणि नविन वेबसाईटवर अपलोड करण्यात आल्या आहेत.
- विविध प्रशासकीय समारंभ, प्रशिक्षण वर्ग, विभिन्न व्याख्यानमाला, इत्यादींचे आयोजन संबंधीची कार्यवाही करण्यात आली. जसे वर्धापनदिन, कालिदास दिन, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, कामगार दिवस वगैरे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.
- विद्यापीठाची कायदेविषयक तथा न्यायालयीन प्रवण आलेले कामकाज करण्यात येत आहे.
- कार्यालयीन/परिसराच्या सुनियोजनाच्या दृष्टीने निर्देशानुसार वेळोवळी परिपत्रके, अधिसूचना, सूचना, कार्यालयीन आदेश, निर्गमीत करण्यात आले आहे.
- शासनाकडून प्राप्त आदेशान्वये, परिपत्रकानुसार विश्वविद्यालयातील व सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालयांसाठी सूचना,परिपत्रके, अधिसूचना वेळोवेळी जारी करणे.
- शासनाशी करण्यात येणारा पत्रव्यवहार, अहवाल संबंधीची प्रक्रिया करण्यात आली.
- माहिती अधिकार संबंधीत माहिती तयार करून देण्यात आली.
- विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकरीता तसेच विद्यापीठाच्या संबंधित सर्व अभ्यागतांकरिता तथा विद्यार्थ्यांकरिता नागपूर–रामटेक येण्याजाण्यासाठी बस निविदा प्रक्रियेद्वारा बस सुविधा सुरू करण्यात आली असून याचे सुचारू व्यवस्थापन करण्यात येत आहे.
- बायोमेट्रीक उपस्थिती व याचे ओळखपत्र संबंधी कार्यवाही
- विभागाकडून विश्वविद्यालयाचा कायदा सुधारणा प्रक्रिया सुरू आहे.
- लोकसभा आणि विधानसभा इलेक्शनकरीता शासनाशी करण्यात येणारे पत्रव्यवहार आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सूचना व कार्यादेश संबंधी सर्व प्रक्रिया करण्यात आली.
- विद्यापीठातील आवक आणि जावकचे कार्य
- रामटेक परिसर व वारंगा परिसर येथील अंतर्गत आवक व जावकचे कार्य

आस्थापना विभाग

महाराष्ट्र शासनाद्वारे अधिनियम क्र. 33–1997 अन्वये प्रस्तुत विश्वविद्यालयाची स्थापना दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी झाली. शासनाने प्रस्तुत विश्वविद्यालयातील पाच शैक्षणिक विभागांकरिता एकूण 35 शिक्षकीय पदे आकृतीबंधानुसार मंजूर केली आहेत. त्याचप्रमाणे 114 शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

शासनमान्य शिक्षकेतर पदे

एकूण मंजूर पदे					**एकूण भरलेली पदे**					**एकूण रिक्त पदे**				
अ	**ब**	**क**	**ड**	**एकूण**	**अ**	**ब**	**क**	**ड**	**एकूण**	**अ**	**ब**	**क**	**ड**	**एकूण**
22	10	50	32	**114**	13	07	37	23	**80**	09	03	13	09	**34**

शासनमान्य शिक्षकीय पदे

एकूण मंजूर पदे	**एकूण भरलेली पदे**	**एकूण रिक्त पदे**
35	**18**	**17***

* एक पद धारणाधिकारामुळे रिक्त

सेवाज्येष्ठता यादी

कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी प्रतीवर्ष प्रसीध्द करावी असे शासनाचे धोरण असून त्यानुसार प्रस्तूत विश्वविद्यालयाने 2019 ची अद्ययावत सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

कर्मचारी हिताचे निर्णय

1) रजा मान्यतेच्या आदेशाची प्रत ई–मेल मार्फत कर्मचा–यांना देण्यात येते.

2) कर्मचाऱ्यांना सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत देण्यात येत आहे.

3) पदोन्नती/CAS प्रक्रिया नियमानुसार दरवर्षी विहीत वेळेत पूर्ण केली जाते.

विद्या विभाग

(1) अध्ययन मंडळ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 33 (2) तरतूदीनुसार सत्र 2019–20 साठी तदर्थ बावीस अध्ययन मंडळांचे गठण करण्यात आले आहे. अध्ययन मंडळाचे नाव खाली नमूद केल्यानुसार आहे.

अ. क्र.	तदर्थ अभ्यास मंडळाचे नाव	अध्यक्ष
1.	तदर्थ संस्कृत भाषा आणि साहित्य अभ्यास मंडळ	प्रा. नन्दा पुरी
2.	तदर्थ दृश्यकला अभ्यास मंडळ	डॉ. भाऊ दांदडे
3	तदर्थ हॉस्पिटॅलिटी स्टडीज आणि ट्रॅव्हल ॲण्ड टयुरीजम अभ्यास मंडळ	प्रा. कविता होले
4	तदर्थ पाली प्राकृत आणि आधुनिक भाषा–साहित्य अभ्यास मंडळ	डॉ. नन्दा पूरी
5.	तदर्थ पारंपारिक भारतीय विज्ञान अभ्यास मंडळ	प्रा. कृष्णकुमार पाण्डेय
6.	तदर्थ वाणिज्य आणि व्यापार प्रशासनअभ्यास मंडळ	डॉ. किर्ती सदार
7.	तदर्थ प्रशासकीय सेवा अभ्यास मंडळ	डॉ. हरेकृष्ण अगस्ती
8.	तदर्थ वेदांग ज्योतिष व वास्तुशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय
9.	तदर्थ मानवताअभ्यास मंडळ	डॉ. प्रसाद गोखले
10.	तदर्थ वेद अभ्यास मंडळ	प्रा. सी. जी. विजयकुमार
11.	तदर्थ व्याकरण अभ्यास मंडळ	प्रा. सी. जी. विजयकुमार
12.	तदर्थ धर्मशास्त्र व पुरातन भारतीयविधीशास्त्रअभ्यास मंडळ	प्रा. मधुसूदन पेन्ना
13.	तदर्थ कीर्तनशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. दिलीप डबीर
14.	तदर्थ विदेशी भाषा आणि साहित्य अभ्यास मंडळ	प्रा. मधुसूदन पेन्ना
15.	तदर्थ दर्शनशास्त्र अभ्यास मंडळ	प्रा. मधुसूदन पेन्ना
16.	तदर्थ प्रदर्शन कला अभ्यास मंडळ	डॉ. दिनकर मराठे
17.	तदर्थ योगा आणि पर्यायी चिकित्सा पध्दती अभ्यास मंडळ	डॉ. कलापिनी अगस्ती
18.	तदर्थ सामाजिक विज्ञान व समाजकार्य अभ्यास मंडळ	डॉ. हृषिकेश दलाई
19.	तदर्थ मानसशास्त्रअभ्यास मंडळ	डॉ. पराग जोशी
20.	तदर्थ ग्रंथालय वार्ताशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. दिपक कापडे
21.	तदर्थ संगणकशास्त्र व उपयोजनअभ्यास मंडळ	प्रा. ललिता चंद्रात्रे
22.	तदर्थ शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ	प्रा. ललिता चंद्रात्रे

(2) संकाय

विश्वविद्यालयाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 31 (5) प्रमाणे पाच संकाय स्थापन करण्यात आले आहे. स्थापन करण्यात आलेल्या पाच संकायाची नावे व संकाय अधिष्ठातांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	संकायाचे नाव	अधिष्ठाताचे नाव
1	वेदविद्या संकाय	प्रा. सी.जी. विजयकुमार
2	संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय	प्रा. नंदा ज. पुरी
3	भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय	प्रा. मधुसूदन पेन्ना
4	प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे संकाय	प्रा. कृष्णकुमार पाण्डेय
5	शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय	प्रा. ललिता चंद्रात्रे

3) विद्वत् परिषद

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 27 (2) च्या तरतूदीनुसार विद्वत् परिषदेचे गठण करण्यात आले. सत्र 2019–20 मध्ये विद्वत् परिषदेच्या एकूण तीन सभा अनुक्रमे (1) दि. 08.07.2019 (2) दि. 15.02.2020आणि (3) दि.18.05.2020 रोजी संपन्न झाल्यात.

4) कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील अभ्यासक्रमांची यादी 2019–20

अभ्यासक्रमांचे नाव			अभ्यासक्रमांचे नाव
अ.क्र.	पदव्युत्तर पदवी		पदविका
1	एम. ए. (संस्कृत)	69	वास्तुशास्त्र पदविका
2	एम. ए. (संस्कृत दर्शन)	70	संस्कृत साधना पदविका
3	एम. ए. (संस्कृत साहित्या)	71	संस्कृत परिचय पदविका
4	एम. ए. (वेद)	72	संस्कृत आगम पदविका
5	एम. ए. (संस्कृत व्याकरण)	73	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका
6	एम. ए. (वेदांग ज्योतिष)	74	योग, निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
7	एम. ए. (योगशास्त्र)	75	योग पदविका
8	एम. ए. (कीर्तनशास्त्र)	76	जर्मन भाषा पदविका
9	एम. पी.ए.	77	वेदशास्त्र कनिष्ठ पदविका
10	एम. ए. (संस्कृत वेदांत)	78	पौरोहित्य उच्च पदविका
11	एम. ए. (शिक्षण)	79	वेदशास्त्र ज्येष्ठ पदविका
12	एम. एड्.	80	कीर्तनशास्त्र कनिष्ठ पदविका
13	एम. एफ.ए.	81	कीर्तनशास्त्र ज्येष्ठ पदविका

अभ्यासक्रमांचे नाव			अभ्यासक्रमांचे नाव
14	एम. फिल. (शिक्षण)	82	जनसंवाद आणि पत्रकारीता अभ्यासक्रम पदविका
15	एम. फिल. (संस्कृत)	83	डिप्लोमा इन थेटर ॲण्ड परफॉरमींग आर्ट
16	एम. फिल. (संस्कृत दर्शन)	84	नृत्य उच्च पदविका
17	एम. फिल. (संस्कृत वेदांग ज्योतिष)	85	नृत्य कनिष्ठ पदविका
18	एम. फिल. (संस्कृत व्याकरण)	86	नृत्य ज्येष्ठ पदविका
19	एम. फिल. (योगा)	87	डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी स्टडीज
20	एम. फिल. (संस्कृत वेदा)	88	नृत्य पूर्व पदवी (पदविका)
21	आचार्य एम.ए. (संस्कृत साहित्य)	89	डिप्लोमा इन मॅन्युस्क्रीप्टॉलॉजी ॲण्ड पॅलिओग्राफी
22	आचार्य एम.ए. (व्याकरण)	90	डिप्लोमा इन एन्शड इंडियन सायंसेस
23	आचार्य एम.ए. (वेदांत)	91	डिप्लोमा इन एन्शड इंडियन एन्व्हायरमेन्टल स्टडीज
24	आचार्य एम.ए. (ज्योतिष)	92	डिप्लोमा इन वैदिक मॅथेमॅटीक्स
25	एम. ए. (लोकप्रशासन)	93	डिप्लोमा इन संस्कृत लर्निंग
26	आचार्य एम.ए. (दर्शन)	94	आगम डिप्लोमा इन प्राकृत
27	आचार्य एम.ए. (वेदा)	95	डिप्लोमा इन अरली चाईल्डहुड एज्युकेशन ॲन्ड केअर
28	मास्टर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फार्मेशन सायन्स	96	डिप्लोमा इन आयुर्वेद ॲन्ड पंचकर्म
29	एम. एस.स्सी. (हॉस्पीटॅलिटी स्टडीज)	97	डिप्लोमा इन क्रिएटीव्ह राइटींग इन संस्कृत
30	मास्टर ऑफ सोशल वर्क	98	डिप्लोमा इन फ्रेंच
31	एम.एसी.स्सी. (योगिक सायन्स)	99	डिप्लोमा इन इव्हेट मॅनेजमेन्ट
32	एम. ए. (ज्योतिर्विज्ञान)	100	डिप्लोमा इन इंडियन पॅलीटी
33	एम. ए. (संस्कृत मल्टीडिसेप्लनरी)	101	डिप्लोमा इन आयुर्वेद मसाज ॲन्ड पंचकर्म टेकनिशियन
पदवी		102	डिप्लोमा इन इंटेरिअर डेशिगनीग
34	बी. ए. (वेदांग ज्योतिष)	103	डिप्लोमा इन फॅशन डेशिगनीग
35	बी. ए. (शिक्षण)	104	डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन
36	बी. एड्.	105	डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी स्टडीज
37	बी. ए. (संस्कृत विशारद)	106	डिप्लोमा इन इंडियन फिलॉशापी
38	बी. ए. (प्रशासकीय सेवा)	**प्रमाणपत्र**	
39	बी. ए. (योगशास्त्र)	107	नृत्य प्रमाणपत्र
40	बी. एफ. ए.	108	वैदिक मॅथेमॅटीक्स प्रमाणपत्र
41	बी एससी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज)	109	संस्कृत सेतू (बीएड् प्रवेशाकरिता संस्कृत नसणाऱ्या विद्यार्थ्या करिता)
42	बी. ए. (वेदविद्या)	110	आयुर्वेद फार फॉरेन स्टुडन्टस्
43	बी. ए. (कीर्तनशास्त्र)	111	गीता प्रमाणपत्र
44	बी. ए. (ट्रॅव्हल ॲण्ड टुरिजम)	112	वेदविद्या प्रमाणपत्र
45	बी. ए. (नृत्य)	113	संस्कृत प्रवेश प्रमाणपत्र

अभ्यासक्रमांचे नाव			अभ्यासक्रमांचे नाव
46	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (व्याकरण)	114	सर्टिफिकेट कोर्स इन योग ॲन्ड नॅचरोपॅथी
47	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (साहित्य)	115	सर्टिफिकेट कोर्स इन रायटींग
48	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (वेदांत)	116	सर्टिफिकेट कोर्स इन स्पोकन संस्कृत
49	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (ज्योतिष)	117	सर्टिफिकेट कोर्स इन हॉलीस्टीक पर्शनॅलिटी
50	बी.ए. (अतिरिक्त) (संस्कृत)	118	सर्टिफिकेट कोर्स इन बीजनेश इंग्लिश कॉमुनिकेशन
51	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (दर्शन)	119	सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्पुटर अप्लीकेशन
52	सन्मानितशास्त्री (बी. ए. ऑनर्स) (वेदा)	120	सर्टिफिकेट कोर्स इन शारदा स्क्रीप्ट लरनिंग
53	बी.एस्स.सी. (योगिक सायन्स)	121	सर्टिफिकेट कोर्स इन शास्त्रीक मेथड ऑफ आरगुमेन्शन
54	बी.ए. (थेटर ॲन्ड ड्रामा)	122	योग सेतू कोर्स
55	बी.ए. (विशारद पाली)	123	सर्टिफिकेट प्रोग्राम इन फोटोग्राफी
56	बी.बी.ए.	124	सर्टिफिकेट कोर्स इन ग्राफीक डिशिजन
57	बी. कॉम.	125	सर्टिफिकेट प्रोगॉम इन मेकप
58	बी.व्होक. (मिडीया आर्ट)	126	सर्टिफिकेट कोर्स इन पुर्णवाद फिलाशापी
59	बॅचलर ऑफ कॉम्पुटर अप्लीकेशन		**12 वी/+2 /इंटरमिडीयट आर्ट**
60	बी.ए. (संस्कृत)	127	प्राकशास्त्री
पदव्युत्तर पदविका			
61	पी. जी. डिप्लोमा इन एनशियंट इंडीयन मॅथेमाटीक्स		
62	वेदांग ज्योतिष पदव्युत्तर पदविका		
63	पी.जी.डी.सी. ए.		
64	पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायंसेस		
65	आग्ल भाषेतून संस्कृतचे अध्ययन		
66	पी. जी. डिप्लोमा इन वास्तुशास्त्र		
67	पी. जी. डिप्लोमा इन संस्कृत जनऱ्यालिजम		
68	पी. जी. डिप्लोमा इन स्ट्रान्सलेशन स्टडिज		

महाविद्यालय शाखा

दि. 25.06.2019 रोजी मा. कुलगुरू महोदय याच्या अध्यक्षतेखाली संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते सदर बैठकीत प्रलंबित बिंदूनामावली चे कार्य पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानुसार बिंदूनामावली तयार करण्याचे कार्य सुरू असून शासन स्तरावर प्रलंबित आहे.

दि. 25.06.2019 रोजी विश्वविद्यालयाने संलग्नित महाविद्यालयांच्या अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांची प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा–या सोईसुविधांबाबत बैठक आयोजित करून त्याबाबत सर्व महाविद्यालयांना अवगत केलेले आहे.व त्याबाबतची कार्यवाही त्वरीत करण्याची सूचना देण्यात आली आहे.व विश्वविद्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे रामटेक येथील परीक्षा विभागाकडे असलेले नवीन अभ्यासक्रमाचे नामांकनाचे कार्य संलग्नित व Riss अंतर्गत महाविद्यालय विभाग येथे स्थानांतरीत करण्यात येऊन महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकनाचे कार्य महाविद्यालय विभागांतर्गत करण्यात आले त्या सविस्तर माहीती पुढील प्रमाणे

1) शैक्षणिक सत्र 2019–20 मधील संलग्नित एकूण 06 महाविद्यालयाचे नवीन अभ्यासक्रमाचे आयुएमएस अंतर्गत अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रवेशाचे नामांकनाचे कार्य सुरळीत पणे पार पडले.

2) सामंज्यस्य करारांतर्गत चालविण्यात येणा–या एकूण 26 महाविद्यालय नवीन अभ्यासक्रमाचे असून त्यापैकी एकूण 19 महाविद्यालयाचे नामांकनाचे कार्य आयुएमएस अंतर्गत करण्यात आले. तसेच 05 महाविद्यालयाने यावर्षी विद्यार्थी प्रवेश नसल्यामुळे नामांकनाचे कार्य पूर्ण करण्यात आले नाही. तसेच 02 महाविद्यालयाने विद्यार्थी प्रवेश नसल्याबाबतचे मौखिक सूचना विश्वविद्यालयास दिलेली आहे.

3) Riss अंतर्गत एकूण 23 नवीन अभ्यासक्रम तसेच संलग्नित महाविद्यालयाचे 06 नवीन अभ्यासक्रम व ककासंवि चे 15 नवीन अभ्यासक्रम असे एकूण 44 नवीन अभ्यासक्रमाचे 812 विद्यार्थ्यांचे नामांकनाचे कार्य पूर्ण करण्यात आले आहे.

4) विश्वविद्यालयाच्या एकूण 62 संलग्नित महाविद्यालयांचे पदनिश्चती करून देण्यात आलेली आहे.

5) शै.सत्र 2020–21 करीता सर्व संलग्नित महाविद्यालयांना संलग्निकरण सातत्य शूल्क अदा करण्याबाबत पत्रे निर्गमित करण्यात आली त्यानुसार 59 महाविद्यालय कडून संलग्निकरण सातत्य शूल्क जमा करण्यात आलेले आहे तसेच Riss अंतर्गत 78 महाविद्यालयांना नूतणीकरण करण्याबाबत पत्रे निर्गमित करण्यात आली असून कार्यवाही करण्यात येत आहे.

6) विश्वविद्यालयाच्या एकूण 62 संलग्नित महाविद्यालयांचे IUMS अंतर्गत कार्यप्रणाली लागु करण्याकरीता कार्यवाही सुरू आहे.

7) बंद अवस्थेतील बी.एड महाविद्यालयांचे पुनरूज्जीवन करण्याकरीता महाविद्यालय कक्षा मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.या संदर्भात स्व रामरावजी दुधे महाविद्यालय दारव्हा, यांना व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार विलंब शूल्कात सूट देऊन संलग्निकरण सातत्य शूल्क भरण्याकरीता पत्र दिले.

8) सर्व संलग्नित व Riss अंतर्गत महाविद्यालयांना कॉलेज तसेच अभ्यासक्रमनिहाय कोड आवंटित करण्यात आले असून शूल्क भरण्याबाबतची ऑन लाईन प्रक्रीयेचे कार्य करण्यात येत आहे.

9) दि.17.02.2020 पदनिश्चितीच्या सभेत 24 नवीन कॉलेजला पदनिश्चिती देण्याची प्रक्रीया सुरू आहे तसेच 37 जुन्या महाविद्यालयांना शारिरीक शिक्षक पदे देण्यात आली आणि त्यांना पत्र पाठविले.

10) शासन निर्णयानुसार व व्यवस्थापन परिषेदेच्या निर्णयानुसार महाविद्यालयीन कक्षा मार्फत सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत सुधारणा करण्यात आली असून शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

11) विश्वविद्यालयाच्या संलग्नित महाविद्यालयांमार्फत प्राप्त झालेल्या सूचना, मूद्दे संबंधीत विभागांना उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले.

12) विश्वविद्यालयाच्या शूल्क निर्धारण समिती कडून विविध अभ्यासक्रमाचे शूल्क आकारण्यात आले. काही महाविद्यालयांनी शूल्क वाढी बाबत अर्ज सादर केले. असे अर्ज /बाब शूल्क निर्धारण समितीकडै पाठविले.

13) संलग्नित महाविद्यालयाद्वारे वेळोवेळी प्रवेशाबाबत वाढीव मागणीबाबत कार्यवाही करण्यात येऊन 09 महाविद्यालयामधील प्रवेशक्षमता मा. कुलगुरू यांच्या अधिकार अंतर्गत 20 टक्के वाढवून देण्याची कार्यवाही करण्यात आली.

14) सत्र 2019–20 मध्ये 24 नवीन महाविद्यालय तसेच 11 जूने असे एकूण 35 महाविद्यालयामध्ये LEC समिती पाठविण्यात आली.

15) संलग्नित महाविद्यालयांना 2F चे Form वर मा. कुलसचिवांची स्वाक्षरी घेऊन पुढील प्रक्रीयेसाठी महाविद्यालयांना दिले.

16) हिवाळी आणि उन्हाळी अधिवेशनासाठी तारांकित प्रश्न पाठविण्यात आले.

17) दमयंतीताई देशमुख बी.एड कॉलेज रामटेक येथे 2019–20 करीता पदभरती करीता समिती देण्यात आली.

18) लॉकडऊच्या काळात दि. 10 व 11 एप्रिल 2020 रोजी सर्व संलग्नित तसेच Riss महाविद्यालयाच्या संस्था चालकांची सभा Zoom App मार्फत आयोजित करण्यात आली.

19) सर्व संलग्नित तसेच Riss महाविद्यालयाच्या छात्रांची सभा Zoom App वर दि. 15,16,17 जून 2020 रोजी आयोजित करण्यात आली.

वित्त विभाग

विश्वविद्यालयाच्या आय आणि व्ययाच्या सन 2018-2019 चा प्रत्यक्ष

सन 2019-2020 चा 15.03.2020 पर्यंतचा

आणी सन 2020-2021 चा अंदाज खालील प्रमाणे आहे

		प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	अर्थसंकल्पीय	अर्थसंकल्पीय
		आय	व्यय	आय	व्यय	अंदाज आय	अंदाज व्यय
		2018-2019	2018-2019	2019-2020	2019-2020	2020-2021	2020-2021
				15.03.2020	15.03.2020		
भाग 1	अ) साधारण निधी	36691302.00	19184067.00	58123170.00	23519492.00	94228290.00	95408500.00
	ब) वेतन अनुदान	62880973.00	62788553.00	53213273.00	61279590.00	154750000.00	154750000.00
भाग 2	विकास कार्यक्रम	100000000.00	89738707.00	3000000.00	40607785.00	2666200000.00	2625500000.00
भाग 3	निधी	1624158.00	1187275.00	7167166.00	10998889.00	2850000.00	3250000.00
	एकूण	**201196433.00**	**172898602.00**	**121503609.00**	**136405756.00**	**2918028290.00**	**2878908500.00**

अभियांत्रिकी विभाग

(१)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजने अंतर्गत** 30.5 Mtr Flag Mast Capable of withstanding for 180 KM/HR wind speed complete for 30 ft x 20 ft size Tri color National Flag

प्राथमिक अंदाज : रू. १०,९६,९००/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. १०,९६,९००/–

कार्यवाही : ध्वजस्तंभ उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले.

सद्य:स्थिती : सदर काम पूर्ण झाले असून यंत्रणा कार्यान्वित आहे.

(२)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजनेअंतर्गत** Installation of Mobile Compactor

प्राथमिक अंदाज : रू. २०,५९,८१४/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. २०,५९,८१४/–

कार्यवाही : ई–निविदा प्रकाशित करून सदर काम पूर्ण करण्यात आले.

सद्य:स्थिती : सदर काम पूर्ण झाले आहे.

(३)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजनेअंतर्गत** Construction of Tensile Structure Ramtek Campus.

प्राथमिक अंदाज : रू. १०,४९,८९४/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. १०,४९,८९४/–

कार्यवाही : ई–निविदा प्रकाशित करून सदर काम पूर्ण करण्यात आले.

सद्य:स्थिती : सदर काम पूर्ण झाले आहे.

(४)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजनेअंतर्गत** Construction of stage at Ramtek Campus.

प्राथमिक अंदाज : रू. ७,८२,८५८/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ७,८२,८५८/–

कार्यवाही : ई–निविदा प्रकाशित करून सदर कामाचे आदेश देण्यात आले आहे.

सद्य:स्थिती : सदर काम प्रगतीपथावर आहे.

(५)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजनेअंतर्गत** Construction of Amphitheater at Ramtek Campus.

प्राथमिक अंदाज : रू. २१,३८,८५९/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. २१,३८,८५९/–

कार्यवाही : ई–निविदा प्रकाशित करून सदर काम पूर्ण करण्यात आले.

सद्य:स्थिती : सदर काम प्रगतीपथावर आहे.

(६)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजने अंतर्गत रिक्रीऐशन सेंटर येथे तळमजल्यावर भोजनकक्षाचे बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : १९७.७९ स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. ३८,१८,४६३/—

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ५०,५४,०७३/—

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. ५०,५४,०७३/—

कार्यवाही : शासनाकडून प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे खालीलप्रमाणे जमा केला आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/दिनांक
रू. ५०,५४,०७३/— वर्ष २०१८—१९	रू. ५०,५४,०७३/— दि. २८.०२.२०१९

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. ५०,५४,०७३/—

सद्य:स्थिती : बांधकाम पूर्ण झाले असुन वापरात आहे.

(७)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजने अंतर्गत रिक्रीऐशन सेंटर येथे पहिल्या व दुस—या माळयाचे बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : १५१८.३५ स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. ३,८८,३५,०००/—

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ३,८८,३५,०००/—

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. ३,८८,३५,०००/—

कार्यवाही : शासनाकडून प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे खालीलप्रमाणे जमा केला आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/दिनांक
रू. ३,८८,३५,०००/— वर्ष २०१८—१९	रू. ३,८८,३५,०००/— दि. ०१.०३.२०१९

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. ३,८८,३५,०००/—

सद्य:स्थिती : बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(८)

प्रकल्पाचे नाव : **रूसा योजने अंतर्गत वारंगा येथे संरक्षण भिंतीचे बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. ४,५३,७८,१६२/—

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. २,५०,००,०००/—

कार्यवाही : शासनाकडून प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे खालीलप्रमाणे जमा केला आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/दिनांक
रू. २,५०,००,०००/—	रू. २,५०,००,०००/— दि. ११.१०.२०१९

सद्य:स्थिती : बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(९)

प्रकल्पाचे नाव : **ॲकडमिक रिसर्च सेंटर इमारत बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्राफळ : २९४३.२७ स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. ५१३.६६ लक्ष

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ५१३.६६ लक्ष

कार्यवाही : प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे जमा केली आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/ पावती दिनांक
रू. ४४,९१,४००.०० /वर्ष २००९–१०	रू. ४४,९१,४००.०० /दि. २०.०३.२०१०
रू. २३,३३,०००.०० /वर्ष २०१०–११	रू. २३,३३,०००.०० /दि. २३.१२.२०१०
रू. १२,५०,०००.०० /वर्ष २०१०–११	रू. १२,५०,०००.०० /दि. २३.१२.२०१०
रू. १०,००,०००.०० /वर्ष २०१०–११	रू. १०,००,०००.००/ दि. २३.०९.२०११
रू. ६,८०,०००.०० / वर्ष २०१४–१५	रू. ६,८०,०००.०० /दि. ०८.०४.२०१५
रू. ४,२०,०००.००/ वर्ष २०१५–१६	रू. ४,२०,०००.०० / दि.१३.०१.२०१६
रू. २,००,००,०००.०० वर्ष २०१५–१६	रू. २,००,००,०००.०० दि. २९.०३.२०१६
रू. ३७,७०,०००.०० वर्ष २०१५–१६	रू. ३७,७०,०००.०० दि. ११.०५.२०१६
रू. ८०,००,०००.०० वर्ष २०१६–१७	रू. ८०,००,०००.०० दि. २३.०५.२०१७
रू. ९४,२१,६००/– वर्षे २०१७–१८	रू. ९४,२१,६००/– दि.१३.०४.२०१८

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. ५,१३,६६,०००/–

सद्य:स्थिती : सा. बां. विभागाद्वारे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(१०)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी वन टाईम कॅच अप ग्रॅट योजने अंतर्गत विकास कामे**

१) ॲकडमिक स्कुल इमारत बांधकाम २) परिसर विकास कामे

बांधकामाचे क्षेत्राफळ : ४८१३.६० स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. १०.०० कोटी

शासन वाटा रू. ५.०० कोटी

युजीसी वाटा रू. ५.०० कोटी

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. २.५० कोटी (युजीसी कडुन प्राप्त)

: रू. ५.०० कोटी (महाराष्ट्र शासनाकडुन प्राप्त)

कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे प्राप्त रक्कम जमा करण्यात आली.

प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/ दिनांक
युजीसी कडून प्राप्त रू. २.५० कोटी /वर्ष २०११–१२	रू. २.५० कोटी / दि. २१.०३.१२
शासन कडून प्राप्त रू. २.५० कोटी /वर्ष २०१२–१३	रू. २.५० कोटी /दि.०५.०९.१२
शासन कडून प्राप्त रू. २.५० कोटी /वर्ष २०१५–१६	रू. ९६,५०,०००.००/ दि. ११.०५.२०१६ रू. १,५३,५०,०००.०० /दि. ११.०५.२०१६

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. ७.५० कोटी

सद्य:स्थिती : ॲकेडमिक स्कुल्स इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. मंजूर निधीपैकी शिल्लक रक्कम रू. २.५० कोटी प्राप्त करण्याकरिता युजीसीकडे पाठपुरावा सुरू आहे.

(११)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी च्या १२ व्या प्लान अंतर्गत परिसर विकास कामे**

कामाचे नाव : परिसर विकास (Garden Landscaping & Irrigation System)

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. **३६,६९,४९८/—**

कार्यवाही : 1) Garden Landscaping work - Rs. 20,03,887/-
2) Irrigation System work- Rs. 16,65,611/-

सद्य:स्थिती : सदर कामे पूर्ण झालेले आहे.

(१२)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी च्या १२ व्या प्लान अंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्राफळ : १४२६.६४ स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. ३,३०,१९,५६०/—

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ३,३०,१९,५६०/—

कार्यवाही : प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे जमा केली आहे.

अ.क्र.	वर्ष	युजीसीकडून प्राप्त निधी	धनादेश क्रमांक व दिनांक
१	२०१३—१४	रू. ३,३१,६०७/—	०००००४१ दि. ०१/१०/२०१४
२	२०१६—१७	रू. ४६,६८,३९३/—	४०५०८५ दि. १६/०२/२०१७
३	२०१७—१८	रू. ९८,००,०००/—	०००२५६ दि.२०/०५/२०१७
४	२०१७—१८	रू.१,००,००,०००/—	०००२५७ दि. २०/०५/२०१७
५	२०१७—१८	रू. ८२,१९,५६०/—	०००६६० दि.११/१२/२०१८
	एकुण जमा निधी	**रू. ३,३०,१९,५६०/—**	

सद्य:स्थिती : इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

(१३)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी वनटाइम कॅचअप ग्रन्ट अंतर्गत** 150KW/165 KVA क्षमतेचे Grid Connected Rooftop Solar System Under Net Metering

प्राथमिक अंदाज : रू. ८४,२७,०००/—

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ८४,२७,०००/—

कार्यवाही : प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत MEDA, Nagpur यांचेकडे जमा केली आहे.

अ. क्र.	वर्ष	युजीसीकडून प्राप्त निधी	धनादेश क्रमांक व दिनांक
१	२०१८—१९	रू. ८४,२७,०००/—	धनादेश क्र.045463 दि. 27/02/2019 अन्वये RTGS द्वारे
	एकुण जमा निधी	**रू. ८४,२७,०००/—**	

सद्य:स्थिती : सदर काम पूर्ण झाले असून यंत्रणा कार्यान्वित आहे.

(१४)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी वनटाइम कॅचअप ग्रन्ट अंतर्गत** Eletricity Express Fidder Line (HT)

प्राथमिक अंदाज : रू. ९६,६७,५६५/–

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. ९६,६७,५६५/–

कार्यवाही : प्राप्त निधी MSEDCL, Nagpur यांचेकडे जमा केली आहे.

अ. क्र.	वर्ष	युजीसीकडून प्राप्त निधी	धनादेश क्रमांक व दिनांक
१	२०१८–१९	रू. ५,२८,३६५/–	धनादेश क्र.010475 दि. 16/01/2019 अन्वये
२	२०१८–१९	रू. ९१,३९,२००/–	धनादेश क्र.045464 दि. 27/02/2019 अन्वये RTGS द्वारे
एकुण जमा निधी		**रू. ९६,६७,५६५/–**	

